# बंगालची सत्यकथा

विठ्ठल वामन हडप

संपादक

यशवन्त हडप एम्. ए., डी. बी. एड्.
प्राध्यापक, ग्रॅज्युएटस् बेसिक ट्रेनिंग सेंटर,
श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी (कोल्हापूर)

एकमेव विक्रेते

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

सहा खंडांचा
**स्वातंत्र्यभारत**

**बंगालची सत्यकथा**
जालियनवाला बाग
दांडीयात्रा
'नऊ ऑगस्ट'
फ़ासीची शोककथा
सन १८५७

4042

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]
प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९५६

**किंमत दीड रुपाया**

वेष्टणचित्र : दीनानाथ दलाल

प्रकाशक : रघुनाथ गणेश आगटे,
आदर्श वाङ्मय प्रकाशन करितां,
सातारा.

मुद्रक : शि. गो. भावे, मॅनेजिंग डायरेक्टर
मुद्रणस्थळ : विमा मुद्रक आणि प्रकाशक लि. यांचा
विमा छापखाना, सातारा.

'स्वातंत्र्यभारत'चा
पुढील खंड
**जालियनवाला बाग**
कत्तलीची व गांधी
युगाच्या पहांटेची
उद्बोधक रोमहर्षक
इतिहास कथा

# संपादकीय निवेदन

**बंगालची सत्यकथा** हा आमच्या संकलित सहा खंडात्मक ' स्वातंत्र्य-भारत ' इतिहासकथेंतील एक अत्यंत महत्त्वाचा खंड होय. लोकमान्य टिळकांच्या पांखरछायेखालीं उदयाला आलेल्या भारतीय दहशतवादी क्रांतिकारक हुतात्म्यांच्या रक्तानें रंगलेली ही रोमांचकारी ऐतिहासिक सत्यकथा आहे. पुण्यांत प्लेगचा बंदोबस्त करण्याच्या नांवावर आबालवृद्ध रयतेवर अनन्वित जुलूम करणारा रँड, त्या रँडचा खून करणारा हुतात्मा चाफेकर ( सन १८९८ ); भारतांतील पहिल्या राजकीय बॉंबस्फोटाचा प्रणेता हुतात्मा खुदीराम बोस ( सन १९०८ ); विलायतेंत सर कर्झन वायलीचा भर जमावांत गोळी झाडून बळी घेणारा हुतात्मा मदनलाल धिंग्रा ( सन १९०९ ); नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा भर नाटकगृहांत गोळी घालून वध करणारा हुतात्मा अनन्त कान्हेरे ( सन १९०९ ); अशा मरून चिरंजीव झालेल्या स्वातंत्र्यभक्त हुतात्म्यांच्या उज्ज्वल आत्मयज्ञानें उजळलेली ही समरकथा आहे. सन १८५७ नंतर क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांच्या सशस्त्र बंडापासून सन १९०५ सालीं बंगालची फाळणी करणाऱ्या इंग्रज सरकारला नाक मुठींत घेऊन सन १९११ सालीं ती फाळणी रद्द करावी लागली, तेथवरचा भारताचा स्वातंत्र्यलढा या समरकथेंत सप्रमाण कथन करण्यांत आला आहे. इंग्रजांनी भारतांत आपल्या साम्राज्यसत्तेचा पाया प्रथम घातला तेव्हांपासून म्हणजे प्लासीच्या लढाईपासून ( सन १७५७ ) भारत तारीख १५ ऑगस्ट १९४७ रोजीं स्वतंत्र होईपावेतोंची बृहत् इतिहासकथा म्हणजेच प्रस्तुत संकलित ' स्वातंत्र्य-भारत ' होय.

वस्तुतः या संकलित ' स्वातंत्र्यभारत 'मधील प्रस्तुत ' बंगालची सत्यकथा ' ही कालानुक्रमानें तिसरी इतिहासकथा होय. परंतु एक तर ह्या संकलित सहाही इतिहासकथा आपापल्या परीनें सर्वतोपरी स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहेत. त्यांतली कोणतीही कथा घेतली तरी तिचे धागेदोरे मागच्या पुढच्या इतिहासकथांत गुर-फटलेले असे मुळींच ठेवण्यांत आलेले नाहींत. त्यामुळें यांतील कोणतीही कथा कशीही मागेपुढें प्रसिद्ध झाली व वाचली तरी तिच्यांतील औचित्य व स्वारस्य सदाफुलीसारखें नित्य ताजें टवटवीतच असणार.

दुसरें, पुढील वर्षी सन १९५७ सालीं आपला भारत सन १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची शतसांवत्सरी विराट स्वरूपांत साजरी करणार आहे. त्या भारताच्या स्वाभिमानोत्सवांत फूल ना फुलाची पाकळी वांटा यथार्थानें उचलतां यावा यासाठीं या संकल्पित 'स्वातंत्र्यभारत' ग्रंथामधील '**प्लासीची शोककथा**' आणि '**सन १८५७**' या आरंभींच्या दोन समरकथा पुढें त्या उत्सवप्रसंगीं प्रसिद्ध केल्या जातील. सन १७५७ चा प्लासीच्या लढाईचा प्रसंग हा भारताच्या स्वतंत्रतेला लागलेला परक्या इंग्रजी अंमलाचा गळफांस होय. आणि तो गळफांस तोडण्याचा भारताचा नमनाचा सार्वराष्ट्रीय प्रयत्न म्हणजेच सन १८५७ चें स्वातंत्र्यसमर होय. यास्तव ह्या दोन इतिहासकथा त्या स्वातंत्र्यसमराच्या शतसांवत्सरीला पुष्पांजलि म्हणून सादर अर्पण करण्यांत कांहीं आगळें वैशिष्ट्य आहे हें वाचकांना न सांगतांही पटण्याजोगें आहे.

सन १८५७ च्या स्वातंत्र्यासमरावर प्रस्तुत लेखकाची '५७ ची सत्यकथा' मागील वर्षी प्रसिद्ध झालेली आहेच. तरी देखील १८५७ चें महत्त्व अशा मर्यादेंत न सामावण्याइतकें अमर्याद अवीट आहे. वरील संकल्पानुसार 'सन १८५७' ही 'स्वातंत्र्यभारत' मधील इतिहासकथा वाचकांच्या हातीं पडेल तेव्हां याची प्रचीति येईलच.

प्रस्तुत 'स्वातंत्र्यभारत' साधारणपणें चांगलें लिहितां वाचतां येणाऱ्या साक्षर प्रौढ स्त्रीपुरुषांसाठीं आहे, तसाच तो विशेषतः महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापावेतोंच्या विद्यार्थीवर्गासाठींही आहे. भारतानें आपलें गमावलेलें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं गेल्या अडीचशें वर्षांत केलेले आत्मयज्ञ, लढलेले लढे, हा सारा इतिहास स्वतंत्र भारताला आपलें स्वातंत्र्य टिकवून अधिकाधिक वैभवशाली व विश्वप्रिय होण्यासाठीं प्रगतिपथानें पुढें जातांना मार्गांत तेवत्या प्रकाशमान नंदादीपासारखा उपयोगी पडावा, अशी जिव्हाळ्याची शुभ अपेक्षा व आकांक्षा आहे. प्रस्तुत इतिहासकथेचें स्वाध्यायादि संपादन जसें विद्यार्थ्यांना तसेंच सर्वसाधारण वाचकांनाही घरच्या सोबतीसारखें सोईचें वाटेल.

**संपादक**

नगर वाचनालय सातारा
... अभिलेखीकृत

# बंगालची सत्यकथा

## प्रकरण पहिलें

## महाराष्ट्राची आघाडी

### १ : वासुदेव बळवंत फडके

इंग्रजी राजवटीचा भारताच्या स्वातंत्र्यावरील घाला आपणांला चांगलाच जाणवूं लागला तो अठराव्या शतकाच्या आरंभापासून. इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनी बंगालमध्यें पाय रोंवून बसूं लागली, तेव्हांपासून सन १८५७ सालीं प्लासीच्या लढाईंत हा इंग्रजी राजवटीचा पहिला मरणघाव भारताच्या जिव्हारीं बसला.

या इंग्रजी राजवटीच्या जोखडाखालीं परतंत्र झालेल्या भारतांत त्या जुलमी राजवटीशीं 'अठराशें सत्तावन' चा पहिला लढा आपण दिला. आपण त्यांत हरलों हें जरी खरें, तरी त्या लढ्यामुळें भारतावरची कंपनी सरकारची पिळणुकीची राजवट गेली. आणि तिच्या जागीं बादशाही इंग्रजी राजवट आली. इंग्लंडच्या गादीवर तेव्हां व्हिक्टोरिया राणी राज्य करीत होती. तिनें सत्तावनचा लढा ओसरल्यावर शांतिपाठ गात गात भारताचें शांतवन करीत, एक जाहीरनामा काढला. तोच इतिहासांतील राणीचा जाहीरनामा. त्या जाहीरनाम्यानुसार राणीनें भारताची बादशाहीण हा किताब धारण केला. भारतांत टोलेजंग राज्यारोहण समारंभही झाला.

हा राजवटीचा खांदेपालट नवा नवा होता, तोंवर भारतांत आपणांला तो जरा बरा वाटला. भारताचें बरें भलें म्हणून जरी ह्या बादशाही इंग्रजी राजवटींनेंही फारसें कांहीं केलें नाहीं, तरी इंग्रजी राजवटीच्या

आत्रादानीसाठीं कां होईना परंतु भारतांत कांहीं चांगल्या गोष्टी केल्या. राज्यकारभाराचा प्रचंड गाडा ओढायला माणसें हवींत म्हणून कां होईना पण भारतांत हळूहळू कांहींशी शिक्षणाची वाढ केली.

प्रसंग पडला कीं देशांत चटाचट लष्कराच्या हालचाली करतां यायला हव्या. व्यापारासाठीं देशांत आणि बाहेर जातां येतां यायला हवें. मालाची ने-आण करतां यायला हवी. म्हणून कां होईना पण रस्ते झाले, आगगाडी झाली, अशा दळणवळणाच्या सोई झाल्या. देशांत उद्योगधंदे वाढले.

असें कांहींसें इंग्रजांनीं जें स्वतःच्या बऱ्यासाठीं म्हणून केलें तें भारताच्या बऱ्याभल्याला थोडेंफार उपयोगी पडलें.

या साऱ्या उद्योगांत भांडवल इंग्रजांचें, आणि राबणारे-कष्ट करणारे ओझ्याचे * * * आपण हिंदी लोक! असा तो प्रकार होता खरा. व्यापारांत म्हणा, उद्योगधंद्यांत म्हणा, शेतींतही म्हणा, नफ्याच्या आणि शेतसाऱ्यासारख्या करांच्या रूपानें लोण्याचा गोळा इंग्रजांच्या ताटांत, आणि कष्टाळू मोलमजुरीचें ताकाचें पाणी आमच्या ओठीं, असा तो सारा मामला होता.

कंपनी सरकारही तेंच करीत होतें. बादशाही राजवटींतही तोच कारभार 'मागील अंकावरून पुढें चालू' झाला. देशांत शांतता होती, पण मसणवटींतील शांततेसारखी. ती कसली शांतता! सरकारनें शांततेची मारे बढाई मारावी कीं, इंग्रजी राज्यांत माणसानें काठीला सोनें बांधून हिमालयापासून कन्याकुमारीपावेतों कुठेंही अगदीं निर्भयपणें जावें. पण लोकांपाशीं बरोबर न्यायला गुंजभर तरी सोनें असेल तर ना? इतका देश त्यांनीं पिळून पिळून दरिद्री केलेला. असली शांतता आणि सुव्यवस्था देशाच्या काय अंगीं लागणार? कोणताही देश परतंत्र-गुलाम लौकर होतो. स्वातंत्र्य गमवायला वेळ लागत नाहीं. पण गमावलेलें स्वातंत्र्य कमावायला फार वेळ लागतो. फार कष्ट पडतात. फार हालअपेष्टा भोगाव्या लागतात. भयंकर दिव्यें करावीं लागतात.

पण तें सारें करायलाच हवें. न करून कसें चालणार? आपणांला जर माणसें म्हणून माणसांसारखें जगायचें, तर स्वतंत्र व्हायला हवें. स्वतंत्र होण्यासाठीं इतकी सारी यातायात करायलाच हवी. स्वातंत्र्यासाठीं लढणें कांहीं सोपें नाहीं. त्यांत कधीं हार तर कधीं जीत असें चालायचेंच.

परक्यांचें राज्य म्हटलें, कीं तें सुराज्य असलें तरी देखील नको. स्वराज्याची सर सुराज्याला यायची नाहीं. आणि इथें भारतांत आपल्या वांट्याला आलेलें इंग्रजी परराज्य हें तर सर्व बाजूंनीं कुराज्य होतें. आम्हांलाच मरेमरेतों राबवून, आमचेंच रक्त सांडून, आमच्याच छाताडावर उभारलेली ही आमची माणुसकी शोषून खाणारी जुलमी इंग्रजी राजवट. किती दिवस सहन करायचें हें?

भारत जागा झाला. त्याच्या मनाची तयारी झाली. तो मनांत आणि जनांतही बोलूं लागला, "बस्स! आजवर इंग्रजी राजवटीचा अनुभव घेतला तेवढा पुरें झाला. आतां तिला कोंपरापासून नमस्कार. चला, उठा आतां, पडा घराबाहेर मायदेशाचे पांग फेडायला. बाहेर पडाल ते अशी प्रतिज्ञा करून बाहेर पडा कीं, आपला भारत इंग्रजी राजवटीच्या जोखडाखालून सोडविल्याखेरीज घर–दार–संसार साऱ्यावर तुळशीपत्र. आतां भारताला स्वतंत्र करीपावेतों जिकडे पुढा तिकडे मुलुख थोडा. तोंवर घरच्या वाटेकडे ढुंकून पाहावयाचें देखील नाहीं. आतां आम्हीं पुन्हा आपल्या घरदारसंसाराकडे वळूं तर स्वातंत्र्याचें विजयी निशाण फडकवीत स्वतंत्र भारताचे नागरीक म्हणूनच वळूं. तोंवर सर्वांना आमचा नमस्कार!"

असा मायदेशासाठीं मरायला तयार होऊन जीवन–सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून स्वातंत्र्याचें निशाण फडकवीत घराबाहेर पडलेला आपला आघाडीचा स्वातंत्र्यवीर हुतात्मा वासुदेव बळवंत फडके.

'सत्तावनची सत्यकथा' घडतां घडतां वासुदेव बळवंतांनीं शाळेंत शिकतांना वयाच्या बाराव्या वर्षीं प्रत्यक्ष ऐकली होती. आणि

कर्णोपकर्णीं थोडीफार अनुभवलीही होती. स्वतंत्र्याच्या त्या पहिल्या लढ्यांतला पराजय त्यांच्या मनांत शल्यासारखा डांचत होता.

तें शल्य उपटून टाकण्यासाठीं त्यांनीं पुन्हा लढा देण्याचा संकल्प केला. शिवाजीसारखें वाकळ--घोंगडी--काठी--लंगोटीवाल्या रांगड्या शिपायांचें सैन्य उभारलें. आणि लढा द्यायला १ ८७९ सालाच्या आरंभींच सुरुवात केली. त्यांना फार दिवस लढायला मोकळीक मिळाली नाहीं. त्यांचा लढा हां हां म्हणतां इतका भरारला कीं तो सहा महिन्यांतच सरकारच्या डोळ्यावर आला. ते बंडखोर ठरले. पकडले गेले. त्यांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. सरकारनें एडनच्या काळ्या पाण्यावर तुरुंगांत त्यांना नेऊन टाकलें. सन १८८६ सालीं तुरुंगांतच त्यांची जीवनयात्रा संपली.

पण म्हणून कांहीं त्यांनी इंग्रज सरकारशीं पुकारलेला स्वातंत्र्याचा लढा संपला नाहीं. तो सुरूच होता. उघड्या सामन्यांत आपला निभाव लागत नाहीं असें पाहतांच फडक्यांमागोमाग स्वातंत्र्याचे वीर भूमिगत होऊन गनिमी काव्यानें लढूं लागले.

असा हा लढा पसरतां पसरतां देशभर सगळीकडे पसरला. धूर तर सगळीकडून निघूं लागला. परंतु आग नक्की कुठें कशी लागते आहे याचा थांगपत्ता कुणाला कांहीं केल्या लागेना.

## २ : काँग्रेस जन्माला आली

"ही आग लागते तरी कुठें आणि कशी ?" अशी चिंता कोणाला ? देशाचा विचार करील त्याला.

ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम हा असा एक विचारी गृहस्थ, सेवानिवृत्त वडा सनदी अधिकारी होता. गोराच खरा, पण गोऱ्या दिलाचा होता. सर्वांचें भलें व्हावें या सदिच्छेनें भारताची चिंता वाहणारा होता. त्यालाही सगळीकडून धूर दिसत होता. पण असें नक्की कळेना कीं आग कुठें लागली आहे तिचा हा धूर ?

त्याचा शोध घेण्यासाठीं ह्यूमसाहेबांच्या बंगल्यावर देशांतील ठिकठिकाणच्या थोर लोकांची खासगी सभा भरली होती.

तेवढ्यांत गुप्तपोलिस खात्यांतील एक गोरा अधिकारी पत्रांचें एक पुडकें घेऊन आला.

"महाराज! देशांत होऊं घातलेल्या बंडाचा हा आणखी पुरावा हातीं लागला आहे." तो अधिकारी तें पुडकें ह्यूमसाहेबापुढें ठेवून म्हणाला.

चिडलेले लोक कांहींतरी करायला अधीर झाले आहेत, हें ह्यूमसाहेब आपल्या मतें आजवर नीट जाणत होता. त्यापेक्षां ही फारच पुढची पायरी होती.

"खून, मारामाऱ्या, सावकारांच्या घरांवर दरोडे, लुटालूट यांनीं साऱ्या देशाचें जीवन अगदीं तडावून गेलें आहे." त्या मंडळींपैकीं एक म्हणाला.

"आमचा मुंबई इलाखा तर यापेक्षांही खवळला आहे." दुसरा एक मुंबईकर पुढारी म्हणाला, "मुंबईत खड्यापाड्यांतूनही ही असंतोषाची आग धुमसूं लागली आहे. सारा शेतकरी बिथरला आहे. नगरपुण्याच्या टापूंत तर भीक नको पण कुत्रा आवर अशी सावकारांची गत होऊन गेली आहे. शेतकरी मारे खुशाल जमावाजमावानें सावकारांच्या घरांत घुसतात. पेट्या–कपाटें फोडून दप्तरें काढतात. त्यांतले कर्जरोखे सावकाराला देऊन, दमदाटी देऊन आपल्या हातानें फाडायला लावतात."

"आणि ते सावकार मुकाटपणें ते फाडतातही." सभेंतील दुसरा एक गृहस्थ म्हणाला.

"न फाडून काय करतील? बाप दाखव, नाहींतर श्राद्ध कर असा शेतकऱ्यांचा दंडेलीचा न्याय. सावकार बऱ्या बोलानें दस्तैवज फाडायला राजी झाला नाहीं तर त्या दस्तैवजासकट सारें दप्तर जाळून टाकायला ते लोक कमी करणारे नव्हते. त्यांना काय? ते बेफाम खवळलेले. दप्तर जाळतील, घरही जाळतील, आणि सावकार खळखळ करूं लागला कीं त्यालाही त्या घरांत कोंडून जाळायला कमी करायचे नाहींत.

ह्यूमसाहेब त्या पुडक्यांतील पत्रें नजरेखालीं घालतां घालतां तें संभाषण ऐकत होता.

"देशांतील परिस्थिति फारच बिघडलेली दिसते. काल परवां पत्रें हातीं आलीं त्यांतही तेंच. आजच्यांतही तेंच. असाच आणखी थोडा काळ जाऊं दिला, तर ह्या खून–मारामाऱ्यांचें आणि लुटालुटीचें रूपांतर सत्तावनच्या बंडांत व्हायला उशीर लागणार नाहीं" असें म्हणत त्यानें तें पत्रांचें पुडकें मंडळींपुढें ठेवलें. तो अनेक धर्मगुरु आणि त्यांचे शिष्य यांच्यांत क्रांतीच्या उत्थापनाबाबत चाललेला गुप्त पत्रव्यवहार होता.

सत्तावनच्या क्रांतीचीं बीजेंही अशींच गुप्तपणें देशभर पेरण्यांत आलीं होतीं.

"देशांतील तरुण मध्यमवर्ग जिकडून तिकडून खवळून उठतो आहे. तो देशाच्या आणि धर्माच्या नांवावर सर्व देशभर धर्मयुद्धाच्या हांका देत सुटला आहे." ह्यूमसाहेब त्या पत्रांकडे नजर टाकीत म्हणाला.

"ह्या लढयाच्या हांका खेडोपाडीं लोकांच्या कानापावेतों जाऊन पोहोंचत आहेत. खून, मारामाऱ्या, जाळपोळी, लूटमाऱ्यां, सावकारांच्या घरांवर दरोडे, हे त्या हांकेला मिळालेले प्रतिसाद आहेत." एकजण म्हणाला.

"लोकांना खरोखर काय पाहिजे आणि काय नको हें सरकारला नीट कळत नाहीं. लोकांचीं गाऱ्हाणीं सरकारच्या कानापावेतों जाऊन पोहोंचूं शकत नाहींत. त्यामुळें सरकारला लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करायची संधीच मिळत नाहीं. आणि लोकांना मात्र वाटतें कीं सरकार आपणांवर जुल्म करतें; आपल्या गाऱ्हाण्यांकडे दुर्लक्ष करतें. असे गैरसमजानें गैर-समज वाढतात. आणि लोक व सरकार यांच्यांतील तेढ विकोपाला जाते. यावर मला एक उपाय सुचतो." ह्यूमसाहेब म्हणाला.

"तो कोणता सर्वांनीं उत्सुकतेनें विचारलें.

"नाहीं तरी आज मुंबई, मद्रास, कलकत्ता अशा शहरांतून लोक-मताला वाचा फोडणाऱ्या सार्वजनिक संस्था आहेतच ना? त्या सगळ्या

राजकीय चळवळींची एकजूट करून कलकत्त्याची इंडियन असोसिएशन, मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन, मद्रासची महाजन सभा, या साऱ्या संस्थांची जर आपणांला एकजूट करतां आली, आणि ठिकठिकाणीं पांगलेल्या तरुण कार्यकर्त्यांना एकमुखानें आपलीं गाऱ्हाणीं बोलून दाखवितां आलीं, तर त्यांना राष्ट्राच्या एकमुखी मागणीचें स्वरूप येईल. सरकारलाही मग त्याचा अधिक चांगला विचार करतां येईल." ह्यूमसाहेब म्हणाला. सर्वांना तें पटलें.

ह्यूमसाहेब पुढें आणखी म्हणाला, "लोक आणि सरकार यांना एक-मेकांचें भय आणि अविश्वास वाटूं नये यासाठीं, मी तर म्हणतों कीं, ह्या मुख्य राष्ट्रीय संस्थेपुढें प्रांतोप्रांतींच्या संस्था आपलीं गाऱ्हाणीं प्रांतिक परिषदा भरवून मांडतील."

सर्वांची त्याला मान्यता मिळाली.

ह्यूमसाहेब वृत्तीचा भला माणूस. त्याला भारताचें बरें व्हावें असें वाटे. तें अशासाठीं, कीं भारताचें बरें तेंच इंग्रजी साम्राज्याचें बरें. नाहींतर एरव्हीं एवढेंसें टीचभर इंग्रजी राष्ट्र. जुन्या मुंबई इलाख्याएवढें देखील असेल किंवा नसेल. त्याच्या साम्राज्यवैभवाचा सारा दिमाख खंडप्राय भारताच्या जिवावर. भारत हातचा गेला, कीं इंग्रजी साम्राज्य फुटलेल्या फुग्यासारखें पिचलेंच म्हणून समजावें. हें ह्यूमसाहेब जाणून होता. व्हाइस-रॉय लॉर्ड डफरिनही जाणून होता.

ह्यूमसाहेब बोलला तें डफरिनला पटलें. त्याचें मत असें कीं, विला-यतेंत जसा सरकारविरोधी पक्ष असतो, तसा भारतांत नाहीं. तो असला पाहिजे. त्यासाठीं तो म्हणे, "देशांतील राजकारणाचा विचार करणाऱ्या हिंदी पुढाऱ्यांनीं वर्षांतून एकवार एकत्र जमावें. सध्यांच्या राज्यपद्धतींत काय दोष आहेत ते त्यांच्या मतें त्यांनीं दाखवून द्यावे आणि ते दोष सुधारण्याचे उपाय सुचवावे. अशी एखादी योजना सगळ्या राष्ट्राची मिळून असावी."

"पण एक मात्र." व्हाइसरॉयनें ह्यूमसाहेबाला सावधगिरीची सूचन

दिली, "मी व्हाइसरॉयच्या जागेवर असेपावेतों माझें नांव बाहेर फुटतां कामा नये."

अशी योजना त्या दोन बड्या गोऱ्या सरकारी गृहस्थांच्या विचारानें ठरली. तिचेंच नांव कॉंग्रेस. तीच आपली भारतीय राष्ट्रसभा.

कॉंग्रेसचा जन्म सन १८८५ सालीं झाला. कॉंग्रेसचें पहिलें अधिवेशन मुंबईला भरलें. भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळींत ज्यांनीं आपलें नांव गाजविलें, अशी किती तरी प्रांतोप्रांतींची थोर थोर मंडळी या अधिवेशनाला हजर होती. पुढें न्यायमूर्ति झालेले पुण्याचे महादेव गोविंद रानडे, दादाभाई नौरोजी, पुढें न्यायमूर्ति झालेले ना. तेलंग, मेथा, वाच्छा, मलबारी, चंदावरकर, ह्यूम, सुधारकाग्रणी आगरकर, मद्रासचे जी. सुब्रह्मण्य ऐयर, कलकत्त्याचे बानर्जी, सेन, डॉ. भांडारकर अशी थोर थोर मंडळी कॉंग्रेसची वास्तुशांति करणारी होती.

तेव्हां कॉंग्रेस कशी होती? कौरव-पांडवांचें एक कुटुंब त्यांच्यांत राज्यासाठीं भाऊबंदकी माजण्यापूर्वीं गुण्यागोविंदानें आरंभीं कधीं वागत असेल तशी.

कौरव-पांडवांत नंतर महान भारतीय युद्ध झालें. भारताचें रणक्षेत्र म्हणून कुरुक्षेत्र तेव्हांपासून इतिहासपुराणांना माहीत झालें. त्या कुरुक्षेत्रावर कौरव-पांडवांचे दोन परस्परविरोधी पक्ष आपापले दळभार उभारून प्राणपणानें लढले.

तो महाभारताचा प्राचीन इतिहास जसा रोमांचकारक आहे, तसाच पण किंचित् निराळ्या घटनांनीं भरलेला आपल्या कॉंग्रेसचा आजवरचा इतिहासही अंगावर रोमांच उभे करणारा आहे.

कॉंग्रेसच्या स्थापनेच्या वेळीं प्रांतोप्रांतींची सारी पुढारी मंडळी आरंभींच्या कौरव-पांडवांसारखी एकदिलानें वागतांना आपण पाहिली ना? ती सारीच कांहीं मनानें आणि विचारांनीं एकसारखी नव्हती. त्यांत सोनें होतें, चांदी होती. तांबें-पितळ होती, हिरेमाणकें होतीं, आणि

गारगोट्याही असतील. तशाच नाना परी त्यानंतर वेळोवेळीं कॉंग्रेसला येऊन मिळणाऱ्या मंडळींतही असतील.

माणूस कोण कसा आहे याची पारख प्रसंगानें होते. ती कसोटी लागण्याचा प्रसंग जोंवर आला नाहीं, तोंवर कोण कसा आहे, कां आहे, हें लोकांना तरी कसें माहीत होणार?

सरकारला मात्र तेव्हां येवढें माहीत होतें कीं देशांतील कर्तबगार मंडळी सालोसालीं कॉंग्रेसच्या मेळाव्याच्या वेळीं आपणांला आयती नीट पारखून घेतां येतील. आणि त्यांतलीं आपणांला जवळचीं, आपल्या उपयोगाचीं माणसें वेंचून हाताशीं धरतां येतील. जवळ करतां येतील. अशा खात्रीशीर निवडक मंडळींना हाताशीं धरून आपणांला भारताचा राज्यकारभार चालवतां येईल.

हें सरकारचें ठीक होतें. ठराव-अर्ज-विनंत्यांच्या, मनधरणीच्या धोरणानें आपणांला काय हक्क पाहिजेत ते सरकारच्या पोटांतील पाणी हलूं न देतां गोडीगोडीनें मागून घ्यावे, असें आरंभींच्या कॉंग्रेसचें म्हणजे कॉंग्रेसच्या पुढारी मंडळींचें धोरण होतें तेंही त्यांच्या परीनें ठीक होतें.

पण इंग्रजी राजवटीला विटलेली आणि घरदार–संसारावर पाणी सोडून मायदेशाला स्वतंत्र करण्यासाठीं प्राणपणानें लढायला फकिरी बाण्यानें बाहेर पडलेली तेजस्वी तरुण मंडळी होतीच कीं! त्यांना कॉंग्रेसचें हें पडखाऊ मिळमिळीत धोरण कसें मानवणार? त्या मंडळींना स्पष्ट दिसूं लागलें कीं अशा मंदगतीच्या आरामशीर धोरणानें आपला पल्ला येणार नाहीं. सरकार अशानें वठणीवर येणार नाहीं. देश गुलामगिरींतून सुटणार नाहीं. लोक सुखी होणार नाहींत.

लोक सुखी होणार नाहींत हें सांगायला सरकारी पिळणुकीचा कारभार अपुरा पडेल म्हणूनच कीं काय, सन १८९६ सालीं भयंकर दुष्काळ देशाच्या राशीला आला. तो देखील सरकारनेंच आपल्या राशीला आणला, असा सर्वत्र लोकांचा समज होता. आणि तो अगदीं चुकीचा नव्हताही.

'या वर्षी दुष्काळ पडणार' असें विचारवंत लोक बोलूं लागले. सरकारी अहवाल प्रसिद्ध होऊं लागले. वर्तमानपत्रांतून ओरड होऊं लागली.

"मेलें मेंढरू आगीला भीत नाहीं, तशी आमची गत झाली आहे." आधींच सर्व प्रकारच्या हलाखीनें गांजलेले लोक उद्वेगानें आणि निराशेनें चिडून आपसांत बोलूं लागले, "दुष्काळ नव्हता तेव्हां तरी काय सुकाळ होता! तो आतां दुष्काळ पडून काळ आणखी बिघडणार आहे!"

## ३ : दुष्काळांत तेरावा महिना!.... प्लेग!

पूर्वी वीस वर्षांपूर्वी सन १८७६ सालींही देशभर असाच भयंकर दुष्काळ पडला होता. तेव्हांचें मुंबईचेंच उदाहरण घेऊं. त्या दुष्काळांत होरपळून निघालेली जुनी वडील मंडळी ह्या ताज्या दुष्काळाचे तडाखे सोसायला हयात होती. ती मंडळी नव्या पिढीला सांगूं लागली, "हा आजचा कठीण काळ पाहिला कीं, आमचें आम्हांलाच वाटूं लागतें, वीस वर्षांपूर्वी आम्हीं भोगला तो 'दुष्काळ' नव्हताच. आजच्याइतकी सगळीकडून हलाखी तेव्हां आम्हांला जाणवली नव्हती."

त्या मंडळींचें म्हणणें खरेंच होतें. ह्या आजच्या दुष्काळाच्या मानानें तो सुकाळच होता. असें ह्या इंग्रजी राजवटींत दुष्काळ केव्हां पडतो आणि सुकाळ केव्हां असतो हेंही कळेनासें झालें होतें.

आणि लोकांचें नशीबही असें खडतर, कीं दुष्काळ जो आला तोही सरळ चालीनें आला नाहीं. मृगाचा पाऊस असा बेसुमार पडला कीं जिकडे तिकडे पाणीच पाणी. शेतवाडी, गुरेंढोरें, गोरगरिबांचीं घरेंदारेंही वाहून नेणारें जगबुडें पाणी! असा मृगाच्या तोंडाला पडला, तो ओला दुष्काळ.

तो पाऊस कसाबसा ओसरला. लोक जरा ठाकठीक शेतवाडी करूं लागले. मोठ्या आशेनें आकाशाकडे पाहून हात जोडून पावसाला विनवूं लागले, "बाबा! आतां रब्बीच्या हंगामाखेरीज येऊं नकोस."

नगर वाचनालय सातारा



पण पाऊस रब्बीचा हंगाम विसरला. आणि 'येऊं नकोस' एवढेच लोकांचे शब्द ध्यानीं ठेवून जो गेला, तो पुन्हां आलाच नाहीं! हस्तनक्षत्र लागलें तेंही अगदीं कोरडें ठणठणीत. असा हा कोरडा दुष्काळ.

त्या सालच्या संवत्सराचें नांवही दुष्काळी हलाखीला साजेसेंच होतें; 'दुर्मुखनाम संवत्सरे'. लोकांना नव्या वर्षाच्या आरंभींच भय वाटूं लागलें होतें कीं हें संवत्सर आपलें नांव खरें करतें कीं काय?

तसेंच झालें. 'दुर्मुख' नाम संवत्सर आपल्या नांवाला जागलें. त्यानें उभा देश अगदीं दुर्मुखलेला, दुःखी करून सोडला.

जें मुंबई–महाराष्ट्रांत तेंच साऱ्या देशांत. भुकेची आग सगळी-कडे सारखीच.

"अहो आतां आम्हीं जगावें तरी कसें?" भूक भूक होऊन अगदीं हवालदिल झालेले लोक पुढाऱ्यांना विचारू लागले. सरकारच्या नांवानें हांका मारूं लागले.

इतका मुंबईभर आकांत उडाला, तरी सरकारला दुष्काळाची दाद नाहीं! मुंबई सरकारच्या अहवालांत दुष्काळाचा उल्लेखही नाहीं! सर–कारला दुष्काळाची दाद लागूं लागली केव्हां? साऱ्या इलाखाभर– साऱ्या देशभर बोंबाबोंब झाली, शेतकऱ्यांचीं गुरेढोरें कडब्याच्या किंमतीनें विकलीं जाऊं लागलीं, आणि कडबा सोन्याच्या भावानें विकला जाऊं लागला, तेव्हां!

## ४ : दुष्काळापाठोपाठ प्लेग आणि प्लेगच्या पाठोपाठ रँड

वाल्टर चार्ल्स रँड हा पुणेंकरांनाच काय पण साऱ्या महाराष्ट्राला अगदीं नवखा नव्हता. तो सातारा, रत्नागिरी येथें बडा सनदी नोकर म्हणून आपला करडा अंमल गाजवून आला होता. अधिकाराच्या जोरा-वर लोकांना सतावून सोडणें, नखाएवढ्या खऱ्याखोट्या अपराधाबद्दल अपराध्याला कुऱ्हाडीएवढी शिक्षा देणें, ही त्याची जणूं करमणूक होती.

असला आडदांड, मदोन्मत्त, निष्ठुर, गोरा हुकुमशहा पुण्यांतील प्लेगच्या बदोबस्तासाठीं सरकारनें नेमला आहे हें लोकांना कळलें. त्याच दिवशीं लोकांनीं भाकीत केलें, कीं प्लेगच्या यातना भोगून मरण आलेलें पत्करलें; पण ह्या रँडचा जुलूम नको, असें म्हणण्याची पाळी येणार.

तोच लोकांचा अमंगळ तर्क खरा झाला. प्लेगच्या बंदोबस्ताच्या नांवावर रँड आणि त्याचे सहकारी गोरे सोजीर यांनीं आधींच प्लेगच्या सांथीनें अगदीं पिडलेल्या पुणेंकरांचा मनस्वी छळ मांडला.

पुण्यांत टिळकांचा 'केसरी', आगरकरांचा 'सुधारक' हीं पत्रें असह्य बेदाद जुलुमाबद्दल परोपरीनें सरकारची कानउघाडणी करीत होतीं. तिकडे लक्ष द्यायला सरकारला सवड कुठें होती! नाहीं म्हणायला निराळ्याच एका दुष्ट हेतूनें मात्र सरकार त्या कानउघाडणीकडे डोळ्यांत तेल घालून पाहत होतें. ह्या चळवळ्या–आगलाव्या पत्रांना आणि त्यांच्या संपादकांना खटले भरून तुरुंगांत डांबतां येण्याइतका ओढून ताणून तरी राजद्रोह हंडीबागाच्या आंब्याच्या झाडासारखा उबवतां येतो कीं नाहीं?

आठ नऊ महिने पुणेंकरांना असा अगदीं नको जन्मसा करून प्लेग एकदांचा १८९७ च्या उन्हाळ्यांत ओसरला. लोकांनाही त्या दुःखाचा आणि छळाचा मनुष्यस्वभावानुसार वाढत्या दिवसगतीनें जरा जरा विरंगुळा वाटूं लागला.

परंतु तो तेजस्वी सनातनी तरुण दामोदर चाफेकर प्लेगच्या कहरांत रँड आणि त्याचे गोरे हस्तक यांनीं माणुसकीला काळीमा लावण्यासारखी केलेली जुलुमजबरदस्ती विसरला नव्हता. सच्चा दिलाचा कोणीही तें कसें विसरेल? आज किती दिवस तरी तोच एक विचार तळपत्या तरवारीच्या पात्यासारखा अंःकरणांत धगधगत होता. रँडच्या रक्ताखेरीज ती आग विझणारी नव्हती.

ते जून महिन्याचे दिवस. राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव पुण्यांत गव्हर्नरच्या बंगल्यावर थाटामाटानें साजरा व्हावयाचा होता.

आणखी कांहीं दिवस गेले. गणेशखिंडींतील गव्हर्नरच्या बंगल्या-वरचा उत्सव अगदीं जवळ आला. त्याची आमोदप्रमोदाची आणि रोषणाईची तयारी झपाट्यानें सुरू होती.

इकडे चाफेकर आणि त्याची साथीदार मंडळीही झपाट्यानें रँडचा समाचार घेण्याच्या तयारीला लागली होती.

"बस्स! गव्हर्नरच्या बंगल्यावर २२ जूनला खाशी मेजवानी होणार आहे. त्या मेजवानीला रँड जाणार आहे. त्याला तिथें गांठायचा. मोकळा सुटूं द्यायचा नाहीं!" त्यांचा बेत ठरला.

## ५ : रँड ठार झाला; दामोदर फांशी गेला!

ती राणीच्या राज्यारोहण महोत्सवाची तारीख २२ जून १८९७ उजाडली. तिकडे गणेशखिंडींत उत्सव साजरा करण्याची सर्व मनपसंत तयारी झाली.

तशीच इकडे चाफेकर, रानडे यांची तो उत्सव आपल्या संकल्पा-प्रमाणें साजरा करण्याचीही जय्यत तयारी झाली.

रँड ज्या घोडागाडींतून जातो येतो त्या गाडीचा रंग कसला आहे, घोडा कोणत्या रंगाचा कसा आहे, सारी टेहळणी अगदीं रीतसर झाली होती.

अशा जय्यत तयारीनिशीं त्या दिवशीं दिवस मावळल्यावर दामोदर चाफेकर आपल्या सहकाऱ्यांसह शिकार साधण्यासाठीं गणेशखिंडीच्या रस्त्यावर जाऊन पोहोंचला.

त्या दिवशीं चतुःशृंगीच्या आणि आजूबाजूच्या टेकड्यांवर पाल्या-पाचोळ्याचे ढिगारे जमवून उत्सवाच्या आनंदप्रदर्शनार्थ होळ्या पेट-विण्यांत आल्या होत्या. गणेशखिंडीच्या आजूबाजूच्या भागांत दारू-कामाची शोभा रात्रींच्या काळोखाच्या पार्श्वभूमीवर खुलून दिसत होती.

खुद्द गव्हर्नरच्या राजगृहावर तर पाहणारांच्या डोळ्यांचें पारणें फिटावें अशी भपकेबाज रोषणाई करण्यांत आली होती.

गणेशखिंडीच्या रस्त्यावर मात्र काळोख होता. त्या काळोखांत राजगृहापासून थोड्या अंतरावर दामोदर आणि बाळकृष्ण हे दोघे सावधपणानें दबा धरून बसले. वासुदेव आणि रानडे हे दोघे त्यांच्या जवळपास नजर ठेवीत. वेळ आलीच तर पुढें होण्याच्या तयारीनें थांबले होते.

राजगृहापासून थोड्याशा अंतरावर रस्त्याच्या डावीकडे गर्द झाडी होती. बंगल्यांचा आणि झाडांचा पुरेसा आडोसा होता. त्या आडोशाला त्या झाडींत ते तिघे रँडची वाट पाहत बसले होते.

तासांमागून तास लोटले. मध्यरात्र उलटली. राजगृहावरून उत्सवाचे मेजवानी, नाचरंग तमाशा वगैरे सारे कार्यक्रम आटोपल्यावर पाहुणे मंडळी आपापल्या गाड्यांतून आपापल्या बंगल्यांकडे निघाली.

त्या गाड्यांत रँडच्या टेहळून ठेवलेल्या गाडीसारखी गाडी गणेशखिंडीच्या उतारावरून येतांना त्या दबा धरून बसलेल्या तरुणांनीं हेरली. आणि पवित्रा मांडून सावधान चित्तानें सावज नेमकें होऱ्यांत केव्हां येतें म्हणून न्याहाळीत उभे राहिले.

गाडी नजरेच्या आटोक्यांत आली. तसा बाळकृष्ण गाडीवर तुटून पडला. त्यानें अचूक नेम धरून गोळी झाडली. गोळी अचूक लागली. पण रँडचा सहकारी आयर्स्ट याला !

तेवढ्यांत त्या गाडींच्या मागोमाग रँड गाडींतून येतांना दामोदरला दिसला. त्यासरशी त्यानें चित्त्यासारखी त्या गाडीवर झडप घातली. गाडीच्या मागच्या पायंड्यावर उभा राहून क्षणार्धांत हातांतील रिव्हाल्व्हर त्यानें रँडच्या पाठीला भिडवीत गोळी झाडली.

गोळी पाठींतून डाव्या फुफ्फुसांतून आरपार विजयी मुद्रेनें निघून गेली. तिचा कार्यभाग साधला. रँडचा मरता मुडदा गाडींतल्या गाडींत कोलमडून पडला.

काळोखाचा फायदा घेऊन ते चौघेही तेथून कुणाच्याही दृष्टीला न पडतां बेमालूम निसटले. दुसऱ्या दिवशीं सकाळपासून खुनी इस-

मांच्या तपासाला जारीनें सुरुवात झाली. धरपकड, झडत्या, तपास, वहिमी लोकांना फरासखान्याच्या वाऱ्या, असा तपासाचा धूमधडाका सुरू झाला.

असे जवळ जवळ तीन महिने लोटले. तरी खुनी तरुण जे पोलिसांच्या आणि सर्वांच्या हातावर तुरी देऊन निसटले होते, ते कांहीं केल्या हातीं लागेनात. परंतु ज्याचा तरवारीनें गळा कापायला सांपडत नाहीं, त्याचा केंसानें गळा कापणारे 'सूर्याजी पिसाळ' आणि 'बाळाजी-पंत नातू' तुळशीच्या बनांत भांगेचीं रोपें रुजावीं तसे ठिकठिकाणीं निपजतातच. तसेच चाफेकर–रानड्यांना फशीं पाडणारे त्यांच्याच बैठकींतील सोबती द्रवीडबंधू त्यांच्याच अस्तनींतील निखारे निघाले. त्यांनीं बक्षिसाच्या आशेनें घात केला.

तेवढ्यांत दामोदर चाफेकरला देवाच्या ठायीं पूज्य असलेले स्फूर्ति-दाते लोकमान्य टिळकही राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल पकडले गेले. त्या-सरसा दामोदरचा उत्साह कोमेजूं लागला.

" लोकमान्यांना सरकारनें पकडलें. आतां आपणांला कुणाचा आधार उरला नाहीं. आपली धडगत नाहीं आतां. सरकार आतां या खुनाच्या कटाचीं पाळेंमुळें खणून काढील. आणि मी नक्की पकडला जाईन. असें लपून छपून किती दिवस राहतां येणार मला ? उगीचच्या उगीच माझ्यामुळें माझ्या मित्रांना मात्र असह्य छळ सोसावा लागतो आहे. मी एकदांचा पकडला गेलों आणि खून कबूल केला म्हणजे बाकीच्यांचा छळ तरी थांबेल. "

असे अगतिकतेचे निराश विचार त्याच्या मनांत घोळूं लागले.

तेवढ्यांत अचानक त्या खोलीवर पोलिसांची धाड पडली. दामोदर तारीख ३० सप्टेंबरला पकडला गेला.

मागाहून त्याला कळलें व त्याच्या बंधूंना, आणि रानडे यांनाही कळलें कीं आपला असा केंसानें गळा कापणारे हे द्रविड. ही फितुरांची गोडगोळी झाडून पोलिसांनीं अशी शिकार मिळविली.

दामोदर चाफेकर असा पकडला गेल्यावर मोकळा थोडाच सुटतो ! निर्लेप निरपराधीं माणसें देखील जिथें एकदां कायद्याच्या फांसांत सांपडलीं कीं कायदेशीर अपराधी ठरून फांसावर लटकणार, तिथें हा तर प्रत्यक्ष खुनी. कायद्यानें गुन्हेगार. त्याच्या बाजूनें अखेरपावेतों त्याला निर्दोषी ठरविण्याचे भगीरथ प्रयत्न लोकांकडून झाले. पण त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं.

अखेर तो फांशीचा नेमलेला दिवस तारीख १८ एप्रिल १८९८ उजाडूं लागला. दिशा फांकूं लागल्या. फांशीची वेळ जवळजवळ येऊं लागली. पण त्या बहाद्दराच्या जणूं तें ध्यानींमनींही नव्हतें. तो त्याही रात्रीं अगदीं शांतपणें सुखानें झोंपी गेला होता.

फांशी देण्याच्या पूर्वींचे अखेरचे शिष्टाचार पार पाडण्याच्या तयारीनें आणि त्या अखेरच्या घटकेला तरी त्या मरत्या मढ्याच्या टाळूवरचें लोणी चाटतां आलें तर पाहावें या बेतानें पोलिस अधिकारी गायडर कोठडीपाशीं आला. पाहतो तों अर्ध्या-पाव घटकेंत फांसावर लटकणारा दामोदर कोठडींत गाढ निद्रेंत घोरतो आहे.

गायडरनें तें पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं.

"दामोदर!" त्यानें कोठडीच्या लोखंडी गजांपाशीं तोंड नेऊन मराठींत हांक मारीत विचारलें, "तुला रात्र कशी गेली ?"

"रात्रीं मला अगदीं गाढ झोंप लागली होती."

"बरें, तुला तुझ्या वडिलांना किंवा कुटुंबाला कांहीं निरोपविरोप सांगायचा आहे का ?"

"सगळें आटोपल्यावर तुम्ही जाऊन त्यांना भेटाल तेव्हां सांगा, कीं तुमचा दामोदर आनंदानें हंसतमुखानें फांशी गेला."

"तुला आणखी कांहीं सांगायचें आहे का ? अखेरच्या क्षणाला तरी खरें तें सांगून मरणें चांगलें नव्हे का ?"

गायडरला आशा वाटत होती कीं, आयुष्याच्या शेवटच्या क्षणाला

तरी हा गुन्हा कबूल करील. पण तसें झालें नाहीं. दामोदर ताडकन उत्तरला, "आतां माझें गाऱ्हाणें मी परमेश्वराच्या न्यायालयांतच सांगेन. सत्य आणि असत्य दोन्ही मला आतां सारखींच आहेत." त्यानें अधिक बोलून दाखविलें नाहीं. पण त्याचा सौम्य स्वर तें सारें मुक्या भाषेंत बोलून दाखवीत होता.

"बरें, तुला तुझ्या भावाला कांहीं निरोप सांगायचा आहे का?" गायडरनें मध्येंच अकस्मात् प्रश्न केला.

पण दामोदर आपण कोणाशीं बोलत आहों हें पक्कें ओळखून होता. त्यानें विचारलें, "माझा भाऊ तुम्हांला कुठें भेटेल?"

"अरे कधींतरी तो आम्हांला सांपडेलच कीं!"

"त्याला माझा कांहींही निरोप नाहीं." दामोदर तिटकाऱ्यानें मान फिरवून उत्तरला.

तेवढ्यांत गोरे सोजीर यमदूत येऊन धडकले.

सोजिरांच्या पाहाऱ्यांत दामोदर इंग्रजी राजवटींतील परतंत्र जिण्याला विटून जगाचा अखेरचा निरोप घेत फांशीघराची वाट चालूं लागला.

सुमारें तासाभरानें दामोदरचें प्रेत जेव्हां फांसावरून खालीं उतरविण्यांत आलें, तेव्हां त्याच्या चर्येवर दुःखाची अथवा चिंतेची छटाही उमटलेली आढळली नाहीं.

परंतु एवढ्यावर रँडच्या खुनाची कहाणी संपणार नव्हती. अजून बाळकृष्ण चाफेकर, वासुदेव चाफेकर, महादेव रानडे हे सरकारचे तीन भयंकर शत्रु बेपत्ता होते.

आणि ते विश्वासघातकी द्रवीड! ते फितूर म्हणून गळ्यांतलि मंगळसूत्रासारखे सरकारचे आश्रयी असले, तरी तें मंगळसूत्र तोडून टाकायला चाफेकराच्या प्रभावळींतील ते तरुण वासुदेव चाफेकर आणि बाळकृष्ण रानडे डोळ्यांच्या वाती करून टपून बसले होते.

## ६ : आणखी खून; आणखी फांशी !

त्या दिवशीं साऱ्या पुण्यांत गणेश द्रविडसारखा सुखी प्राणी कोणी नव्हता.

उद्यां बाळकृष्ण चाफेकरवरील खुनाच्या खटल्याची सुनावणी सुरू होणार. तोंच आज तारीख ८ फेब्रुवारी १८९९ च्या मुंबईच्या वृत्तपत्रांत गणेश ऊर्फ गणपतराव द्रविड याच्या सहीचें एक खोडकर पत्र फडकलें.

पुण्याचा पोलीस अधिकारी ब्रुइन याची चांगलीच खरडपट्टी गणेशनें त्या पत्रांत काढली होती. –रँडच्या खुनीचा तपास लावून देणारास देऊं केलेलें रोख २०,००० रुपयांचें पुरें बक्षिस ब्रुइननें आपल्या हातीं लागूं दिलं नाहीं म्हणून.

अर्धे बक्षिस रोख १०,००० रुपये त्याच्या पदरांत अगोदरच पडलें होतें. त्याची शिक्षाही माफ होऊन तो आतां पुण्यांत खुन्या मुरलीधराशेजारच्या आपल्या घरीं आनंदीआनंद करीत मजत बसला होता. आतां वांधा राहिला होता तो बाकीच्या १०,००० रुपयांचा. पण तो वांधासा गणेशला मुळींच वाटत नव्हता.

त्या रात्रीं त्याच्या वाड्यांत माडीवर बिझिक खेळण्यासाठीं जमलेल्या त्याच्या मित्रपरिवारांत तीच चर्चा चालली होती.

"अरे गणेश ! ब्रुइनसाहेबानें तुला फसविलें. अर्ध्या बक्षिसावर तुझी बोळवण केली; आणि राहिलेली अर्धी रक्कम घशांत टाकली." त्याचा एक मित्र पत्ते खेळतां खेळतां म्हणाला.

"घशांत टाकतो ! कशी घशांत टाकतो तें पाहायला मी इथें खंबीर शेराला सवाशेर बसलों आहें कीं ! तेवढ्यासाठीं तर मीं हें त्याचें कुलंगडें असेंचवाठ्यावर आणलें." असें म्हणून गणेशनें बैठकीवर पडलेला–तो आपलें पत्र छापलेला–वृत्तपत्राचा अंक दिमाखानें त्या मित्रापुढें सरकविला.

"आतां बाप दाखव नाहीं तर श्राद्ध कर म्हणावें. उद्यांपासून

बाळकृष्णावरचा खटला सुरू होणार. त्यांत सरकारला माझ्या साक्षीची गरज आहेच कीं! आतां पाहतोंच मी गंमत. पुरें बक्षिस पदरांत पडल्याखेरीज ब्रुइन नव्हे ब्रुइनचा बाप आला तरी देखील साक्षीला उभा राहणार नाहीं मी." तो पुढें म्हणाला.

असें म्हणून गणेशनें आजच त्याला ब्रुइनचें टपालानें आलेलें नरमाईचें पत्र खिशांतून काढून मित्रांपुढें टाकलें.

एवढी चर्चा माडीवर चालली आहे, तोंच रस्त्यावरील काळोखांतून दोन इसम माडीवर जाण्याच्या जिन्यापाशीं येऊन उभे राहिले.

त्यांतील एकानें जिन्यांतून वर पाहत 'मराठी' हिंदींतून हांक मारली, "गणपतराव! गणपतराव उप्पर है?"

"कौन है?" गणेशनें माडीवरूनच मोठ्यानें विचारलें. त्याच्या तल्लख बुद्धीनें तर्क केला, कीं ब्रुइनसाहेबाकडून आलेले शिपाईच असावे हे. ते चाफेकर आणि रानडे आहेत हें कुणालाही हेरतां आलें नाहीं.

त्याच्या प्रश्नाला खालून पहिल्याच आवाजांत उत्तर मिळालें, "आम्ही ब्रुइनकडून आलों आहों."

दोघेही द्रविड बंधु तसेच मित्रमंडळीला ब्रिझिक खेळत बसायला सांगून कपडे करून त्या 'ब्रुइनच्या माणसां'बरोबर ब्रुइनसाहेबाकडे जाण्यासाठीं जिना उतरले. जातांना त्यांनीं भिंतीवरील घड्याळाकडे पाहिलें. तों साडेनऊ वाजायला तीन मिनिटें अवकाश होता.

"अरे! साडेनऊ वाजलेच कीं! आतां इतक्यांत साडेनवाची तोफ होईल. रात्र बरीच झाली. घरीं जायला हवें आतां." तें चौघे खुन्या मुरलीधराच्या कोंपऱ्याआड झाले असतील नसतील, तेवढ्यांत मंडळींतील एकजण उठण्यासाठीं अंग सरसावीत म्हणाला.

तेवढ्यांत 'तोफ' उडाली. तें पिस्तुल होतें! म्हणजे फटफटली.

त्या तोफेसरशी ज्यांच्याजवळ घड्याळें होतीं ती बैठकींतील मित्र मंडळी आपापलीं घड्याळें लावून घेण्यासाठीं चावी फिरवून कांटे सरकवू

पाहतात, तोंच पाव-अर्ध्या मिनिटाच्या आंत भिंतीवरच्या घड्याळाप्रमाणें बरोबर साडेनवाला पुन्हा नेहमींसारखी तोफ उडाली.

त्या आवाजाबरोबरच रस्त्यावरून खुन्या मुरलीधराच्या कोंपऱ्याकडून भयंकर किंचाळी माडीवर ऐकूं आली, "मेलों! मेलों!.... खून! खून!.... धांवा! धांवा!...."

ती किंचाळी ऐकून माडीवरील मंडळी तिकडे धांवली. आजूबाजूच्या घरांतून भराभर लोक बाहेर आले. कोणी तिकडे धांवले; कोणी विस्मयचकित भेदरट मुद्रेनें 'काय झालें? काय झालें?' असें म्हणत इकडे तिकडे पाहूं लागले.

सारे जाऊन पाहतात तों खुन्या मुरलीधराच्या कोंपऱ्यावर दोघे द्रविड बंधु मुडदेमुद्दल होऊन रक्तबंबाळ स्थितींत स्वतःच्या रक्ताच्या थारोळ्यांत धुळींत लोळत पडलेले दिसले.

परंतु हें घोर कृत्य कोणीं केलें याची कुणालाच कांहीं दाद लागेना. खून करणारे वासुदेव चाफेकर आणि बाळकृष्ण रानडे तेवढ्या वेळांत काळोखांतून केव्हांच पसार झाले होते.

त्या दोघां बंधूंना त्या दोन शिपायांबरोबर ब्रुइनसाहेबाकडे जातांना ज्या मित्रांनीं पाहिलें होतें, ते एकमेकांकडे भकास नजरेनें पाहत तर्क करूं लागले, "ते शिपाई तर कुठें दिसत नाहींत. त्यांनींच या दोघांना ठार केलें कीं काय?"

"असेलही." दुसरा एकजण म्हणाला, "आजचें तें पत्र वाचून ब्रुइनसाहेब चिडला असेल. त्यानेंच परस्पर यांचा कांटा काढला असेल."

खटल्याच्या उभारणीला मग वेळ लागला नाहीं. आरोपींनीं गुन्हा कबूल केला. तडकाफडकी चौकशी होऊन निकाल लागला.

निकाल सर्वांना अपेक्षितच होता.... फांशी! वासुदेव चाफेकर आणि बाळकृष्ण रानडे या दोघांनाही फांशी!

"छान!" ते दोघेही तरुण न्यायाधिशाच्या मुखानें तो निकाल फूल झेलावें तसा लीलेनें ऐकत उद्गारले.

वासुदेवनें निश्चित मुद्रेनें विचारलें, "पण आम्हांला दोन वेळच्या खुनांबद्दल दोनदां फांशी देणार काय? आणि देणार असाल तर पहिली फांशी कोणती, आणि नंतरची कोणती?"

त्या निर्भय सवालांत पुष्कळ अर्थ भरला होता. द्रविड बंधूंच्या खुनाची कबुली तर त्या दोघांनीं स्वतः होऊनच दिली होती. पण रँड आणि आयर्स्ट यांच्या खुनांतही दामोदरबरोबर हे दोघेही सहभागी आहेत असें सरकारी वकिलानें पुराव्यासह ठांसून सांगितलें होतें. आणि ज्यूरीनेंही एकमतानें त्यांना त्या अपराधाबद्दलही दोषी ठरविलें. न्याया-धिशानें त्याबद्दलही त्यांना फांशी ठोठावली होती. त्या न्यायनिवाड्याला अनुलक्षून वासुदेवनें लीलेनें तो वाग्बाण न्यायधिशावर सोडला होता.

न्यायाधीश निर्णय जाहीर केल्यावर अधिक कांहींही न बोलतां विषण्ण हृदयानें उठून आपल्या विश्रामगृहाकडे गेला.

आतां ठरल्या दिवशीं हे दोन तरुण देशभक्तही दामोदर चाफे-करासारखे फांसावर लटकविले जाणार हें तर देवच बोलला होता.

परंतु रक्ताळलेल्या उग्र दहशतवादाची धडकी जी सरकारच्या छातींत पहार ठोकल्यासारखी खोलवर काळीज पोखरीत होती, ती या नव्या दोन बळींनींही दूर होणार नव्हती.

'मुंबई टाइम्स' हें तेव्हां सरकारचें मुखपत्र. टाइम्सनें खटल्याच्या त्या निकालावर अग्रलेख लिहिला. त्यांत म्हटलें:

"…. हीरक महोत्सवाच्या रात्रीं पुण्यांत झालेल्या खुनानंतरचा शोकमय इतिहास आश्चर्यांनी इतका भरलेला आहे कीं बाळकृष्णाला आणि द्रविडांचा खून करणाऱ्या खुनींना देहान्त शासन दिल्यानेंही त्याचा शेवट झाला आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं…. राजकीय गुन्हेगारीच्या अभ्यासूंना चाफेकर कुटुंबांतून उफाळलेल्या विनाशकारक

दहशतवादाचा उग्र गंभीर विषय चिंता करण्याजोगा वाटेल.... या चाफेकर समितीचीं पाळेंमुळें खणून काढून नाहींशीं केलीं पाहिजेत...."

तरी बरें, कीं जुलूमजबरदस्तीनें लोकांत असंतोष भडकतो, आणि तो दडपून टाकूं लागलें कीं त्यांतून दहशतवादाचा भस्मासुर निर्माण होतो, हें सरकारला कळत होतें. पण कळत होतें तरी वळत मात्र नव्हतें.

प्लेग पुण्यांत बहुतेक थांबला. पुन्हा प्लेगच्या सोबतीला पूर्वीसारखाच देशांतील रयतेचा अंत पाहायला दुष्काळ आला.

आणि प्लेग पुरवला, दुष्काळही पुरवला; पण ही कर्झनशाही राजवट, नको असे दुःखाचे उसासे लोकांना सोडायला लावणारा तरणाबांड हुकुमशहा लॉर्ड कर्झन व्हाइसरॉय होऊन भारतावर राज्य करायला आला! सन १८९९ हें भारताचें असें घातवर्ष होतें.

**स्वाध्याय :**

१ इंग्रजी राजवटीचा पहिला मरणघाव भारताच्या जिव्हारीं कसा बसला ?
२ नव्या बादशाही राजवटींतील शांतता कशी होती ?
३ जागा झालेला भारत कसा विचार करूं लागला ?
४ वासुदेव बळवंत फडके यानें स्वातंत्र्यासाठीं काय केलें ?
५ कॉंग्रेस जन्माला येण्यापूर्वी देशांत काय चाललें होतें ?
६ कॉंग्रेस कशी जन्माला आली ?
७ ह्यूमसाहेबाला त्या पुडक्यांतील पत्रांनीं काय सांगितलें ?
८ 'दुष्काळांत तेरावा महिना' कोणता ? कसा ?
९ तेव्हांचे 'सूर्याजी पिसाळ' आणि 'बाळाजीपंत नातू' कोण ? कसे ?
१० फांशी जातांना दामोदर चाफेकर गायडरला काय म्हणाला ?
११ द्रविडबंधूंचा खून कां व कसा झाला ?
१२ त्याचा परिणाम काय झाला ?
१३ टाइम्सनें रँड खुनाबाबत काय टीका केली ?
१४ सन १८९९ हें घातवर्ष कसें ?

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
5072

प्रकरण दुसरें

# बंगालवर फाळणीचें संकट

## १ : असा हा लॉर्ड कर्झन

लॉर्ड कर्झन भारताचा व्हाइसरॉय नेमला गेला असें कळलें मात्र. आणि लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'नें त्याचें भाकीत वर्तवून टाकलें.

'इंग्रजी साम्राज्यसत्ता हिंदी द्रव्यानें आणि रक्तानें वाढविण्याकरितांच हे येत आहेत. त्यांच्या हृदयांत दमदमणाऱ्या महात्त्वाकांक्षेच्या नगाऱ्यापुढें हिंदी प्रजेच्या गाऱ्हाण्यांची टिमकी कोणाला ऐकूं जाणार नाहीं. त्यांची कारकीर्द सुखशांतीची किंवा अभिवृद्धीची होणार नाहीं. हे बोलाचाच भात शिजवतील आणि बोलाचीच कढी बनवतील.... आपला हट्ट अखेरपावेतों खरा करण्याची धडाडी दाखवितील. ते कर्ते लाट न झाले तरी बोलके लाट खास होतील. आणि त्यांनीं प्रगट केलेल्या सदिच्छा निष्फळ होतील.....'

कर्झन वयानें पस्तिशीच्या घरांतला, तरणाबांड. दिसायला तरतरीत आणि उमदा, तसाच बुद्धिमान, विद्वान, बहुश्रुत. जगभर प्रवास करून आलेला. पण पक्का घमेंडखोर अरेराव. मीं करीन ती पूर्व अशा थाटानें आणि ताठ्यानें नेहमीं वागणारा. असा हा धटिंगण भारताचा व्हाइसरॉय नेमला गेला. ही भारतावर जणूं संक्रांत आली.

इंग्रजी साम्राज्याची तुंबडी नीट भरगच्च भरावी यासाठीं देखील भारतांत सरकारला कांहीं चांगल्या गोष्टी कराव्या लागतच असत. तशा चुकून कांहीं थोड्या चांगल्या गोष्टी कर्झनच्याही हातून आरंभीं झाल्या.

त्या सगळ्यांत विशेष चांगली गोष्टी म्हणजे इकडील गोरे अधिकारी जे आकाश ठेंगणें झाल्यासारखे चढेल आणि उन्मत्त झाले होते, त्यांचें कर्झननें खासें गर्वहरण केलें. आणि थोरांचाही थोर मी अशा बेफाम तोऱ्यांत वागून त्या पायांतल्या वाहणा पायांत ठेवल्या.

परंतु काय असेल तें असो, कर्झनची कारकीर्द गाजविली बंगालनें. आणि ती गाजवायला मुहूर्त केला तोही गांधीलमाशांच्या पोळ्याप्रमाणें कर्झनवर चिडून चावे घ्यायला उठलेल्या बंगालच्या तरुण विद्यार्थींनीं.

कर्झनला आपल्या उद्दामपणावर शिखर चढविण्यासाठीं कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचा मोका साधण्याची दुर्बुद्धि आठवली.

सन १९०५ च्या फेब्रुवारी महिन्यांतील त्या दिवशीं सायंकाळीं कर्झन पदवीदान समारंभाच्या वेळीं तें आगलावें भाषण करून गेला मात्र; आणि तरुण बंगालच्या अंतःकरणांत संतापाची आग धुमसूं लागली.

"हा नंबर एकचा खोटें बोलणारा माणूस आम्हांला खरें बोलण्याचा उपदेश करण्याचा आव आणतो काय? आम्ही हिंदी विद्यार्थी म्हणजे पर्यायानें सारी हिंदी जनता याला खोटें बोलणारे वाटतों काय? असल्या चोराच्या उलट्या बोंबा कोण कशा ऐकून घेईल?" असा एकटा बंगालच नव्हे, दरएक हिंदी माणूस मनांत संतापानें पिचूं लागला.

आधींच शिक्षणाच्या क्षेत्रांतही सर्वतोपरी गळेचेपी करून कर्झननें तरुण भारताच्या अंतःकरणांत आपणाविषयीं तिटकारा उत्पन्न केला होताच. त्यांत आणखी ही भर. अतिप्राचीन काळापासून सर्वतोपरी श्रेष्ठ आणि उदात्त म्हणून जगांत मशहूर असलेल्या आपल्या भारतभूमीला हा काळ्या काळजाचा गोरा हुकुमशहा खोटें बोलणारें राष्ट्र म्हणतो म्हणजे काय? तरुण भारतानें तें कसें सहन करावें?

दुसऱ्या दिवशींच्या बंगाली वर्तमानपत्रांत लोक पाहतात तों कर्झनचींच बोटें कर्झनच्या डोळ्यांत खुपसलेलीं आढळलीं.

भारताचा व्हाइसरॉय होऊन येण्यापूर्वीं कर्झन आशिया खंडांतून स्वतः प्रवास करून आला होता. त्या छापील प्रवासवर्णनांत या स्वारीनें आपण बिलंदर खोटें बोलणारे कसे आहों हें स्वदस्तुरनें नमूद केलें होतें. तोच त्याचा कबुलीजबाब त्या दिवशींच्या 'अमृतबझार पत्रिका' दैनिकांत सहीसही छापलेला!

...र वाचनालय, सातारा.


कोरियांत तेव्हां राजश्री गेले होते. तेथें तो कोरियाच्या पंत-प्रधानाला भेटायला गेला. कोरियांत वडिलकीला मान मोठा. तसा मान तिकडे तरुण माणसाला देत नाहींत. आणि हा गृहस्थ तर तेव्हां अवघा तेहतीस वर्षांच्या उमरीचा तरणाबांड गडी.

हें सारें ध्यानीं घेऊनच कर्झन कोरियाच्या त्या पोक्त प्रधानाला भेटायला गेला.

"तुमचें वय काय ?" प्रधानानें विचारलें.

"चाळीस." तेहतीस वर्षांचा कर्झन बेधडक उत्तरला.

"वयाच्या मानानें तुम्ही फार तरुण दिसतां."

"होय. कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलुखांत आज महिनाभर प्रवास करीत आहें."

"आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहां काय ?"

"नाहीं महाराज!...."

अभावितपणें चुकून खरें तें कर्झनच्या तोंडून निघून गेलें. पण प्रधानाच्या चर्येकडे पाहून लगेच त्यानें जीभ चावली. त्याला कळून चुकलें कीं आपल्या खऱ्या उत्तरानें ह्या प्रधानापाशीं आपला भाव उतरला.

दुसऱ्याच क्षणाला त्यानें बेमालूम प्रसंगावधान राखून स्मित-हास्यपूर्वक सांगितलें, "परंतु महाराज, माझें लग्न अजून व्हायचें आहे."

त्या कोरियाच्या पोक्त प्रधानाची मर्जी संपादन करण्यासाठीं निगर-गपट्टणानें असें निखालस खोटें बोलणारा हा माणूस! अभिमानानें आपल्या प्रवासवृत्तांत हा स्वतःचा खोडसाळपणा रसभरीत वर्णन करून सांगणारा. *

असला हा खोडसाळ माणूस आम्हां हिंदी तरुणांना खरें बोलण्याचा उपदेश करतो काय? .... अशा वाढत्या आवेशानें तेव्हांपासून तरुण बंगाल—सारा बंगाल कर्झनशाही राजवटीला पाण्यांत पाहूं लागला.

* नंतरच्या आवृत्तींत हा उल्लेख खुबीनें गाळला आहे. —संपादक

इति २५० ... इति २५०

कर्झनच्या उन्मत्तपणाचे आणखीही अनेक दाखले भारताला पाहायला मिळाले होते. दोन वर्षांपूर्वींच तारीख १ जानेवारी १९०३ रोजीं प्रचंड दिल्लीदरबारचा सोहळा साजरा झाला होता. तो इतका वैभवशाली दरबार झाला म्हणतात, कीं भारतांत पूर्वीं कधींही तसला राजशाही थाटाचा सोहळा झाला नाहीं.

तो दरबार म्हणजे उन्मत्त राजशाही अहंकाराचा कळस होता. दरबारासाठीं खास पाहुणे बादशहाचे प्रतिनिधि म्हणून युवराजांना मुद्दाम बोलावून आणण्यांत आलें होतें.

पण दरबारांत युवराजापेक्षांही उच्च पदावर व्हाइसरॉय या नात्यानें कर्झन स्वतः दिमाखानें विराजमान झालेला.

प्रत्यक्ष इंग्लंडच्या युवराजाची जिथें ही दरबारी शोभा, तिथें मुद्दाम समारंभासाठीं आमंत्रणें देऊन आणविलेले हिंदी राजेरजवाडे हा कुठचा झाडाचा पाला!

त्या बिचाऱ्यांना सारी मानखंडना मुकाटपणें सहन करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. हो! नाहीं तर व्हाइसरॉयचा रोष झाल्यावर कोणता ना कोणता ठपका अंगाशीं येऊन आयत्या राज्यवैभवाला आणि ऐषआरामी जीवनाला मुकण्याची पाळी यायची!

ह्या हिंदी राजेरजवाड्यांच्या, व आणखी जे देशांतील थोर थोर लोक आमंत्रणावरून त्या शाही दरबारांत हजर होते, त्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासाठींच कीं काय, दिल्लींतील 'दिवाण-इ-खास' च्या संगमरवरी भिंतीवर सुवर्णाक्षरांनीं कोरलेली दुष्ट घोषणा झगझगीत रोषणाईच्या विद्युत्प्रकाशांत कर्झननें सर्वांच्या नजरेपुढें आणून वाचायला लावली.

'अगर फर्दोस बरु-इ-झमिन अस्थ,
हमिन अस्थ, वो हमिन अस्थ, वो हमिन अस्थ.'

(पृथ्वीवर जर स्वर्ग कुठें असेल, तर तो इथेंच आहे, इथेंच आहे, इथेंच आहे.)

हा अपमान हिंदी राजेरजवाड्यांच्या मनाला जितका झोंबला नसेल, तितका त्यांच्या सामान्य रयतेच्या मनाला झोंबला होता.

"छे! असली जुलमी राजवट नाहींशी केलीच पाहिजे. मुडदे-मुद्दल माणसांसारखा हा जाच किती आणि कसा सहन करायचा?" प्रत्येकजण मनांत तेव्हां जळफळूं लागला. पण दुःख उघड बोलायला वाव नव्हता. जुलुमाचा प्रतिकार करायला हातीं शस्त्रें नव्हतीं.

भारतांतील आपली राजवट काय मासल्याची आहे हें इंग्रज राज्य-कर्त्यांनाही कळत होतें. अशा राजवटींत हिंदी लोकांच्या हातीं शस्त्रास्त्रें राहूं दिलीं तर ते त्या जोरावर जिवावर उदार होऊन '१८५७' ची उजळणी करायला कमी करणार नाहींत, हें सरकारही पक्कें ओळखून होतें. म्हणूनच सरकारनें पूर्वींच हत्यारांचा कायदा करून लोकांना निःशस्त्र करून सोडलें होतें. वाघसिंहांच्या छाव्यांसारखे हे हिंदी लोक इंग्रजी राजवटीविरुद्ध बंड करून तिला फाडून खायला उठतील, या भीतीनें सरकारनें त्या छाव्यांचीं अशीं नखें खुडून टाकलीं होतीं.

परंतु अशीं खुडून टाकलेलीं नखेंही पुन्हा वाढणारच. त्याला काय करणार?

"काय? सरकार आम्हांला नखेंही वाढवूं देणार नाहीं? आमचीं नखें अशीं कापून टाकणार? पण आम्ही अफजुलखानाचा समाचार घेणाऱ्या शिवछत्रपतींसारखे वाघनख्या हातांनीं वावरूं लागलों तर? आम्हीही पाहून घेऊं म्हणावें सरकारला" अशा ईर्ष्येनें तरुण भारत पुढच्या दारानें नाहीं तर मागच्या दारानें हत्यारें मिळविण्याच्या उद्योगाला लागला.

साऱ्या भारतांत इंग्रजी राजवटीनें शापदग्ध होऊन हुतात्मा होण्याचा अग्रमान मिळविणारा बंगाल. सन १७५७ सालीं प्लासीच्या लढाईंत बंगालचा सुभेदार नामोहरम झाला; म्हणजेच मोगल बादशाही नामशेष झाली. इंग्रज विजयी झाले. भारत खरा परतंत्र तेव्हां झाला. तो पहिला घाव बंगालच्या मानेवर पडला.

भावनाप्रधान मानी बंगाल ती विटंबना कशी विसरेल? त्यांत आणखी या कर्झनशाही जुलुमाची भर.

धगधगत्या आगींतूनच आगकिडे निर्माण होतात म्हणतात. तशा कर्झनच्या जुलुमांतूनच भारताला स्वतंत्र करण्याकरितां सशस्त्र क्रांतीची पूर्वतयारी करण्यासाठीं बंगालमध्यें ठिकठिकाणीं गुप्त क्रांतिसमित्या स्थापन होऊं लागल्या.

या समित्यांना पोलादी कणखरपणा आणणारा तरुण क्रांतिकारकांच्या देशभक्तीचा कट्टा वैरी कर्झन. त्यानें बंगालची फाळणी करण्याची दुष्ट योजना रचून त्या बंगाली सापाच्या शेपटीवर पाय दिला. मग साप डसल्याशिवाय कसा राहील?

## २ : ग्रहणाचे वेध लागले

बंगालची फाळणी करण्याचें ठरवून लॉर्ड कर्झन व्हाइसरॉयकीचे दिवस भरले म्हणून विलायतेला गेला. पण फाळणी म्हणजेच कर्झन! निषेध करण्यासाठीं कलकत्त्यांत परवां तारीख ७ ऑगस्ट १९०५ रोजीं नगरभवनांत नागरिकांची जाहीर सभा भरणार होती.

त्या सभेवरूनच मिदनापुरांत एका घरांत सकाळीं मामा-भाच्यांचा घरगुती वादविवाद चालला होता.

"नाहीं. तें आम्हांला मुळींच नाहीं पटत. मुखी हरिनाम आणि बगलेंत सुरी असा कर्झन सरकारचा दुष्ट कावा आहे या बंगालच्या फाळणीच्या मुळाशीं.

"अरे, पण माझें ऐकून तरी घे खुदीराम!" अमृतबाबू भाच्याची परोपरीनें समजूत घालूं लागले.

त्या घरगुती संभाषणाचा आपल्या सोईला पटला तसा समारोप करून तो पंधरा वर्षांचा चिमखड्यासारखा तरतरीत पोरगा शाळेंत चालता झाला.

शाळेंत जाण्याची वेळही होत आली होती. अजून थोडा अवकाश होता. पण आज तूं लौकर शाळेला कशाला जातोस असें मामानें भाच्याला विचारलें नाहीं. त्यांना माहीत होतें.

अमृतबाबूंच्या घरांतच हा वाद तेव्हां चाले असें नाहीं. त्या साऱ्या मिद्नापूर शहरांतच नव्हे, तर साऱ्या बंगालभर घरोघरीं आजकाल तेंच समुद्रमंथन सुरू होतें. साऱ्या बंगालच्या जिव्हाळ्याचा, जीवनमरणाच्या मोलाचा तो प्रश्न होऊन बसला होता. घरोघर असे लहानमोठे खुदीराम चेवले होते.

अमृतबाबू फाळणीच्या बाजूचे होते अशांतली गोष्ट नाहीं. त्यांनाही फाळणीच्या सरकारी योजनेची चीडच आली होती. पण ते पडले सरकारी नोकर.

"आधींच आम्हां भद्र लोकांना दिवसेंदिवस सरकारी नोकऱ्या आजच्या या बंगाल प्रांतांतही मिळण्याची मारामार. त्यांत सरकार त्याचे आणखी लचके तोडून बंगालचीं खांडोळीं करणार. मग त्यांत आमच्यासारख्या लोकांना नोकऱ्याचाकऱ्या आणखी दुर्मिळ होणार" असें. आजकाल तेच भयभीत चित्तानें बोलत होते असें नाहीं. बहुतेक 'भद्र लोक' सरकारी नोकरांकडून कधीं मनांत तर कधीं जनांत तीच चिंता व्यक्त केली जात होती.

त्या दिवशीं प्रथम आपल्या भाच्याशीं या विषयावर बोलतांनाही तेंच भय अमृतबाबूंनीं व्यक्त केलें होतें.

त्यावर त्या बालकानें स्पष्ट उत्तर देऊन मामाचें तोंड बंद केलें होतें, "पण मला तुमच्यासारखी सरकारची नोकरी करायचीच नाहीं मामा!"

ज्ञानेंद्रबाबू हे अमृतबाबूंचे सहाध्यायी. सरकारी नोकर मात्र नव्हते. अगदीं विरुद्ध पंथाचे. आय्. सी. एस्. झालेले अरविंद घोष अश्वारोहणाच्या कसोटीला उतरले नाहींत, म्हणून इंग्रजांचे बडे सनदी नोकर

इ-३३५/५०५२

 -वि·का·ह३५. १५७१४५६

झाले नाहींत इतकेंच. ते बडोदे सरकारच्या बड्या नोकरींत कांहीं वर्षे होते. पण पेशा तो असला तरी पिंड दहशतवादी क्रांतिकारकाचा. फाळणीच्या अगोदरच त्यांची 'युगांतर' क्रांतिसमिति गुप्तपणें संघटना करूं लागली होती. त्या 'युगांतर' क्रांतिसमितीचे ज्ञानेंद्रबाबू मिदनापूरचे पुढारी. तरी देखील त्या दोघांची मैत्री टिकली होती. याचें कारण आपण त्या दहशतवादी पंथाचे प्रवर्तक या नात्यानें अमृतबाबूंकडे, मित्राकडे येत नसत कीं कधीं कांहीं बोलत नसत.

बोललेच तर हंसत हंसत अमृतबाबूंना एवढेंच बोलायचे, "नोकरींत बढती मिळवायच्या आशेनें मला तुरुंगाच्या वाटेला लावूं नका म्हणजे झालें."

अमृतबाबू कांहीं चाफेकराचा कैंसानें गळा कापणारे द्रविड नव्हते. आपणांला पोटासाठीं सरकारची चाकरी करावी लागते आहे, याची त्यांना जाणीव होती. स्वतःला देशासाठीं त्याग आणि साहस करतां आलें नाहीं, तरी असा भारतमातेचा सुपुत्र कोणी भेटला तर स्वतःचें अंग राखून अथवा वेळींवखतीं थोडीफार झीज सोसूनही त्याचा परामर्श घ्यायला ते नेहमींच तयार असत.

"पण मला सरकारी नोकरी करायचीच नाहीं मामा!" असें त्या दिवशीं खुदीरामनें अमृतबाबूंना उत्तर दिलें, तेव्हां तें मामा–भाच्यांचें संभाषण ऐकायला ज्ञानेंद्रबाबू तिथें जवळच बाजूला बसले होते.

आज खुदीरामच्या शाळेंत ज्ञानेंद्रबाबूंचें विद्यार्थ्यांना उपदेशपर भाषण व्हायचें होतें. खुदीरामनेंच त्यांना सकाळीं तें सांगितलें होतें.

तो आज जरा लौकर इतक्या तत्परतेनें शाळेंत गेला; आणि गेला तो ज्ञानेंद्रबाबूंचा उपदेश ऐकण्यासाठीं. 'ता' म्हणतां 'ताकभात' ओळखण्याइतके अमृतबाबू धूर्त होते.

पण त्यांनीं त्याला एका चकारशब्दानें विचारिलें नाहीं, कीं लौकर जाऊं नको म्हटलें नाहीं. त्यांच्या नेत्रांत वत्सलतेचे अश्रू उभे राहिले.

गालांवर भाच्याविषयींच्या अभिमानानें स्फुरलेली हास्याची ओझरती लकेर चमकून गेली.

अंगांतील सद्र्याच्या बाहीनें त्यांनीं डोळे पुसले. आणि कचेरींत जाण्यासाठीं उठतां उठतां कालीमातेच्या आठवणीनें दोन्ही हात जोडून प्रार्थनापूर्वक उद्गार काढले, "आई ! हें अनाथ पोरकें लेकरूं, चार वर्षांचें असतांना वडील वारले तेव्हांपासून डोळ्यांतील बुबुळाला जपावें तसें जपून आजवर जतन केलें, वाढविलें. ती तुझीच कृपा. यापुढेंही तूंच त्याची आई आहेस आणि तें तुझें लेकरूं आहे. त्याच्या जीवनाचें सार्थक सोनें करणारी तूंच आहेस आई !..."

शाळेंत बाबूजींचें व्याख्यान झालें. बंगालच्या फाळणीची टांगती तरवार साऱ्या बंगालच्या मानेवर लटकत असतांना त्यांच्यासारखा क्रांतिकारक आपल्या विद्यार्थ्यांपुढें दुसऱ्या विषयावर काय म्हणून आणि कां म्हणून बोलेल ?

ज्ञानेंद्रबाबूंनीं बंगालच्या फाळणीच्या अगदीं मूळपासूनचा खराखरा इतिहास विद्यार्थ्यांना अगदीं थोडक्यांत सोप्या भाषेंत समजावून सांगितला. तो कुठपासून ? अगदीं थेट दीडशें वर्षांपूर्वीं १७५७ सालीं झालेल्या प्लासीच्या लढाईपासून.

तेव्हां इंग्रजांनीं बंगालची सुभेदारी आणि दिवाणी मुसलमानांपासून बळकावली. आणि आसामपासून सिमल्यापावेतों कंपनीसरकारचा एकछत्री बंगाली अंमल सुरू झाला. सुशिक्षित बंगाली भद्र लोकांनाच मुख्यतः सरकारी नोकऱ्या तेवढ्या विशाल टापूंत मिळायच्या. तेव्हां तेथलें कोणतेंही महत्त्वाचें ठिकाण पाहा. सरकारी नोकर पाहावें तर बंगाली.

अगदीं पहिला मोठा बंगाल असा होता.

पण इतर बहुजनसमाज जन्मभर थोडाच अशिक्षित राहतो ! इतर मागसलेले लोकही शिकून पुढें येऊं लागले. सरकारी नोकऱ्या करूं लागले. बंगाली बाबूंना नोकरीचाकरीच्या क्षेत्रांत असे नवे नवे वांटेकरी

निर्माण होऊं लागले. मराठ्यांना 'राव' तसें बंगाली लोकांना 'बाबू' म्हणतात.

अशी प्रथम लखनौ–अलाहाबाद प्रांतांतून बंगाली बाबूंची पिछेहाट झाली. कारण तो प्रांत तुटून वेगळा झाला. असा मोठ्या बंगालचा पहिला लचका तुटला.

तसाच मग पुन्हा आसामचा कांहीं भाग वेगळा झाला. नंतर आज काय बहार वेगळा करा, उद्यां ओरिसा वेगळा करा, असे बंगालचे तुकडे छाटून एकामागून एक वेगळे करण्यांत आले.

पुन्हा सन १८७४ सालीं सबंध आसाम प्रांत बंगालपासून वेगळा करण्यांत आला.

ही बंगालची काटछाट करण्यांत सरकारचा दाखवायचा मुख्य हेतु राज्यकारभाराची सोय हा होता. त्यामुळें ताटाबरोबर कांठ जावा तसे आसामबरोबर सिल्हट, काचार आणि गोलपारा हे बंगाली भाषा बोलणारांचे जिल्हे जरी आसामांत सामील झाले, तरी यांत हिंदु–मुसलमानांत फूट पाडण्याचा सरकारचा कावा आहे हें बंगाली लोकांच्या ध्यानीं आलें नाहीं.

पण असला कावेबाजपणा सतत थोडाच लपवतां येतो! सरकारनें जेव्हां बंगालचें इतकें खच्चीकरण पचनीं पडलें असें पाहिलें, तेव्हां त्याला वाटूं लागलें कीं अशींच धीरे धीरे पुढचीं पावलें टाकावीं, म्हणजे फोडाफोडीचा आपला डाव साधेल.

पण तें मात्र जमेना. लोक फसेनात.

सरकार पुन्हा सांगूं लागलें, "अहो! आसाम प्रांत कारभाराच्या सोईसाठीं वेगळा केला. पण आसामला स्वतंत्र सिव्हिल सर्व्हिस हवी अशी आसामी लोकांची ओरड चालली आहे ना? त्यासाठीं बंगालमधले चितगांव, नौखाली आणि टिपरा हे तीन जिल्हे काढून आसामला जोडले कीं काम भागेल."

आज आपल्या स्वतंत्र भारताची आय्. ए. एस्. ( इंडियन ॲड-मिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस ) ही जशी परमोच्च सनदी नोकरींची नवी परंपरा-तशी इंग्रजी राजवटींतील आय्. सी. एस्. ( इंडियन सिव्हिल सर्व्हिस ) ही सनदी नोकरांची परंपरा.

लोकांनीं साफ सांगितलें, " नाहीं. यापुढें बंगालचा तसूभर तरी लचका तोडाल तर खबरदार. "

लोक असें चिडून बोलूं लागले. कायदेमंडळांतही सरकारला जोराचा विरोध जाणवला. तेव्हां सरकार तेवढ्यापुरतें गप्प बसलें.

तेवढयांत लॉर्ड कर्झन इ. स. १८९९ मध्यें व्हाइसरॉय होऊन आला. त्यानें पाहिलें, कीं बंगाली लोक इंग्रज सरकारला पाण्यांत पाहतात. तेव्हां त्यानेंही त्यावर रामबाण उपाय म्हणून बंगालचे हातपाय तोडून त्याला कायमचा पंगू करण्याचा डाव रचिला.

" आसामसाठीं तीन जिल्हे देखील द्यायला बंगाली लोक राजी नाहींत काय? तर आतां माझें सरकार सारा चितगांव सुभा भरीला डाक्का, मैमनसिंग, फरीदपूर आणि बारिसाल हे आणखी जिल्हे घेऊन आसामांत सामील करणार. " असा कर्झनचा बेत जाहीर झाला.

अशानें तर बंगालचे चांगलेच हातपाय तोडल्यासारखे होणार होतें. हिंदु विरुद्ध मुसलमान अशी तेढ माजवून फोडा आणि झोडा या मतलबसिंधूच्या आधारानें हा कर्झनशहा भारतांत इंग्रजी साम्राज्यशाही राजवट अधिक बळकट करूं पाहत होता.

ज्ञानेंद्रबाबूंनीं बंगालच्या फाळणीची ही कहाणी व्याख्यानांतून विद्यार्थ्यांना नीट समजावून सांगितली.

आणि व्याख्यानाच्या शेवटीं प्रश्न केला, "लॉर्ड कर्झनच्या सरकारनें खाटकासारखीं " अशीं आपल्या जन्मभूमीचीं खांडोळीं केलेलीं तुम्हांला शांतपणें पाहवतील का? "

एकदम एकसाथ सर्व मुलांनीं गर्जून उत्तर दिलें, " नाहीं. "

बाबूजी मुद्दाम बारकाव्यानें खुदीरामकडे पाहत होते. तो पुढें पुढें करणारा विद्यार्थी नव्हता. सर्व मुलांच्या मागें एका बाजूला एका कोंपऱ्यांत तो बसला हो ा. पण बाबूजींनीं प्रश्न विचारतांच एकदम मूठ वळलेला उजवा हात वर करून सर्व मुलांत प्रथम 'नाहीं' असा निर्धार घोषित करणारा आघाडीचा बालवीर तो होता.

"हा तुमचा निर्धार खरा करून दाखवतांना तुम्हांला त्रास होईल. मायदेशासाठीं मरायला तयार व्हावें लागेल."

"मरायलाही तयार आहों."

"तर मग कोण कोण ते उभे राहा पाहूं?"

बाबूजींनीं 'उभे राहा' असें सांगण्याचा अवकाश. सारा वर्गच्या वर्ग एकदम उठून उभा राहिला.

"आतां मला तुमची परीक्षा पाहायची आहे. एकेकानें पुढें येऊन मूठ आवळून अंगीं शक्ति असेल तेवढ्या जोरानें या टेबल.वर गुद्दे मारावेत. जो कोणी सर्वांत अधिक गुद्दे मारील त्याचा तुम्हां कुमार देशभक्तांत नंबर पहिला."

बाबूजींनीं परीक्षेसाठीं 'पण' जाहीर केला. त्याबरशी 'आधीं मी' 'आधीं मी' अशा चढाओढीनें एकेक विद्यार्थी पुढें होऊन आपल्या पात्रतेची परीक्षा देऊं लागला.

कोणीं सात, कोणीं आठ, कोणीं दहा, असे अधिकांत अधिक पंधरा गुद्दे मारीपावेतोंही टिकाव धरणारे विद्यार्थी त्यांत आढळून आले.

असे एकूणतीस विद्यार्थी परीक्षा देऊन विजयी मुद्रेनें बाजूला झाले. आतां शेवटचा एकच विद्यार्थी बाकी राहिला. आपणांला परिचित झालेला तोच खुदीराम बोस.

खुदीराम घट्ट आवळलेल्या उजव्या हाताच्या मुठीचे तडाखे टेबलावर ताडताड लगावूं लागला.

"एक....दोन ....तीन.... चार...." ताल धरावा तसे विद्यार्थी

तडाखे मोजूं लागले. मूठ फुटून अगदीं रक्तबंबाळ झाली. तरी तो बालवीर कांहीं थांबेना. अठ्ठावीस....एकूणतीस....तीस....असे तीस प्रहार करून तो थांबला.

सर्व विद्यार्थ्यांच्या चर्येवर पवित्र असूयापूर्ण अभिमानाचा प्रकाश फांकूं लागला. असूया आपणां सर्वांवर खुदीरामनें ताण केली म्हणून. पण तो सर्वश्रेष्ठ ठरला तरी त्यांचाच वर्गबंधू. त्यांना त्याचा अभिमान होता.

"शाबास! बाळांनो, तुमचा वर्ग बंगालच्या शूर बालवीरांची–देशभक्तांची हिऱ्यांची खाण आहे. त्या खाणींतला हा आपला कोहिनूर हिरा आहे." खुदीरामच्या काळ्या कुरळ्या केंसावरून प्रेमानें हात फिरवीत बाबूजी म्हणाले.

शाळा सुटली. तसे बाबूजी खुदीरामचा हात आपल्या हातीं घेऊन म्हणाले, "खुदी! चल तुझ्या मामांना मी सांगतों. आणि आपण उद्यां कलकत्त्याला जाऊं."

## २ : कलकत्ता नगरींत

लॉर्ड कर्झन बंगालच्या फाळणीचें दुष्कर्म करून गेला. तें निस्तरणें जसें सरकारला तसेंच लोकांनाही आतां प्राप्त होतें.

त्यासाठीं तारीख ७ ऑगस्ट १९०५ रोजीं कलकत्त्याच्या नगर-भवनांत फाळणीच्या निषेधासाठीं भरलेली ती नागरिकांची सभा. सभा कसली ती? जणूं बंगालच्या उपसागराला जगबुडी भरतीच आली होती. कलकत्त्यांत भरती आल्यासारखा लोकगंगेचा समुद्र नगरभवनांत आंत-बाहेर चोहोंकडे पसरला होता.

एवढें विस्तीर्ण तें नगरभवन. पण हजारहजारोंनीं सभेला लोट-लेला जनसमाज त्यांत मुळींच सामावेना.

म्हणून मग—सभा एकच; पण सर्वांच्या सोईसाठीं एका सभेच्या चार ठिकाणीं चार सभा भरविण्यांत आल्या. नगरभवनांत वर एक,

खालीं एक, आणि बाहेरच्या मैदानांत दोन ठिकाणीं दोन.

सभेची गर्दी कलकत्ताभर सकाळपासूनच उसळून राहिली होती. सायंकाळीं सभा. तों दुपारपासून शहरांत कडकडीत हरताळ. हातांत काळीं निशाणें घेऊन सारे लोक सभेला चालले होते.

हिंदु-मुसलमानांत फूट पाडून 'फोडा आणि झोडा' या कुटिल राजनीतीचा अंमल यशस्वी करण्यासाठीं कर्झनशाही सरकारनें टाकलेला हा डाव. पण तो डाव फसला. शहरांतील सारे हिंदु-मुसलमान पाठोपाठच्या सख्या भावांसारखे तो हरताळ पूर्ण यशस्वी करण्यासाठीं एकोप्यानें झटत होते.

एरव्हीं कधींही सहसा असे एकत्र न येणारे हिंदु-मुसलमान राजे-महाराजे, जमीनदार, व्यापारी, मारवाडी वगैरे बडीबडी मंडळी आज आलेली दिसत होती. ही बडी मंडळी राजकीय चळवळींत कधींही न पडणारी. सरकारची मर्जी राखण्यांत नेहमीं तत्पर असणारी; तीही आजच्या सभेंत सरकारविरुद्ध निषेधाच्या आखाड्यांत उतरली होती.

चार सभा, तसे चार अध्यक्ष. कासीमबझारचे महाराज कधींही असल्या कसल्याही चळवळीच्या फंदांत न पडणारे. ते एका सभेचे अध्यक्ष. बाकीच्या तीन सभांना काँग्रेसचे बंगालमधील तीन थोर पुढारी अध्यक्ष. भूपेंद्रनाथ बसू, अंबिका चरण मुजुमदार, सुरेंद्रनाथ बानर्जी.

पण सभा अशी चतुर्मुखी असली तरी चार मुखांनीं सरकारला वठणीवर आणण्याचा रामबाण निर्धार घोषित झाला तो एकच. विलायती मालावर बहिष्कार.

तो बहिष्काराचा आदेश घेऊन वंदेमातरम्‌चा जयघोष करीत आणि सरकारच्या निषेधाच्या जळजळीत घोषणा देत सभा विसर्जन झाली.

परंतु अरविंदबाबू, ज्ञानेंद्रबाबू अशा तरुण बंगालचें तेवढ्यानें समाधान होईना. त्यांना बहिष्कारचा निर्णय घेणाऱ्या थोर पुढाऱ्यां-विषयीं आदर होता. पण त्यांनीं आंखून दिलेल्या ह्या थंड कार्यक्रमावर

नगर वाचनालय सातारा


त्यांचा मनापासून विश्वास नव्हता. तरीही त्यांनीं तो आदेश पाळण्याचें मनांतून ठरविलें.

तेंच ज्ञानेंद्रबाबूंनीं आपल्या सहकारी क्रांतिकारकांना आणि खुदीराम बोस, प्रफुल्लचंद्र चाकी या 'युगांतर' क्रांतिसमितींतील नवागत स्नातकांना सभेंतून घरीं जातांक्षणीं मनमोकळेपणानें सारें समजावून सांगितलें.

"नुसता विलायती मालावर बहिष्कार घालून आमच्या बंगालला फाडून खायला टपलेले हे विलायती लांडगे थोडेच ताळ्यावर येणार आहेत?" खुदीरामनें त्यावर विचारलें.

"मग काय केलें म्हणजे हे लांडगे ताळ्यावर येतील?" बाबूजींनीं त्या तरुणांच्या मनाचा अंदाज घेण्यासाठीं हसतमुखानें विचारलें.

"लांडग्यांची शिकार केली पाहिजे." प्रफुल्लचंद्र उत्तरला.

"गुन्हेगारांना देहान्त शासन हाच त्यावर खरा परिणामकारक उपाय" खुदीराम उद्गारला.

"अशा गंभीर गोष्टींना अनुकूल वेळ यावी लागते." बाबूजी म्हणाले.

"वेळ आपल्या पावलांनीं चालत येत नाहीं. तिला आपण हांक मारून, हातीं धरून चालवून आणावी लागते." खुदीराम म्हणाला.

त्याला आम्ही तयार आहों." प्रफुल्लचंद्र म्हणाला.

"ठीक आहे. त्या वेळेला केव्हां सामोरें जायचें, कुठें सामोरें जायचें, हें योग्य वेळीं समिति तुम्हांला सांगेल." बाबूजींनीं बळेंच जरा रुष्ट झाल्यासारखें दाखवून सांगितलें.

बाबूजींसारख्या क्रांतिकारकालाही विलायती मालावरील बहिष्कार सरकारला फाळणीच्या बाबतींत वठणीवर आणायला पुरा पडेल असा भरंवसा वाटत नव्हता.

तो मार्ग कमी दगदगीचा म्हणून नेत्यांनीं आंखला असला तरी तो पोकळ नव्हता. चीन, फ्रान्स, आफ्रिका, अमेरिका अशा अनेक

ठिकाणीं दलित जनतेनें त्या मार्गानेंच यशस्वी लढे दिले होते. इंग्रजी साम्राज्य हें व्यापारी–भांडवलशाही साम्राज्य. आपण विलायती मालावर बहिष्कार घालून त्या व्यापारावरच कुऱ्हाड घातली, भारतांतील कोट्यवधी लोक विलायती माल विकत घेईनासे झाले, कीं नफा बुडाला.

इकडे असा व्यापार बुडत चालला, कीं तिकडे विलायतेंत कारखान्यांतून तयार होणारा माल भारतासारखें घबाड गिऱ्हाईक हातचें गेल्यामुळें जागच्या जागीं पडून राह ार.

मग नवा माल कारखान्यांतून उत्पन्न तरी कशाला करायचा?

आणि असें मालाचें उत्पादनच जर गिऱ्हाइकाच्या अभावीं रोडावलें, तर कारखान्यांतील लाखों कामगारांना काम तरी कशाला द्यायचें? पगार कुठचा द्यायचा?

म्हणजे कामगार बेकार होणार, आणि कारखाने ओस पडणार.

भारतांतील इंग्रजी भांडवलशाही साम्राज्य गडगडून पडायला आणखी काय पाहिजे? कारण विलायती मालावर बहिष्कार म्हटला कीं स्वदेशीचा पुरस्कार आपोआप ओघानें आलाच.

तेव्हां विलायती म्हणजे परदेशी हीच सर्वसाधारण लोकांची भावना. असा परदेशी मालावर बहिष्कार घातला कीं देशी उद्योगधंद्यांना 'स्वदेशी' मुळें आयते बरे दिवस येणार.

असा भारताचा शुभ काळ म्हणजेच इंग्रजांचा कठीण काळ. फाळणीवर रामबाण तोडगा म्हणून विलायती मालावर बहिष्कार घालण्याचा निर्णय बंगालनं घेतला तो उगीच नव्हे.

"स्वदेशीमुळें देशी उद्योगधंद्यांची भरभराट ही बहिष्काराची एक उजळ बाजू आहे." असें सांगून बाबूजींनीं जेव्हां तें उदाहरणांनीं पटवून द्यायला सुरुवात केली, तेव्हां त्या मुलांना तें पटलें असतेंही. पण ते तें पटवून घ्यायला राजी नव्हते. ते वडीलधाऱ्या बाबूजींचा उपदेश म्हणून मुकाटपणें ऐकून घेत होते इतकेंच.

बाबूजींनाच मग आपला मान आपण राखून घ्यावा लागला.

"योग्य वेळ आली असें समिति आम्हांला केव्हां सांगेल?" बाबूजींचा रोष मावळला असें पाहून धिटावलेल्या त्या कुमारांनीं पुन्हा विचारलें.

"तोंवर आपणही आपल्या बाजूची तयारी करूंच कीं! आपणांला क्रांति करायची, तर त्यासाठीं शस्त्रें हवीं, दारूगोळा हवा, त्यासाठीं पैसा हवा,—"

"पैसा आम्ही आणूं. सरळ वाटेनें नाहीं तर आडवाटेनें पण पैसा नक्की मिळेल."

"होय. पण तो पैसा मिळवायलाही तुमच्यासारखे पुरेसे देवाघरचे शूर शिपाई लाभायला हवेत ना! क्रांतिदेवीची उपासना करायला आणि वेळ पडली तर तिच्या च णीं आपले बळी द्यायला."

अशी त्या दोघां मुलांची समजूत घालून त्यांना आवरतां आवरतां बाबूजींना त्या रात्रीं अगदीं पुरेवाट झाली. त्यांना भय आणखी कसलें नव्हतें. पण तयारी पुरेशी झाली नसतांना हीं मुलें जर असलें साहस करायला सरसावलीं, तर पतंग पेटत्या दिव्यावर झडप घालून पंख जाळून घेऊन भाजून मरायचे!

## ४ : लढा कसा लढायचा?

त्या दोघां उमलत्या बंगाली बालयुवकांचें रक्तरंजित मनोगत हा भद्रलोक तरुण बंगालच्या मनोगताचा पडसाद होता.

ते दोघे जे ज्ञानेंद्रबाबूंचा निरोप घेऊन निघाले, ते द्रौपदीवस्त्रहरणानंतर क्रुद्ध आणि विषण्ण मनानें कौरवसभेंतून वनवासाला निघालेल्या पांडवांसारखे. वडील भाऊ लढूं देईना, म्हणून त्याच्यावर राग.

"युद्ध करूं नका, तर भोगा वनवास." दरवाजाबाहेर पडतां पडतां खुदीराम आपल्या मित्राकडे पाहून उसासला.

तोंच आजूबाजूनें रस्त्यावरील दिव्यांच्या प्रकाशांत त्यांना तीन-चार हलत्याचालत्या सावल्या दिसल्या.

त्यांच्याच मित्रांतील त्यांच्याच पंथांतील—समवयस्क तरुणांच्या सावल्या होत्या त्या.

"काय म्हणतात बाबूजी?" त्यांतल्या एकानें जवळ येऊन हळूच विचारलें.

"युद्ध करूं नका; वनवास भोगा." निसर्गतः मृदु पण प्रसंगानें कठोर झालेल्या स्वरांत खुदीराम उत्तरला. आणि त्यांच्याबरोबर चालूं लागला.

ते आपसांत काय विचार ठरवीत चालले होते कोण जाणे!

फाळणीचा अंमल तारीख २० आक्टोबरपासून सुरू व्हायचा होता. पण त्या ग्रहणाचे वेध आधींपासूनच लागले होते.

हें फाळणीचें कर्म करून लॉर्ड कर्झन निजधामाला गेला होता. कारण त्याची पांच वर्षांची व्हायसरॉयकीची मुदत संपली होती. व्हाईसरॉय म्हणून पुन्हा तोच ग्रहदशेचा फेरा मुदतवाढीनें आणखी एक दोन वर्षांसाठीं भारताच्या वांट्याला येऊं घातला होता. तो जातां जातां ही अमंगळ करणी करून गेला आणि ती निस्तरायला धनी झाला हंगामी व्हायसरॉय लॉर्ड ऍम्पथिलं. फाळणीचा अंमल तारीख २० आक्टोबरला त्याच्याच सहीनें जाहीर व्हायचा होता.

पण बंगाल कुठचा इतकी वाट पाहत थांबायला! फाळणी होणार आणि आपलें सरकारशीं तुंबळ युद्ध जुंपणार, हें ओळखूनच बंगालनें अगोदरच त्या दिवशीं त्या युद्धाचें प्रस्थान ठेवलें होतें.

त्या दिवशीं तर कडकडीत हरताळच होता. दुसरा दिवस उजाडल्यापासून चळवळ सुरू.

मोठीं माणसें विलायती मालावर बहिष्कार घालून स्वदेशीचें पथ्य पाळायला तयार झालीं तर त्यांत नवल नाहीं. पण तरुण बंगालचें पाऊल तर त्याच्याही पुढें.

## ५ : लढ्याचा आदेश

कलकत्त्याच्या नगरभवनांत फाळणीविरुद्ध लढा देण्याची जी विराट बंगालची घोषणा झाली, त्या लढ्याचा कार्यक्रम आंखून तसा आदेश जनतेला द्यायचा. त्यासाठीं त्याच रात्रौ महाराजा ज्योतींद्रमोहन टागोर यांच्या प्रासादांत पुढारी मंडळींची सभा घेण्यांत आली होती.

ज्ञानेंद्रबाबू त्या सभेला हजर होते. तसेंच लढयाचा निश्चित आदेश काय हें समजून घेण्यासाठीं शेंकडों तरुण सभागृहाच्या आवतीभोंवतीं उत्सुकतेनें उभे होते.

ज्ञानेंद्रबाबूंनीं आंत जातांना पाहिलें, तों ती लवकुशांची जोडी त्या तरुणांत उभी. खुदीराम आणि प्रफुल्लचंद्र.

नगरांतील सारी पुढारी मंडळी त्या रात्रीं त्या सभेला आली होती. त्यांत सुरेंद्रबाबू, अंबिकाचरण मुजुमदार वगैरे कॉंग्रेसचे पुढारी होते. ज्ञानेंद्रबाबूंसारखे तरुण क्रांतिकारकांचे पुढारी होते. महाराजा टागोरां-सारखे राजेमहाराजे होते. सरकारच्या कृपेला पात्र झालेले रायसाहेब, रायबहादुर असे सन्मान्य पदवीधर आणि मोठमोठे वकील, बॅरिस्टर, जमीनदार, शेठसावकारही होते. संकटकाळ वेगवेगळ्या माणसांची अशी एकजूट करतो.

कारण फाळणी हा रावापासून रंकापावेतों सर्व बंगालच्या जीवन-मरणाचा प्रश्न होता. सर्वांचींच अंतःकरणें फाळणीच्या फाळानें फाळलीं गेलीं होतीं.

स्वदेशी आणि बहिष्कार हा चळवळीचा पाया तर घातला गेलाच होता. त्याविषयीं कोणाचेंही दुमत तत्त्वांतही नव्हतें आणि तपशीलांतही नव्हतें. त्या चळवळीचा प्रभाव लपणारा नव्हता.

अमेरिकेनें स्वातंत्र्याचा लढा लढतांना विलायती मालावर बहिष्कार घालून नाहीं इंग्रजांना वठणीवर आणलें ?

चीन देश भारतासारखाच यांत्रिक उद्योगधंद्यांच्या बाबतींत मागसलेला. पण चिनांत नाहीं अमेरिकन मालावर घातलेला बहिष्कार यशस्वी झाला?

स्वदेशीची चळवळ देखील बंगालमध्यें अगदीं नवी असली तरी ती लोकमान्य टिळकांच्याही पूर्वींपासून महाराष्ट्रांत वहिवाटलेली होती. इतर कांहीं प्रांतांतही तिचा प्रसार होताच.

पण कांहींना मुळांतच शंका होती ती अशी कीं, लंडन एवढें बलाढ्य राष्ट्र. त्याविरुद्ध आपण इतक्या निकरानें कडूपणा पत्करून लढा उभा केला, तर अखेरपावेतों आपणाला टिकाव धरतां येईल का?

त्यावर अनेकांनीं छातीठोकपणानें सांगितलें, "कां नाहीं टिकाव धरतां येणार? कां नाहीं जय मिळवतां येणार?"

रूसो–जपानी युद्धाचा दाखला अगदीं ताजा होता. तो देऊन अनेकांनीं छातीठोकपणानें सांगितलें, "जपान हें केवढें चिमुकलें राष्ट्र, आणि रशिया केवढा मोठा! पण जपाननें रशियाला युद्धांत लोळवलें कीं नाहीं? आशिया खंडांतील राष्ट्रें मागसलेलीं असलीं तरी तीं देखील युरोपांतील बड्या राष्ट्रांना नामोहरम करूं शकतात. जपानचेंच पाहा कीं! आपला देश जपानच्या मानानें किती प्राचीन! किती मोठा! आम्ही तेहतीस कोटी हिंदी लोकांनीं नुसती मूठमूठ माती विलायतेवर फेकली तरी सारी विलायत त्या मातीच्या पर्वताखालीं गाडली जाईल कीं!"

शत्रूचा प्रतिकार करायचा तर शस्त्रानिशीं, हा धोपटमार्ग झाला. पण इथें प्रतिकाराला शस्त्रें कुठून आणायचीं? सरकारनें हत्यारांचा कायदा करून अगोदरच शस्त्रें वापरायला हिंदी लोकांना कायद्यानें बंदी केलेली.

बाबू बिपिनचंद्रपालांनीं सुचवलें, "आपण निःशस्त्र प्रतिकार करायचा."

बिपिनबाबू मुळांत अरविंदबाबूंसारख्या ज्वलज्जहाल क्रांतिकारकांच्या मालिकेंतले वडीलधारे. साऱ्या भारतांत तेव्हां लाल–बाल–पाल हीं तीन

थोर देशभक्तांचीं नांवें ज्याच्या त्याच्या तोंडीं झालीं होतीं. पंजाबचे लाला लजपतराय. महाराष्ट्राचे बाळ गंगाधर टिळक आणि बंगालचे बिपिनचंद्र पाल.

त्या पालबाबूंनीं निःशस्त्र प्रतिकाराचा पुरस्कार केलेला ऐकून सर्व मोठ्या मंडळींना प्रथम नवल वाटलें. सशस्त्र क्रांतीच्या उठावासाठीं तनुमनधन वेंचून पडद्यामागून प्रयत्नांची शिकस्त करणारे हे पाल बाबू निःशस्त्र प्रतिकार करा म्हणतात म्हणजे काय ?

अनेकांनीं उत्साहाच्या भरांत त्यांना तसें विचारलेंही.

त्यांनीं त्यांना स्पष्ट विचारलें, "सशस्त्र क्रांति करायला पिस्तुलें, रायफली, बॉंबगोळे, हत्यारें आणि दारूगोळा कुठें तुमच्यापाशीं आहेत ? अशा स्थितींत सार्वत्रिक संप—निःशस्त्र प्रतिकार हेंच अमोघ अस्त्र आपण धारण करूं आणि लढा मांडूं. वळी इंग्रजाच्या सर्व शस्त्रांना पुरून उरणारें हें दिव्य अस्त्र आहे. या अस्त्राची धार तरवारी—पिस्तुलें. बंदुका—तोफा बॉंबगोळ्यांपेक्षां किती तिखट असते, आणि ती शत्रूला कशी नको जन्म करून सोडून वठणीवर आणते, तें दक्षिण फ्रान्समधील त्या बहाद्दर दारूमळेवाल्यांना जाऊन विचारा."

दक्षिण फ्रान्समधील दारूचे मळेवाले आणि फ्रेंच सरकार यांचा लढा सुरू होता. तो लढा म्हणजे मळेवाल्यांच्या बाजूनें तरी बिनहत्यारी लढाई म्हणजे, सार्वत्रिक संप—अडवणुकीचा निःशस्त्र प्रतिकारच होता. प्रतिकार दिवसेंदिवस चांगलाच यशस्वी होत होता. साऱ्या जगांतील दलित जनतेचे डोळे त्या लढ्याकडे लागलेले होते.

"कसा आणीत आहे तो मळेवाल्यांचा दक्षिण फ्रान्समधील टापू फ्रेंच सरकारला वठणीवर तें जरा पाहा." असा पालबाबूंनीं सर्व मंडळींना त्या लढ्याचा वृत्तांत सांगितला.

"एक नव्हे, दोन नव्हे, तिकडे शेंकडों शहरांतून आणि खेड्यांतून सरकारला असा अप्रत्यक्ष प्रतिकार सुरू आहे. हजारों कारकुनांनीं नोकऱ्या

सोडल्या. मुलांनीं शाळा सोडल्या. शहरांतील म्युनिसिपालिट्या ना नोकर ना सभासद अशा ओस पडल्या. धडाधड सर्वांचे राजीनामे तारेनें सरकारच्या छाताडावर जाऊन आदळूं लागले. पॅरिसमधील लोकसभेचे सभासद देखील सभा सोडून चालते झाले. सरकारी पदकें, पट्टे, सनदा, कचऱ्याच्या पेटींत कचऱ्याचा ढीग पडावा तसें सरकारच्या कचेऱ्यांत जाऊन पडले. आणि हें सारें किती वेळांत झालें सांगू तुम्हांला? एका-तासांत. अशी अवघ्या एका तासांत दक्षिण फ्रान्समधल्या त्या विस्तीर्ण प्रांतांतील राजवट थंडगार झाली. तशी आपल्या बंगालमध्येंही त्याच मार्गानें जाऊन इंग्रजी राजवट आपणांला थंडगार कां नाहीं करतां येणार?"

शेवटीं सर्वानुमतें ठरलें कीं असा लढा द्यायचा. पण अगोदर सरकारला फाळणीबाबतचा आपला निषेध तारेनें स्पष्ट शब्दांत कळवायचा. तशी तार सरकारला महाराज टागोरांच्या नांवानेंच तावडतोब करण्यांत आली. पण त्याचा उपयोग काय?

पण आतां बंगाल तरी कुठें थांबायला तयार होता! निःशस्त्र प्रतिकाराच्या लढ्याचें प्रस्थान अगोदरच ठेवण्यांत आलें होतें. किंबहुना लढा सुरू झालाच होता.

## ६ : आघाडीला बालसेना

विचार पडतो मोठ्या मंडळींना, कीं काय करावें? कसें करावें? केव्हां करावें? पण बाळांचें जग हें निराळेंच. त्यांत मोठ्या मंडळींच्या जगांतल्यासारखी साधकबाधक चर्चा नाहीं, अटीतटी नाहींत, कीं डाव-पेंच नाहींत. करा म्हणजे करा.

तिकडे महाराजा टागोरांच्या प्रासादांत सारें कांहीं ठरवण्यासाठीं मोठ्या माणसांची सभा रात्रौ भरणार आहे हें बाळगोपाळांना कोणीं सांगितलेंही नाहीं, आणि त्यांचेंही त्या सभेमुळें कांहीं नडलें नाहीं. त्यांनीं

नगरभवनांतील सभेचा आदेश घेऊन घरीं जातां जातां आपापल्यापुरता मित्रांमित्रांनीं पुढचा कार्यक्रम ठरवून अमलांत आणायलाही सुरुवात केली.

"काय काय विलायती माल वापरतों आपण? त्याच्यावर बहिष्कार घालायचा आपण." घरीं जातांजातांच मुलांमुलांचे बेत ठरले.

आणि 'विलायती' म्हणून काय काय टाकायचें, याचा तडकाफडकी बालिश पण गंभीर विचारविनिमयही झाला.

"अंगांतले कपडे विलायती आहेत. त्यांना उद्यांपासून रजा."

"विलायती शिसपेन्सिलीनें यापुढें लिहायचें नाहीं."

"टांकाचीं टोंकें विलायती ना? द्या फेकून."

"बूटपाटलूण विलायती. बस्स, आजपासून बूटपाटलूण वापरायची नाहीं. धोतर नेसायचें, पायांत चपला घालायच्या."

तोंच एका मुलानें शंका काढली, "पण टोपी? टोप्या विलायती. धोतरें आणि चपला यांसारख्या देशी टोप्या रे कुठच्या आणायच्या?

त्यांत एक मद्रासी मुलगा होता. तो चटकन् म्हणाला, "टोप्या हव्याच कशाला पण मी म्हणतों? आम्ही मद्रासेंत कुठें डोकीला कांहीं घालतों? मोकळ्याच माथ्यानें हिंडतों फिरतों कीं आम्ही. तसेंच करायला काय हरकत आहे?"

बस्स. टोपीला पर्याय सांपडला. तिथें मग हें बरें कीं वाईट, करावें कीं न करावें, अशी मोठ्या मुलांसारखी आणि वडील मंडळींसारखी चिकित्सा नाहीं.

ठरलें. उद्यांपासून उघड्या माथ्यानें शाळेंत जायचें.

"केंस चांगले नीटनेटके दिसावेत म्हणून विंचरून भांग पाडूं म्हणजे झालें." त्यांतल्याच एकानें शक्कल काढली.

घरें अजून यायचीं होतीं. तों वाटेंतच बहिष्काराला सुरुवात. त्या घोळक्यांतल्या साऱ्या मुलांनीं आपल्या टोप्या काढून हातीं घेतल्या.

"घरीं गेल्यावर विचारतील तर सांगूं मद्रासी लोक डोकीला कांहीं घालत नाहींत. मग आम्हीं तरी कशाला टोपी घालायची?"

घरीं आईबाप हटकतील, तर त्यांच्यापुढें अशी बचावाची तयारीही मुलांमुलांत घरीं जातांजातांच झाली.

आणखीही आपल्या रोजच्या वापरांत 'विलायती' काय काय आहे, त्यावर बहिष्कार कसकसा घालायचा, याच्या झटझट मसलती झाल्यां.

आतां त्या मसलती आपण अमलांत आणायच्या; आणि आपल्या शाळासोबत्यांना घरोघर जाऊन नाहीं तर शाळेंत भेटून अमलांत आणायला लावायच्या असें ठरलें. घरोघरच्या बाळगोपाळांनीं युद्धाची आघाडी अशी प्रथम उघडली.

"हीं अशीं बरोबरीचीं मुलें तेवढीं आघाडीला. आणि आम्ही? आम्ही तरी कां म्हणून मागें राहूं?" मुलीही मग म्हणूं लागल्या.

"चिटाचें परकरपोलकें नको. साडी नको."

"विलायती बांगड्या वापरायच्या नाहींत."

"विलायती फणीनें केंस विंचरायचे नाहींत."

"विलायती स्नो–पावडर आजपासून टाकली."

असा विलायती मालावर बहिष्कार घालण्यांत लहान मुलींचें पाऊल बरोबरीच्या मुलांच्याही पुढें.

शाळेंत जाऊन पाहावें तों तेंच. घरींदारीं, देवळीं, राऊळीं जिकडे तिकडे तेंच. मुलांचें जग अशा रोखठोक बहिष्कारानें व्यापून गेलेलें. घरोघरच्या वडील माणसांनीं तें पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घालावीं.

वडील माणसांनीं तरी त्या मुलांना कसें आवरावें? आणि कां म्हणून आवरावें? तीं असें काय वाईट करीत होतीं?

पण आईबापें अशीं गप्प बसलीं तरी सरकारी शाळाखातें थोडेंच गप्प बसायला तयार होतें!

सरकार शाळकरी मुलांना भीत होतें असें मुळींच माहीं. पण मुलें म्हणजे रामाची वानरसेना. रामानें वानरसेनेच्या बळावर रावणाची लंका जाळली. लंकेंत कोंडून रावणालाही लोळवलें आणि जाळलें. तशी ही वानरसेना बहिष्काराचे पेटते पलिते हातीं घेऊन बंगालमधल्या इंग्रजी राजवटीची लंका जाळायला निघाली. रामासारखा सारा बंगाल त्या वानरसेनेचा पाठीराखा होता. म्हणून तर रावणासारखें सरकार त्या रामावर खवळून उठलें.

बहिष्काराची आग शाळकरी लहान मुलांतून जी भडकूं लागली ती शाळा—कॉलेजांत सगळीकडे भडकली. मुलांलेकरांना आणि तरुणांना एवढा चेव आलेला सरकारनें हात जोडून स्वस्थ बसून कसा पाहावा?

फाळणीचा अंमल अजून सुरू व्हायचाच होता. तो सुरू झाल्यावर रणें माजणार तीं दूरच होतीं. ही नुसती लढाईची पूर्वतयारी चालली होती. ती पाहूनच सरकार घाबरलें. चिडलें. आणि शिकाऱ्यांची चाहूल लागतांच बंगालच्या रानांतला वाघ चिडून झाडींतून शिकाऱ्यांवर चालून यावा तसे दडपशाहीचे पंजे उगारून लोकांवर तुटून पडूं लागलें.

## ७ : ते नऊ आठवडे

पण दडपशाही सरकारनें सुरू केली ती बूमरँगसारखी चळवळीला अपाय करण्याऐवजीं सरकारवरच उलटूं लागली. ती कुठपासून? खास घरापासून म्हणजे सरकारी नोकरांपासून.

हिंदी नोकर बिचारे मन मारून पोटासाठीं सरकारी नोकरी करणारे. मुलें ऐकेनाशीं झालीं म्हणून मुलांच्या वाटेला जाण्याची त्यांची छाती होईना. त्याला त्यांचा तरी काय इलाज होता? तथापि एरव्हीं आपण भले कीं आपली पोटाची नोकरी भली, इतकी भिऊन वागणारी ती नोकरमंडळी. तरीही सरकारला त्यांचा संशय असा कीं हे लोक घरच्या मुलांना चळवळींत पडायला फूस देतात, आणि चळवळीला मदत करतात.

लगेच सरकारनें सरकारी नोकरवर्गाच्या पाठीवर सक्तीच्या हुकुमाचा कोरडा ओढला.

"सरकारी नोकर देशांत फाळणीविरुद्ध चाललेल्या आगलाव्या चळवळीला कोणत्याही प्रकारें सामील आहेत असें सरकारला आढळून आल्यास त्याचा सक्त विचार करण्यांत येईल."

कांहीं न करतां न सवरतां सरकार आपणांवर हकनाहक तोहमत घेतें—चोर—डाकू—दरोडेखोरांवर गुप्त नजर ठेवावी तशी आपणांवर नजर ठेवतें; असें पाहून पुष्कळ सरकारी नोकरही मनांतून चिडले.

"असें काय? वाघ म्हटलें तरी हें सरकार आम्हांला खाणार, आणि वाघोबा म्हटलें तरी खाणार. मग वाघूट म्हणायला तरी कशाला भ्यायचें?" ते चिडून बोलूं लागले.

तीच गत विद्यार्थ्यांच्याही बाबतींत झाली. विद्यार्थी शाळाखात्याच्या आणि विश्वविद्यालयाच्या ताब्यांत. आणि सबंध शाळाखातें सरकारच्या ताब्यांत. लॉर्ड कर्झननें विश्वविद्यालयाचा जाचक कायदा करून सर्व शिक्षणसंस्था आणि विद्यार्थी यांचा कोंडमारा करून ठेवलाच होता. शाळाखात्यामार्फत सर्व शिक्षणसंस्थांना शिस्तीचा करडा हुकूम सुटला.

'स्वदेशी चळवळींत विद्यार्थ्यांनीं कोणत्याही प्रकारें भाग घेतां कामा नये. घेतल्यास त्यांचा आणि ते शिकत असलेल्या शिक्षणसंस्थांचा सक्त विचार केला जाईल.'

पण उसळत्या उष्ण रक्ताचे विद्यार्थी असल्या धमक्यांना थोडेच जुमानतात! असे दडपशाहीचे नवे नवे हुकूम बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरनें विद्यार्थ्यांना जरबेंत ठेवण्यासाठीं जारी करावे; आणि विद्यार्थ्यांनीं ते बेगुमानपणें पायांखालीं तुडवीत बेधडक चळवळींत सामील व्हावें.

"स्वदेशी चळवळींत विद्यार्थ्यांनीं भाग घेतां कामा नये? विलायती मालावर बहिष्कार घाला म्हणतां कामा नये? चलारे, पेटवा विलायती कपड्यांची होळी."

एक म्हणाला, दोन म्हणाले, तसे ठिकठिकाणचे विद्यार्थी झुंडी-झुंडींनीं रस्त्याच्या नाक्यानाक्यावर, चौकाचौकांतून परदेशी कापडाच्या होळ्या पेटवूं लागले. सारे लोक त्यांत सामील होऊं लागले.

कुणा सोबत्याच्या अंगांत परदेशी कापडाचे कपडे दिसले रे दिसले, डोक्रीला टोपी दिसली रे दिसली, कीं लावा उतरायला आणि टाका होळींत. दांडगाईनें, बळजबरीनें कुणाचीही विलायती कोट–टोपी मुळींच हिरावून घ्यायची नाहीं. मागायची. दिली तर ठीक. नाहींतर सर्व विद्यार्थ्यांनीं एकजूट करून विलायती माल वापरणारालाच 'विलायती' समजून त्यावर बहिष्कार घातला, कीं तो माणूस नमत नाहीं कुठवर? शाळासोबत्यांपुढें त्याला नाक मुठींत घेऊन नमावेंच लागे.

कुठें कांहीं दंगाधोपा नाहीं, मारझोड नाहीं, कांहीं नाहीं. पण सारें 'स्वदेशी' वापरणाऱ्या शेंकडों सौंगड्यांत एकटा दुकटा विद्यार्थी जें करूं नये तें करायला धजेलच कशाला?

नेणत्या लेकरांतही तेंच वारें. सुरेंद्रबाबूंची नात अवघी पांच वर्षांची. पण देशांत सुरू झालेल्या चळवळीनें तीही पुरती भारून गेलेली. म्हणे तिला कोणीं वाढदिवसाची भेट म्हणून परदेशी कातड्याचा छानदार बूट दिला.

तिनें तो पाहिला, आणि तसाच फेकून दिला.

"कां ग?" मंडळी आश्चर्यानें विचारूं लागली.

त्यावर त्या लेकराचें ठाम उत्तर. "विलायती बूट मला नको."

बुटाचें कातडें विलायतचें आहे कीं आणखी कुठच्या देशाचें आहे हें त्या मुलीला नक्की कळत नसेना कां? पण बूट म्हणजे विलायती पायतण एवढें कळत होतें तेंच काय कमी होतें?

तशीच एका डॉक्टरांच्या लहानग्या मुलीची गोष्ट. मुलगी आजारी पडली. अगदीं बेशुद्ध पडेपावेतों पाळी आली. घरचेच डॉक्टर, प्रत्यक्ष वडील. त्यांनीं औषध तयार करून आणलें.

पण तें चमच्यानें तिच्या तोंडांत घालूं लागले तों ती तें औषध घेईना. तिनें चमचा तशा अर्धवट शुद्धींतच हातानें लोटून सांडून दिला. आणि स्पष्ट सांगितलें, "विलायती औषध मला नको."

कोणी परदेशी कापडाचे व्यापारी होते. कोणी विलायती औषधांचे दुकानदार होते. कुणाचीं 'विलायती' खेळण्यांचीं दुकानें होतीं. अशा हरतऱ्हेच्या देशीपरदेशी मालानें बाजारपेठा गजबजलेल्या. पण व्यापाऱ्यांना मात्र व्यापार करण्याची चोरी होऊन बसली.

गिऱ्हाईक तर राजरोस 'विलायती' माल घ्यायला धजायचें नाहींच. एखाद्याच्या मनांतून छानदार नखरेबाज विलायती मालच घ्यावा असें असलें तरी त्याला मनाची नाहीं तरी जनाची लाज होतीच कीं! लोकांत परदेशी मालाचा इतका तिटकारा दिवसेंदिवस वाढत होता, कीं छानछोकीचा परदेशी पेहराव करून रस्त्यानें चाललेल्या गृहस्थाच्या सावलीला पाहून देखील शाळकरी मुलें दूर सरायचीं. भिऊन नव्हे, तर त्याच्या विलायती सावलीचा आपणांला विटाळ होईल म्हणून.

घरचीं मुलेंच इतकीं भलेपणानें धिटावलीं, मग मुलांचीं वडील माणसें कशीं मागें राहणार? आणि मुलांचें पाहून जाणत्या विद्यार्थ्यांना, तरुणांना; तरुणांचें पाहून प्रौढांना, आणि 'आतां आमचें काय? दहा गेले आणि पांच उरले' असें म्हणणाऱ्या वडीलधाऱ्या वृद्धांना तरी मागें राहणें कसें बरें वाटणार?

अशी लढ्याची आघाडी वाढत चालली.

लढ्याच्या कार्यक्रमाची आंखणी झाल्यावर पुढारी मंडळींनीं ठरवलें, परदेशी मालाच्या दुकानांवर पिकेटिंग करायचें.

पिकेटिंग करायचें का? ठीक. त्यासाठीं देखील 'वानरसेना' सर्वांच्या आघाडीला.

वडील, काका, मामा परदेशी मालाचे दुकानदार. आणि त्यांचींच मुलें वानरसेनेंतून आपल्याच दुकानांवर पिकेटिंग करायला हात जोडून

...र वाचनालय, ...



उभीं. कसा धीर व्हावा दुकानदाराला परदेशी माल विकायला, आणि लोकांना विकत घ्यायला तरी!

फाळणीची योजना जाहीर झाल्यापासून फाळणीचा अंमल व्हायला नऊ आठवड्यांचा अवकाश मिळाला. तेवढ्यांतच साऱ्या बंगालभर चळवळीचें असें रान पेटलें. परदेशी वस्तूंचा व्यापार ठार बुडूं लागला. तसे गोऱ्या व्यापाऱ्यांचेही डोळे पांढरे होण्याची वेळ आली.

गोरे व्यापारी म्हणजेच इंग्रज सरकार. राज्यकर्ते ते. त्यांना आणि त्यांच्या सरकारलाही वाटूं लागलें कीं ही राजद्रोहाची सांथ आली.

मागें आठनऊ वर्षांपूर्वी पुण्यांत आणि सगळीकडे आलेली प्लेगची सांथ, तशी ही राजद्रोहाची सांथ.

ती प्लेगची सांथ दडपशाहीनें नाहीं तरी इतर उपायांनीं तरी आटोक्यांत आली. पण राजद्रोहाची सांथ तशी आटोक्यांत येणारी नव्हती.

सरकार दडपशाही करूं लागलें चळवळ विझावी म्हणून. पण सरकार चळवळ विझविण्यासाठीं जें पाणी म्हणून ओतीत होतें, तेंच तेल ठरूं लागलें. चळवळ वाढूं लागली तशी दडपशाही वाढूं लागली. आणि आगींत तेल पडूं लागलें तशी आग अधिकाधिक भडकूं लागली.

आणि आतां उद्यां फाळणीचा अंमल होणार! सरकार आणि जनता यांचें निःशस्त्र प्रतिकारी युद्ध जुंपणार!

ग्र. ९२२१५
४००२
दिनां २५०

**स्वाध्याय :**

१ बंगालची फाळणी करण्याची कल्पना लॉर्ड कर्झनला कां सुचली?
२ बंगाली तरुण कर्झनवर कां चिडले होते?
३ कोरियाच्या पंतप्रधानापाशीं कर्झन कसें खोटें बोलला? कां?
४ नऊ आठवड्यांत फाळणीच्या विरोधी चळवळीचें रान कसें पेटलें?
५ कलकत्त्यांतील सभेनें काय निर्णय घेतला?
६ सरकारी दडपशाहीचें पाण्याचें तेल कसें झालें?

प्रकरण तिसरें

# खुदीराम बोस

## १ युद्ध सुरू झालें

फाळणीची तारीख १६ आक्टोबर १९०५ उजाडली. कल-कत्त्याच्या दैनिकांतून काळ्या रेघांच्या सुतकी चौकटींत घालून फाळणीचा अंमल आजपासून सुरू झाल्याची सरकारी घोषणा प्रसिद्ध झालेली सर्वांनीं वाचली. वाचली नुसती नांवाला. सरकार काय करणार आणि आपण काय करायचें हें लढ्याच्या युद्धसमितीनें अगोदरपासूनच साऱ्या बंगालला निवेदन केलें होतें.

आज त्यांतला पहिला कार्यक्रम गंगास्नानाचा.

उजाडतें न उजाडतें, तेव्हांपासूनच मुलांलेकरांपासून वयोवृद्धां-पावेतों नागरिक स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी गंगेवर जाऊन स्नान करून माघाऱ्या येऊं लागल्या. हिंदु, मुसलमान सारे-सारे त्यांत एक-जुटीनें सामील होते.

असें आज युद्ध सुरू झालें.

सरकारलाही माहीत होतें कीं आज बंगालच्या जनतेशीं कल-कत्त्याच्या रणभूमीवर आपला लढा सुरू होणार. त्यासाठीं शस्त्रांनीं सज्ज होऊन चळवळीशीं लढण्याकरितां गोरे सोजीर आणि देशी पोलिस शहरभर उभे होते. पण त्यांना आपण कुणाशीं लढायचें आणि कसें लढायचें हेंच कळेना. ते अगदीं बुचकळ्यांत पडले. शांतपणें नदीवर जाऊन स्नान करून येणाऱ्या नि:शस्त्र लोकांवर उगीचच गोळ्या झाडायच्या?

लोक झुंडीझुंडींनीं नदीवर स्नानाला जात, ते रस्त्यांत पोलिस आणि सोजीर उभे आहेत, ते जिते आहेत कीं दगडाचे, शाडूचें बाहुलें

उभें आहे इकडे ढुंकूनही पाहत नव्हते. तिथें मग बिचारे पोलिस आणि सोजीर तरी काय करणार?

"आँ: ? मुसलमान देखील हिंदूबरोबर गंगास्नानाला जातात हें कसें ?" गोरे आणि गांवठी गोरे ऊर्फ अँग्लोइंडियन पोलिस अधिकारी गंगेवर स्नानासाठीं हिंदु-मुसलमानांना गळ्यांत गळा घालून जातांना पाहून आपसांत एकमेकांशीं चुटपुटत होते. त्यांना तें पाहवत नव्हतें. आणि त्याला काय करावें तें सुचत नव्हतें.

फाळणीचा सरकारी डाव हुकणार काय ?.... अशी चिंता तिकडे राजभवनांत फुल्लरच्या गोऱ्या चर्येवर काळवंडूं लागली होती. हिंदु-मुसलमानांत फूट पाडून फोडा आणि झोडा या तत्त्वावर इंग्रजी राजवट भारतांत मजबूत करण्यासाठीं तर तो कर्झनचा दडपशहा मानसपुत्र नव्या पूर्व बंगालचा लेफ्टनंट गव्हर्नर झालेला. त्यानें बंगालच्या हिंदु-मुसलमानांत फूट पाडून, हिंदूविरुद्ध मुसलमानांना चिथवून त्यांचें काय वाईट करायचें बाकी ठेवलें होतें ? तरीही त्याला यश येईना !

कर्झन आणि फुल्लर दोघांनाही वाटलें होतें कीं पूर्वबंगाल हा बहुसंख्य मुसलमान वस्तीचा प्रांत. तो सवता सुभा मुसलमानांना थाटून दिल्यासारखा केल्यावर ते कां नाहीं 'सरकारकी जय' म्हणणार ? आणि हिंदूशीं त्यांची भाऊबंदकी कां नाहीं माजणार ?

फुल्लरनें निर्लज्जपणें मुक्ताफळें उधळलीं होतीं, "हिंदु आणि मुसलमान या माझ्या दोन राण्या. यांपैकीं मुसलमान राणी माझी अधिक आवडती."

तरी देखील ती त्याची राणी त्याची सावलीसुद्धां आपणावर पडून घ्यायला तयार होईना.

त्या दिवशीं सकाळपासून दुपारपावेतों केवढा मोठा गंगास्नानाचा सोहळा झाला. आणि दुपारीं रक्षाबंधनाचा समारंभ. तो देखील हिंदु-मुसलमान साऱ्या बंगाल्यांनीं अगदीं एका विशाल कुटुंबांतील भांवडां-

प्रमाणें जिल्हाळ्यानें साजरा केला. फुल्लरचा कपाळशूळ चाळवायला तें आणखी एक नवें कारण झालें.

रक्षाबंधनाचा सोहळा वास्तविक हिंदूंचा. अतिप्राचीन शुभसंस्कार म्हणून तो ओळखला जातो. तेव्हांही ओळखला जाई. रक्षा ऊर्फ राखी बहिणीनें भावाच्या हातीं बांधावयाची. भावानें भावाच्या हातीं बांधावयाची. मित्रानें मित्राच्या हातीं बांधावयाची.

पूर्वी मुसलमानी अमलाचा धुडगुस चाले. राजपूत ललना मनगटमस्त मुसलमान सुलतान, शहाजादे, सुभेदार, सरदार यांच्या डोळयांत सलायच्या. 'त्या मुसलमानांच्या पापी नजरेपासून माझें रक्षण कर' अशा काकुळतीच्या विनवणीसह राजपुत कन्यांनीं पराक्रमी राजपूत राजाला, राजपुत्राला, किंवा तरुण शूर सरदाराला राखी पाठवायची.

ती राखीच आपल्या मालकिणीच्या वतीनें कुणीं कांहीं न विचारतां त्या राजपूत वीराच्या कानांत मनोगत बोलायची, "माझी मालकीण तुला पाठचा भाऊ मानते. तुझ्या बहिणीचें पावित्र्य आणि स्वातंत्र्य धोक्यांत आहे. तूं तिचा भाऊ तिचें रक्षण करणार नाहींस?"

अशा वेळीं कोणता हिंदु भाऊ आपले प्राण पणाला लावूनही आपल्या बहिणीचा पाठराखेपणा करायला मुसलमानावर चेवून धांवून जाणार नाहीं?

पण आज काळ पालटला होता. आज हिंदु मुली आपल्या मुसलमान भावांच्या हातांत त्याच राख्या विश्वासानें बांधीत होत्या.

आणि ह्या सर्व सोहळ्याला जिकडे तिकडे 'वंदेमातरम्' चें पार्श्वसंगीत! तें कानीं पडतांच तर गोरे अधिकारी रामनाम कानीं पडतांच भुतांनीं भेदरटपणानें पिसाळावें तसें पिसाळत.

ते पिसाळत त्याला कारण होतें. फुल्लरच्या दडपशाही अमलांत पगारी हेर-चुगलखोरांचा सुकाळ होता. अशा कोणा हेरानें येऊन त्याला चळवळ्या लोकांच्या गोटांतील एक खित्तंबातमी सांगितली होती.

"वंदेमातरम् हा बंडाचा परवल आहे. गोरे लोक सांपडले, कीं त्यांना 'बांधो मारो' अशी चिथावणी आहे त्या शब्दांत. सत्तावन सालाला आतां लौकरच एकदोन वर्षांत पन्नास वर्षे पुरीं होणार. तो बंडाचा एक्कावन्नावा वाढदिवस इंग्रज सरकारविरुद्ध बंड करून साजरा करण्याचा डाव आहे या चळवळ्या बंडखोरांचा."

मग काय! प्रत्येक गोऱ्याला 'वंदेमातरम्' चा क्रूर राक्षस आपणाला बांधून मारायला टपलेला दिसूं लागला!

काय भाग्यवान् तें गीत! बाबू बंकिमचंद्रांनीं आपल्या 'आनंदमठ' कादंबरींत ओसाड अरण्यांतून हिंडणाऱ्या भटक्यांनीं गाण्याकरितां लिहिलेलें. पण तेंच बंगालच्या फाळणीविरुद्ध लढायला बंगालला चैतन्य देणारा महामंत्र ठरलें. आणि तें आज राष्ट्रगीत म्हणून स्वतंत्र भारतमातेचें सौभाग्यचिन्ह होऊन बसलें आहे!

फुल्लरच्या बैली सरकारला बुजवायला एवढी लाल चिंधी (Red rag to a bull) पुरेशी होती. तिथें तडाक्यासारखा 'वंदेमातरम्' पद गाणें हा गुन्हा ठरला.

हा नवा गुन्हा जन्माला आला मात्र. आणि निर्भयपणें, निष्ठापूर्वक तो गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांची नुसती रीघ लागली. सरकार काय इतक्या लाखों लोकांना पकडून तुरुंगांत घालणार? लोकांना मात्र सरकारचा जीव हैराण करणाऱ्या गुदगुल्या करायला तें नवें साधन सांपडलें.

जिकडे पाहावें तिकडे 'वंदेमातरम्'! घरेदारें, शाळा, देवळें जिकडे पाहावें तिकडे 'वंदेमातरम्' लिहिलेलें. तसेच घरोघरीं 'वंदेमातरम' चे सूर घुमूं लागले. शब्द लिहिलेले दिसूं लागले.

गोऱ्या अधिकाऱ्यांनीं ते सूर ऐकले, कीं कोणींतरी शिसें तापवून आपल्या कानांत ओतलें कीं काय असें त्यांना वाटे. कुठें तो शब्द लिहिलेला दिसला रे दिसला, कीं सैतानानें किंवा तांत्रिकानें रक्तानें रंगविलेल्या मंत्रचक्राप्रमाणें त्यांना तो भयानक दिसे. ते घाबरत, बुजत, भीत,

बेफाम होत. पण करणार काय! गांधीलमाशा चावतात, म्हणून त्यांना पकडायला पोलिस कुठें कुठें म्हणून धांवणार?

चळवळीचें रान एकदां पेटलें तें विझतें थोडेंच! तें एकसारखें असें पेटतच चाललें.

हें रान पेटविण्यांतही तरुण बंगाल धडाडीनें पुढें. खुदीराम आणि त्याचे प्रफुल्लचंद्रासारखे जिवाभावाचे साथीदार याचें त्यांत प्रमुखपणानें अंग होतेंच. 'युगांतर' समितीच्या, तशाच दुसऱ्या 'अनुशीलन' समितीच्याही शाखाप्रशाखा कुठें त्या संस्थेच्या पाळांमुळांचे अंकुर म्हणून तर कुठें क्रांतिकारकांचे निराळे गुप्त गट म्हणून पसरल्या होत्या. ते सारे तरुण अगदीं मन लावून स्वदेशी-बहिष्काराच्या आंदोलनाचे पेटते पलिते हातीं घेऊन सारा बंगाल जागवीत सुटले होते. त्या जागृतीनें फुल्लरला अगदीं सळो कीं पळो करून सोडलें होतें.

आणि चळवळ्येही फुल्लरला अगदीं नको जीवसा करून सोडीत होते.

सरकार धरपकड करी. पण एक पकडावा तों त्याच्या सवाई चळवळ्या दुसरीकडे उपटावा. जिकडे पाहावें तिकडे चळवळ्ये! बारीक सारीक कारणावरून उगीच धरपकड तरी कशी करायची?

चळवळ सुरू होऊन महिना गेला, दोन महिने गेले. ती बंगाल-भर फैलावली तशी बंगालबाहेर महाराष्ट्र, पंजाब, मद्रास इकडेही मूळ धरूं लागली. तरी सरकार कांहीं ताळ्यावर येईना. फुल्लरची दडपशाही एक-सारखी रावण–जरासंधांच्या दंडेलीप्रमाणें वाढतच होती.

"आम्हांला आतांतरी कांहीं नवा कार्यक्रम द्या ना!" खुदीराम बोससारखे उमलते तरुण क्रांतिकारक आपल्या पुढाऱ्यांपाशीं धरणें धरूं लागले.

तसा सरकारला अधिक सतावून सोडण्याचा नवा कार्यक्रम जाहीर झाला. 'सोनार बंगला' या जळजळीत प्रोत्साहनकारक पत्रकाचें नवें भयंकर अस्त्र क्रांतिकारकांनीं जाहरिपणें सरकारवर फेकलें.

पण सरकार तरी इंग्रजी राजवट उलथून पाडण्याची उघड उघड चिथावणी देणारीं असलीं पत्रकें बरीं फैलावूं देईल !

पुढें मिदनापूरला औद्योगिक आणि शेतकी प्रदर्शन भरलें. अशीं प्रदर्शनें, मेळावे, जत्रा, सभा क्रांतिकारक मायपोटें. प्रदर्शन पाहायला गांवोगांवचे लोक गर्दी करून येऊं लागले. तों त्यांच्यावर 'सोनार बंगला' क्रांतिकारक पत्रकांचा गुलाल उधळला जाऊं लागला.

कोण वांटतात हीं पत्रकें? त्याचा शोध घेत पोलिस प्रदर्शनांत पायपिटी करूं लागले.

तों तो सोळासतरा वर्षांचा एक शिवडी पण तरतरीत नाकाडोळ्यांचा एक तरुण, उघड्या माथ्यावर काळे कुरळे केंस कसे तरी भुरभुरत आहेत, पायांत कांहीं नाहीं, असा; पत्रकें वांटीत सुदर्शनचक्रासारखा जिकडे तिकडे संचारतो आहे.

## २ : आणीबाणीची वेळ

"अरे, हा तर खुदीराम बोस!" एका पोलिसानें त्याला ओळखलें. आणि त्याला घेरण्यासाठीं मदतीला पोलीस बोलावण्याकरितां शिटी फुंकली.

पण पोलिसांचा गराडा पडायच्या अगोदर ती चिमखडी स्वारी त्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार!

तरी देखील पोलिस त्याच्या पाळतीवर होतेच. त्या दिवशीं नाहीं तरी जरा उशिरा, पण त्यांनीं त्याला घेरलेंच.

हा तरुण जातीजातींत द्वेष पसरवितो आणि बादशहांचें सरकार उलथून पाडण्याचे प्रयत्न करतो, अशी तक्रार करून राजद्रोहाचा खटला सरकारनें त्याच्यावर भरला.

पण काय योगायोग? हातांत सांपडलेली मासोळी सुळसुळीत अंगानें निसटून पुन्हां पाण्यांत पडावी तसा खुदीराम सारें करून सवरून पुन्हां त्या खटल्यांतून निर्दोषी सुटला.

असा पिंजऱ्यांतून सिंहाचा छावा मोकळा सुटला. पुन्हां राना-वनांत हिंडून शिकारीचा धडाका सुरू. खुदीराम पुढें आणि त्याच्या मागोमाग त्याचे साथी. चालली वानरसेना लंका जाळीत.

"गुळमुळीत चळवळ चालवून भागायचें नाहीं आतां. सरकारच्या हातीं भयंकर शस्त्रें, आणि आमचीं पाहावीं तर नखेंही वाढलेलीं नाहींत सरकारला ओरबाडायला. आतां यापुढें जशास तसाच सशस्त्र लढा आपणाला सरकारशीं द्यावा लागणार."

असें फक्त खुदीरामच बोलूं लागला होता असें नाहीं. सारेच क्रांतिकारक बोलूं लागले होते.

अशी आग धुमसूं लागली. धुमसतां धुमसतां पेटूं लागली. कॉंग्रेसच्या निःशस्त्रप्रतिकारांनें हें राक्षसी सरकार वठणीवर येणार नाहीं, त्यासाठीं सरकारशीं सशस्त्र, उग्र लढा दिला पाहिजे, हा क्रांतिकारकांचा निर्धार दिवसेंदिवस पक्का होत चालला. दहशतवादी क्रांतिसंघटना अधिक मजबूत व चिरेबंदी होऊं लागली.

सशस्त्र लढा द्यायचा तर आपल्या जवळ शस्त्रें पाहिजेत. पिस्तुलें पाहिजेत. काडतुसें पाहिजेत. बॉंबगोळे पाहिजेत.

हें सारें युद्धसाहित्य मिळवायला पैसे पाहिजेत ना? चला पैसे लुटा. सरकारी टपालाच्या थैल्या लुटा. खजिने लुटा. रयतेला पिळून गबर झालेल्या शेटसावकारांच्या तिजोऱ्या लुटा. देशाचा पैसा, देशाच्या कारणीं लावायचा. तो आपलाच आहे.

असा पैसा मिळूं लागला. त्याबरोबर पिस्तुलें, काडतुसें, बॉंबगोळे असें युद्धसाहित्य गुपचुप कुठें कसें विकत मिळेल याच्या शोधावर ते बहाद्दर निघाले.

देशांतल्या देशांत अशीं शस्त्रास्त्रें मिळणें हत्यारांच्या कायद्यानें फार अवघड,—जवळ जवळ अशक्य करून ठेवलें होतें. पण देश नाहीं तर इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, जर्मनी हे सारे परदेश काय ओस पडले होते?

हत्याचारांचा कायदा इथें भारतांत जुल्मी इंग्रज सरकारच्या राजवटींत. विलायतेंत आणि यूरोपांतील इतर देशांत तशी बंदी थोडीच होती!

यूरोपांत उच्च शिक्षणासाठीं गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांनीं त्या दृष्टीनें तिकडे जाळें विणायला सुरुवात केलीच होती. तसे आणखी जे खात्रीचे विद्यार्थी तिकडे शिकायला म्हणून जाणार, ते देखील अशा तयारींत होतेच.

इकडे फुल्लरची जुल्मी राजवट तर बंगालला दिवसेंदिवस अगदीं असह्य होत होती.

"कांहींही करून ही पिडा नाहींशी केलीच पाहिजे!" आपल्या सहकाऱ्यांच्या एका गुप्त बैठकींत खुदीरामानें आपलें अंतःकरण उघडें केलें. ते दोघे कॉर्नवालिस रस्त्यावरील बाजारांत दूर एका बंद हवेलीच्या अंगणांत बसून एकान्तांत बोलत होते.

"आणि फुल्लरबरोबर हा कलकत्त्याचा मॅजिस्ट्रेट किंग्सफर्डही. हा तर आमच्या चळवळीच्या मुळावरच जन्माला आला आहे." प्रफुल्लचंद्र दांतओंठ चावीत म्हणाला.

खुदीराम त्यावर म्हणाला, "विषवृक्षाच्या फांद्या तोडीत बसण्यापेक्षां वृक्षाच्या मुळावरच घाव घालावा. फुल्लर दडपशाहीचे हुकूम सोडतो, म्हणून हे मॅजिस्ट्रेट त्यांची अंमलबजावणी करतात."

"आपल्या लोकांना हा किंग्जफर्डही हाडवैऱ्यासारखा अगदीं पाण्यांत पाहतो. याची देखील फार दिवस गय करून चालायचें नाहीं. प्रफुलचंद्रानें पुन्हां आपलें उग्र मनोगत बोलून दाखविलें.

अशी चर्चा झाली. पंजाबांतील आणखी अनेक जुलुमशाहांच्या नांवावर तशाच काळ्या फुल्या पडल्या. त्यांच्या मृत्युलेखाचे मसुदे तयार होऊं लागले.

तोंच त्यांना साध्या कपड्यांत जवळपास रेंगाळणाऱ्या एका गुप्त पोलिसाची चाहूल लागली. सरकारी हेरखात्यांतील बरेच गणंग आतां त्या दोघांच्या माहितीचे झाले होते.

त्या माणसाला पाहतांच प्रफुल्लचंद्र तोंडच्या अर्ध्याच वाक्यावर थबकला. मित्राचा हात हातीं घेऊन उठला आणि चालूं लागला.

चालतां चालतां त्यानें विषय बदलला, "बारिसालला जायचें उद्यां?"

"कशाला ती फुकट पायपिटी? तिथें मोठमोठे पुढारी जमणार, आणि दडपशाहींतून पळवाटांचा कापूस पिंजीत बसणार. आपणांला तें रुचायचें नाहीं. बरें, आपण कांहीं सुचवायला जावें, तर मुलें आपण. आपल्या बोलांना ना चव ना चोथा. काय करायचें तिथें जाऊन?"

तरीही अखेर ते दोघे बारिसालला गेलेच. जाऊन पाहतात तों खरेंच. सुरेंद्रबाबूंसारखे मोठमोठे पुढारी आणि जुलूमजबरदस्ती करून चळवळ दडपून टाकायला दंड ठोकून उभें राहिलेलें फुलरचें सरकार यांचा तह होऊन देखील गेला होता!

'वंदेमातरम्' उच्चारायचें नाहीं, आणि पोलिसांनीं उगीच त्रास द्यायचा नाहीं, अशा अर्थाचा तो तह. हें तिथें जातांक्षणीं खुदीरामला कळलें मात्र. आणि तो गरजला, नाहीं. नाहीं. जुलुमशहा सरकारशीं असली तडजोड आम्ही करणार नाहीं. आम्हीं 'वंदेमातरम्' गाणारच."

जें एक म्हणाला, तेंच सारे म्हणाले. "कांहीं झालें तरी 'वंदेमातरम्' आम्ही गाणारच."

लगेच त्या बाहेरच्या पटांगणांत 'वंदेमातरम्' चें सामुदायिक गायन सुरू झालें. त्याचे सूर कानीं पडतांच आजूबाजूला बंदोबस्तासाठीं उभे असलेले हत्यारबंद गुरखे सोजीर आणि पोलिस क्षणभर भांबावून गेले.

'हें काय? पुढाऱ्यांनीं काय कबूल केलें, आणि ते लोक काय करीत आहेत? आणि आतां इथें आपण काय करायचें?' असा पोलिसांना पेंच पडला. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सल्ला घेण्यासाठीं त्यांची धांवपळ सुरू झाली. तों इकडे परिषदेच्या मंडपाकडे जाण्यासाठीं स्वयंसेवक आणि त्यांच्या मागोमाग नागरिक यांची 'हनुमानसेना' लंकेवर स्वारी करायला निघाल्यासारखी 'वंदेमातरम्' गात चालूं लागली देखील.

चोरीला गेलेला माल ब्रह्मार्पण करावा, तसा 'वंदेमातरम्'चा प्रश्न पुन्हां उकरून न काढतां पुढाऱ्यांनीं सर्व मंडळींना आदेश दिला, "अगदीं शांतपणें मिरवणूक चालूं दे. पोलिसांनीं लाठीमार केला, गोळीबार केला, धरपकड केली, तरी स्वयंसेवकांनीं जरादेखील शांतताभंग होऊं देतां कामा नये."

तो आदेश मात्र सर्वांनीं शिरसामान्य केला.

त्यांच्या कसोटीची वेळही दूर नव्हती. समोरून लाठीबंद पोलिस मिरवणुकीला झोडपून पांगविण्याच्या कडेकोट तयारीनें येतांना मंडळींना दिसले. त्यांच्या मागें हत्यारबंद गुरखे सोजीरही होते.

पण त्या कशालाही दाद न देतां मिरवणूक 'वंदेमातरम्' गात परिषदेच्या मंडपाकडे चालली होती.

## ३ : बारिसालपासून पुढें....

मिरवणुकीवर भयंकर लाठीमार झाला. लाठीमारानें झोडपून निघालेले, रक्तबंबाळ झालेले स्वयंसेवक, आणि त्यांच्याबरोबर बारिसालचे शेंकडों, हजारों नागरिकही पोलिसांना दाद न देतां, ज्याला जशी वाट सांपडेल तसे परिषदेच्या मंडपाकडे येऊन थडकूं लागले.

त्या दिवशींचा लाठीमार केवळ राक्षसी होता. पण त्या राक्षसांशीं शांतपणें झुंज देऊन स्वयंसेवक आणि सारे नागरिक त्या राक्षसांना पुरून उरले. ते लवमात्र भ्याले नव्हते. पोलिसांशीं लपंडाव खेळत, सांपडेल त्या आडवाटेनें परिषदेचा मंडप गांठीत होते. ही गनिमी काव्याची लढाई पोलिस आणि लोक यांच्यांत एकसारखी तास दीड तास चालली होती.

ती मिरवणूक चालू झाल्यावर थोड्याच वेळांत लाठीमार करण्यापूर्वीं गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यानें सुरेंद्रबाबूंना अटक केली होती. त्या वार्तेसरसे खुदीरामसह साऱ्या तरुण क्रांतिकारकांना सुरेंद्रबाबू 'तरुण' दिसूं

लागले होते. त्यांच्या अटकेनें सर्व लोकांना सरकारशीं आज आव्हानपूर्वक लढायला अधिक बळ अंगीं संचारलें होतें.

परिषदेच्या मंडपाबाहेर हत्यारबंद गोरे पोलिस अधिकारी कोणाची न कळे पण वाट पाहत उभे होते. पण त्यांना दाद न देतां परिषदेचे नियोजित अध्यक्ष बॅरिस्टर रसूल आणि इतर पुढारी मंडळी आली. ती आंत मंडपांत जाऊन व्यासपीठावर अधिष्टित झाली. परिषद् सुरू झाली. बाहेर सारें वातावरण 'वंदेमातरम्'च्या घोषणांनीं आणि सुरेंद्रबाबूंच्या जयजयकारानें गर्जत होतें.

तेवढ्यांत ते गोरे पोलिस अधिकारी उभे होते त्यांच्या मागच्या बाजूनें एका गल्लींतून जयजयकार ऐकूं आला.

'देशभक्त सुरेंद्रबाबूकी जय!'

खुदीराम बोस आणि प्रफुल्लचंद्र चाकी ह्या दोघां समस्वभावी सहकाऱ्यांपैकींच एक तरुण देशभक्त हेमचंद्रदास याची ती ललकारणी होती. सर्वांच्या अग्रभागीं खुदीराम सुरेंद्रबाबूंचें चौकटींत बसविलेलें मोठें छायाचित्र छातीशीं सामोरें धरून चालत होता.

पण त्या जयजयकाराचे स्वर वातावरणांत विरतात न विरतात, तोंच मोटारींतून सुरेंद्रबाबू परिषदेच्या मंडपापुढें हजर!

आणि त्यांच्याबरोबरच त्यांच्या सुटकेची वार्ताही हजर. सुरेंद्रबाबूंचा खटला तडकाफडकी चालून त्यांना दोनशें रुपये दंड झाला होता, तो दंड भरून बाबूजी सुटले होते.

असे सुरेंद्रनाथ सुटले हें लोकांना कळलें मात्र. आणि तेवते दिवे वाऱ्यानें विझावे तसे एकदम सर्व जयजयकार थांबले. वातावरणांतील उत्साहाचा निर्माल्य झाला. सारें वातावरण एकदम कुंद झालें.

तेवढ्यावरही भागलें नाहीं. सुरेंद्रबाबू आंत सभागृहांत जातात आणि टाळ्यांच्या गजरांत व्यासपीठावर स्थानापन्न होतात, तोंच गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यानें सभाबंदीचा हुकूम आंत जाऊन त्यांच्यावर बजावला.

आणि तो त्यांनीं मान्य करून परिषद् बरखास्त केली ! त्यांना इतर पुढाऱ्यांसह सभागृह सोडून जातांना बाहेरील खुदीरामसारख्या तरुणांचा मेळावा भंगलेल्या आशेनें त्यांच्याकडे पाहूं लागला. तेव्हां ते वयानें म्हातारपणाच्या सरहद्दीवर उभे असले, तरी सर्वांना ते अगदीं 'म्हातारे' दिसूं लागले.

"सरकारपुढें इतकें नमतें घेऊन यांनीं आमच्या बंगालचा असा तेजोभंग करायला नको होता." जो तो आंतल्या आंत कोंडमारा झाल्यासारखा धुसमुसूं लागला.

पुढारी परिषद् बरखास्त करून आणि सर्व मंडळींना शांतपणें घरीं जाण्याचा आदेश देऊन मार्गस्थ झाले.

गर्दी हळूहळू ओसरूं लागली. अर्धेंअधिक सभागृह रिकामें झालें. तरी आंतबाहेर जमलेला तरुणांचा जमाव जागा सोडीना.

"गर्दी मोडा. घरीं चालूं लागा." गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यानें करड्या स्वरांत हुकूम दिला.

पोलिस लाठ्या सरसावीत लोकांवर तुटून पडण्याच्या पवित्र्यांत उभे राहिले. त्यांना माहीतच होतें कीं लोक असल्या दरडावणीला भिणार नाहींत. लाठीमाराचा प्रसंग येणार.

लोकांनाही माहीत होतें. ती षट्कर्णीं झालेली विश्वसनीय बातमी सर्वांना कळून चुकली होती, कीं फुल्लरनें बारिसालला फाळणीचें थडगें बांधण्याचा निर्धार केला आहे.

"लाठीमार, गोळीबार, धरपकड, कांहींही करावें लागलें तरी बेलाशक करा. वेळ पडली तर सारें बारिसाल बेचिराख करा. पण चळवळ नाहींशी करा. तिथें दया, क्षमा, शांति कांहीं नाहीं...." असा फुल्लरचा हुकमी कानमंत्र सरकारी अधिकाऱ्यांना होता.

पुढारी सबुरीनें वागायला तयार झाले होते. पण त्यांचे कर्ते तरुण अनुयायी नमतें घ्यायला मुळींच तयार नव्हते. त्यांनींही दडप-

शाहीचें आव्हान स्वीकारून रणांगण गाजवायची मनाची पक्की तयारी केली होती.

अगदीं आघाडीच्या तरुण मंडळींत खुदीराम बोस, हेमचंद्र दास आणि प्रफुल्लचंद्र चाकी हे तिघे उमलते तरुण उभे राहून 'वंदेमातरम्' गाऊं लागले. सारा जनसमूह त्यांना साथ देऊं लागला. त्यासरसा एकदम निर्दय लाठीहल्ला सुरू झाला.

परंतु लोकांनीं 'वंदेमातरम्'चें गायन थांबविलें नाहीं. लाठीमार अगदीं असह्य आणि सूडबुद्धीनें होऊं लागल्यामुळें मंडळी निरुपायानें पांगली. ज्यांना जिकडे वाट मिळाली तिकडे ते गेले. पण गेले तरी मुखानें 'वंदेमातरम्' चा जयघोष करीत!

पोलिस बंदोबस्तासाठीं धांवपळीची शिकस्त करूं लागले. त्यांच्या मदतीला वाढत्या दडपशाहीच्या जय्यत तयारीनें गुरखे सोजीर धांवून आले. ते तर देवळारावळा–घरांत देखील घुसून पिसाळलेल्या कुत्र्यांसारखें सैतानी तांडव करूं लागले.

लंका पेटूं लागली. रामरावण युद्ध सुरू झालें. अनेक तरुण स्वयंसेवक पकडले गेले. पोलिसांनीं कांहींना धाकदपटशा देऊन, तर कांहींना मारझोड करून दोनचार दिवस कच्च्या कैदेंत ठेवून सोडलें. कांहींना शिक्षाही झाल्या.

तरी पण पोलिसांचा मुख्यतः ज्या त्रिमूर्तीवर आगलावे चळवळ्ये म्हणून डोळा होता, ते कांहीं त्यांच्या हातीं लागले नाहींत. खुदीराम बोस, प्रफुल्लचंद्र चाकी, हेमचंद्र दास.

तिघेही लाठीमारांत जखमी झाले होते. पण जायबंदी मात्र झाले नव्हते. ते जखमांच्या वेदनांना आणि हालअपेष्टांना दाद देणारे नव्हते. लाठी काठी–गोळीचे आघात फुलांसारखे झेलणारे धैर्याचे मूर्तिमंत पुतळे ते!

पुढील मार्ग आक्रमीत तिघेही एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून जातांना निर्धारानें एकमेकांशीं संकल्प करीत होते, "ही फुलरी रावण-

शाही नष्ट झालीच पाहिजे. प्रथम या रावणाचा वध झालाच पाहिजे. त्यानंतर बाकीच्यांचा समाचार."

## ४ : फुलर कसा बचावला?

बारिसालनंतर बरेच दिवस गेले. त्या नंतरची गोष्ट.

"सुरेंद्रबाबूजी आंत आहेत?" त्या दोघां तरुणांनीं बराकपुरांतील सुरेंद्रबाबूंच्या निवासस्थानापाशीं येऊन दरवाजावरील पहारेकऱ्याला विचारलें.

वेळ रात्रींची. बाबूजी सायंकाळपासून पुढारी मंडळींशीं बंगाल-मधील फुल्लरशाही जुलुमामुळें निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करकरून थकलेले. पहारेकरी म्हणाला, "बाबूजी दमले आहेत. आतांच त्यांना भेटायचें आहे तुम्हांला?"

"आतांच त्यांची भेट आम्हांला हवी आहे. आणि आम्हांला रातोरात परत जायचें आहे." त्या दोघांतला एकजण उत्तरला.

"कोण आले आहेत म्हणून सांगूं?"

"खुदीराम बोस आणि प्रफुल्लरचंद्र चाकी."

पहारेकरी आंत जातां जातां तीं नांवें ऐकतांच मनाला आंतून कसली तरी ओढ लागल्यासारखा पुनःपुन्हा मागें वळून पाहत होता.

"तुम्हांला वर बोलावलें आहे." तो थोड्याच वेळांत खालीं येऊन त्या दोघांही तरुणांना 'वंदेमातरम्' म्हणून नमस्कार करीत म्हणाला.

ज्या फुल्लरशाही जुलुमाबाबत सुरेंद्रबाबू इतका वेळ त्या पुढाऱ्यां-पाशीं डोकेंफोड करीत बसले होते, त्याच बाबतींत बोलायला ते दोघे तरुण आले होते.

संग्राम जसा बारिसालला झाला, तसाच मिदनापूरलाही झाला. तेथेंही परिषद् भरली . तिचाही शेवट बारिसालसारखाच झाला. फुल्लर-शाही दडपशाही अगदीं शिगेला पोहोंचली होती.

पण सर्वत्र संग्राम असा एकदां जो सुरू झाला, तो थांबला नाहीं.

बंगालची निःशस्त्र जनता बंगालभर जिकडे तिकडे निःशस्त्र प्रतिकार करीत पुढारी मंडळीनें आंखून दिलेल्या कार्यक्रमानुसार लढत होती. फुल्लरशाही सरकार त्यांना झोडपीत होतें.

त्या दडपशाहीला भीक न घालतां शाळाकॉलेजें ओस पडत होतीं.

शहरोशहरीं, गांवोगांवीं परदेशी कापड आणि परदेशी माल यांच्या होळ्या पेटत होत्या.

परदेशी वस्तूंचीं दुकानें ओस पडत होतीं.

'स्वदेशी'ला अतोनात मागणी वाढत होती. नवीं नवीं दुकानें निघूनही लोकांच्या मागणीला पुरीं पडत नव्हतीं. कारण पुरेसा स्वदेशी माल आपल्या देशांत तयार होण्याची सोयच नव्हती. सरकारनें सर्व बाजूंनीं सत्तेच्या जोरावर देशी उद्योगधंदे आणि व्यापार यांचा कोंडमारा केलेला.

तरी देखील 'स्वदेशी'च्या वाढत्या मागणीबरोबर उत्पादनही शक्य त्या परींनीं वाढीला लागलें होतें. घरोघर माळ्यावर पडलेले चरखे साफसूफ होऊन ओसरीवर, माजघरांत, आणि कांहीं कांहीं शाळांतूनही गरगर फिरूं लागले होते.

चरखे फिरूं लागले. स्वदेशी सूत आरंभीं कांहीं जाड तर कांहीं तलम निघूं लागलें. तसें त्या सुताचें कापड विणून तयार करण्यासाठीं हातमाग चालूं लागले. कापड तयार होऊं लागलें.

नुसते चरखे एकदम सूत कांतून किती कांतणार? हातमागांनाही तें पुरेसें नाहीं. आणि हातमागाचें कापड तरी कोटमाप लोकांना कसें पुरें पडणार? तें निघें तेवढें तर तेव्हांच खपे. पण खरा स्वदेशी कापडाचा पुरवठा देशी गिरण्यांकडून होऊं लागला. देशी गिरण्या भरारल्या. विलायती कापड-व्यापाराला खो बसूं लागला. विलायती कापडाचे बायदे रोडावत चालले.

'कापड घ्यायचें, इतर वस्तु घ्यायच्या, त्या स्वदेशी घ्या. तें अगदींच परवडेंनासें झालें, माल फारच महाग पडूं लागला अथवा मिळेनासाच झाला, तर कापडचोपड जपानचें घ्या. फार तर दुसऱ्या कोणत्याही देशांतलें घ्या. पण विलायती नको. विलायतीवर कडकडीत बहिष्कार.'

असा संग्राम काँग्रेसच्या आदेशाप्रमाणें निःशस्त्र प्रतिकाराच्या आघाडीवरून हिरीरीनें लढला जाऊं लागला.

जसजसे दिवस मागें पडूं लागले, तसतसें हें युद्धक्षेत्र वाढूं लागलें. बंगालबाहेर महाराष्ट्र, पंजाब, आंध्र असे चहूंकडे लढे सुरू झाले. अर्थात् हे सारे निःशस्त्र लढे.

या वेळीं देशाचीं दुःखें वेशीवर टांगणारी आणि तीं दूर करायला झटणारी काँग्रेस. तीही पुढाऱ्यांच्या नेमस्त वृत्तीला झेपेल तितपत चळवळ करणार. ताज्या दमाचे, राष्ट्रीय बाण्याचे असे लाल–बाल–पाल यांसारखे नव्या पिढींतील जहाल वृत्तींचे पुढारी नवी धडाडी–नवें रक्त काँग्रेसमध्यें ओतून तिला अधिक बलवान् आणि लढाऊ करायला आपापल्या परीनें झटत होते. पण जुने नव्यांना वाव देत नव्हते.

१९०६ सालची काँग्रेस कलकत्त्याला झाली. दादाभाई नौरोजी हे भारताचे महान् राष्ट्रीय महर्षि अध्यक्ष होते. त्यांनीं तर व्यासपीठावरून 'स्वराज्य' हें भारताचें म्हणजेच काँग्रेसचें ध्येय घोषित केलें. आणि स्वराज्य-स्वदेशी–राष्ट्रीय शिक्षण–बहिष्कार अशी चारी दिशांनीं भारताचा स्वातंत्र्यसंगर नेटानें चालविणारी चतुःसुत्री सांगितली.

अशी काँग्रेसची चळवळ फोफावत चालली. सरकारला कांहीं केल्या ती आवरेना. फुल्लरच्या डोक्यांत तर बारिसालपासून किडे पडल्यासारखें झालें होतें. पुराणांतील प्रल्हादाच्या नारायणाला ठार करण्यासाठीं हिरण्यकश्यपू जसा संतापानें अगदीं वेडापिसा झाला होता, तशी त्याची गत झाली होती. असा दडपशाहीला मोकाट अवसर मिळाल्यावर

सरकारच्या सोजिरांनीं दोन पायांच्या पशूंसारखा अनन्वित धुमाकूळ घातला नाहीं तरच नवल.

त्याच वेदनांनीं विव्हल होऊन ते दोघे तरुण सुरेंद्रबाबूंना भेटायला आले होते.

* * *

प्रत्यक्ष परिचयानें जरी नाहीं, तरी कीर्तीनें–आणि विशेषतः बारिसालच्या प्रसंगापासून सुरेंद्रबाबू त्या दोघांही तरुणांना ओळखीत होते.

"आम्ही एका पवित्र साहसासाठीं आपली परवानगी मागायला आलों आहों" खुदीराम म्हणाला.

"कोणतें साहस करण्याचें योजिलें आहेस तूं?" सुरेंद्रबाबूंनीं खुदीरामच्या चर्येकडे टक लावून पाहत विचारलें, "ज्ञानेंद्रबाबूंचा शिष्य ना तूं?"

"होय. आम्ही त्यांचेच शिष्य. आम्हीं फुल्लरला या जगांतून नाहींसा करण्याचें योजलें आहे." खुदीराम म्हणाला.

"गुरख्या सोजिरांची मजल आमच्या आयाबहिणींवर हात टाकण्यापावेतों जाऊन पोहोंचली. हें आम्हांला सहन होत नाहीं. फुल्लरचे शंभर अन्याय भरले आहेत. त्याला देहान्त शासन देण्याचा आमचा पक्का निर्धार आहे." त्याचा मित्र म्हणाला.

हे अरविंदबाबूंच्या 'युगांतर' समितीचे स्नातक बोलत आहेत, याची सुरेंद्रबाबूंना जाणीव होती. त्यामुळें त्या तरुणांच्या हेतूविषयीं आणि मनाच्या खंबीरपणाविषयीं त्यांना जरादेखील शंका वाटली नाहीं.

"पण खून पचला नाहीं, सांपडला, तर खुनी माणसाला फांशीची शिक्षा कायद्यानें सांगितलेली आहे. "ते संथ वृत्तीनें त्या दोघांना म्हणाले.

"तें माहीत असतांनाच आम्हीं हें कार्य हातीं घेतलें आहे." खुदीराम चेंडूशीं खेळावें तसा फांशीशीं खेळत म्हणाला.

आतां या मुलांशीं काय बोलावें, यांना ह्या उग्र निर्णयापासून कसें परावृत्त करावें, हेंच सुरेंद्रबाबूंना कळेना. तेवढ्यांत एक वारेबातमी त्यांच्या कानीं आली होती. तिचा उपयोग करून ते म्हणाले, "पण फुल्लर राजीनामा देऊन विलायतेला जायच्या तयारींत आहे असें मीं ऐकलें आहे. राजीनामा त्यानें दिलाही आहे."

"होय?" असें विचारीत प्रफुल्लचंद्रनें शिकार हातची निसटणार अशा जाणिवेनें हिंपुटी होत हळूसा उसासा सोडला.

"तो बोटीवर चढायच्यापूर्वीं त्याला आम्ही ठार करूं." खुदीराम झटकन् उद्गारला.

"पण दुर्दैवानें नेम चुकला तर? मग सगळेंच अंगाशीं येईल कीं! खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तुम्ही तर फांशी जालच. अगदीं हकनाहक. कारण तुमचा हेतु कांहीं तडीला जाणार नाहीं. देशाचा एक वैरी जगावेगळा व्हावा, आणि देशांत त्यानें चालविलेली अमानुष दडपशाही ओसरावी हाच ना तुमचा हेतु?"

कोमेजलेल्या फुलपांखरासारख्या हळू आवाजांत दोघेही उत्तरले, "होय."

"तो तर यांत मुळींच साधणार नाहीं. उलट देशावर नवें दुर्दैव ओढवून आणल्यासारखें होईल यांत. फुल्लर राजीनाम्याचा आपला बेत बदलीलही. आणि सूडबुद्धीनें अधिक भयंकर दडपशाही करूं लागेल. असे केरकचऱ्यावारी आमच्या दोन उज्ज्वल देशभक्तांचे बळी पडावे का? आपण बळी जायचें तें जायचें. आणि लोकांचा छळ करणारा मदोन्मत्त अरेराव आणखी असा माजूं द्यायचा?"

काय असेल तें असो. पण सुरेंद्रबाबूंच्या युक्तिवादानें ते दोघेही तरुण भानावर आले एवढें खरें. तेवढ्या वेळेपुरती तरी परिस्थिति बाबूजींच्या काबूंत होती.

"पटलें तुम्हांला मीं सांगितलें तें?" बाबूजींनी विचारलें.

"फुल्लरपुरतें पटलें." दोघेही एकदम नम्र पण ठाम स्वरांत उत्तरले.

"विश्वास ठेवूं मी तुमच्यावर?"

"ठेवा."

"तसें नको. माझ्या पायांना हात लावून शपथ घ्या." बाबूजींनीं त्या दोन कोंवळ्या कळ्या उगीचच करपून वायां जाऊं नयेत अशा उदात्त हेतूनें त्यांना सांगितलें. हे क्रांतिकारक तरुण आपल्या नेत्यांना दिलेला शब्द प्राणांपलीकडे पाळतात हें त्यांना माहीत होतें.

लगेच त्या दोघां तरुणांनीं स्वतःच्या इच्छेविरुद्ध बाबूजींच्या पायांना स्पर्श करून तो अविचार न करण्याची शपथ घेतली.

"बरें तर, आतां तुम्ही इथें राहूं नका. रातोरात आपल्या गांवची गाडी पकडा."

त्यावर ते कांहीं बोलेनात.

"उतारापुरते पैसे आहेत तुमच्यापाशीं?" बाबूजींनीं पुन्हां मुद्दाम विचारलें.

ते दोघेही तरुण गरिबीला अपवाद नव्हते. खुदीराम तर पैशाची टंचाई म्हणून, अथवा पै पैसा सांठवून शस्त्रास्त्रांची तरतूद करायची म्हणून, नेहमीं अनवाणी चाले आणि जाडाभरडा एक सदरा व एक धोतर वापरी. आज त्या दोघांपाशीं खरोखरच तिकिटाला पैसे नव्हते.

बाबूजींनी तें ओळखलें. वीस रुपये काढून त्यांना दिले. आणि पुन्हां सांगितलें, "शक्य तितक्या लौकर कुणाला चाहूल लागायच्यापूर्वीं बराकपूर सोडून चालते व्हा. आजकाल पोलिस डोळ्यांत तेल घालून आपल्या पाळतीवर असतात. गाफील राहूं नका."

## ५ : परदेशांतून शस्त्रास्त्रांचा पुरवठा !

सुरेंद्रबाबूंचा निरोप घेऊन ते दोघे तरुण बाहेर पडले.

"स्टेशनवर जाल ते अमक्या वाटेनें न जातां तमक्या वाटेनें

जा." असा कानमंत्र त्यांना बाबूजींच्या बंगल्यावरील पहारेकरी तरुणानें हळूच दिला. कां, कसें, अशी अधिक चौकशी न करतां त्यांनीं तो विश्वासानें मानला. त्यांना माहीत होतें कीं विश्वासाला अपात्र असणारा माणूस सुरेंद्रबाबूंसारख्या सरकारच्या डोळ्यांत सलणाऱ्या थोर माणसाच्या पदरीं अशा जबाबदारीच्या नोकरीवर टिकेल तरी कसा?

गाडीला अजून पाऊण तास अवकाश होता. ते दोघेही तरुण जरी फुल्लरची हत्या करण्याच्या निर्धारापासून परावृत्त झाले होते, तरी त्यांच्या अंतरंगांत टोंचणी लागली होती. "आपण बाबूजींना कबूल केलें हें आपलें चुकलें."

"हेमेन् अजून कसा बरें आला नाहीं?" खुदीराम समोरच्या झाडींतून स्टेशनकडे येणाऱ्या वाटेकडे पाहत म्हणाला.

"कीं गुरफटला सरकारी गुप्त हेरांच्या जाळ्यांत?" प्रफुल्लनें मित्राचा हात हातीं घेऊन आपुलकीनें घट्ट दाबीत म्हटलें.

तोंच समोरून झाडींतून एक व्यक्ति येतांना दोघांनींही पाहिली. त्या व्यक्तीच्या चालीवरूनच त्यांनीं अंदाजानें ओळखलें.

त्यांची खात्री जरी होती कीं तोच तो. तरी हडसून खडसून पुन्हां एकवार खात्री करून घेण्यासाठीं खुदीराम समोरच्या व्यक्तीला ऐकूं जाईल एवढ्या पुरेशा मोठ्या आवाजांत उद्गारला, "वंदेमातरम्."

"वंदेमातरम." त्याला प्रतिसाद मिळाला. आतां तर पुरी खात्री पटली कीं तोच तो.

"मिळाली कां परवानगी सुरेंद्रबाबूंची?" हेमचंद्रानें विचारलें.

"नाहीं. चला सांगतों."

जातां जातां अगदीं थोडक्यांत खुदीरामनें सुरेंद्रबाबूंशीं झालेलें संभाषण हेमेन्‌ला सांगितलें.

"बाबूजी म्हणाले तें खरेंच असावें. आपल्या लोकांनीं आणलेली बातमीही तशीच आहे. फुल्लर इतक्यांतच काळें करून विलायतेला

चालता होईल. शिवाय ही अप्रिय जुलमी अधिकाऱ्यांच्या वधाची आघाडी यशस्वीपणें उघडण्याइतकी शस्त्रास्त्रांची आपली तयारीही बळकट नाहीं. " हेमचंद्रदास म्हणाला.

" पण ती तयारी आपली व्हायची तरी केव्हां रे ? "

" होईल. लौकरच होईल. त्याच वाटेवर आपण आहों. परदेशांतून आतां लौकरच आपणाला पिस्तुलांचा पुरवठा होऊं लागेल. "

" नुसत्या पिस्तुलांनीं भागायचें नाहीं हेमेन ! "

" बाँबगोळेही आपल्या हातीं लागतील. "

" पण अशा उसन्या शिदोरीनें आपलें कसें भागणार रे हेमेन ? "

" जरा धीर धर. मी आतां विलायतेला चाललों आहें "

" होय ? ठरलें ? "

" ठरलें. शिदोरी रांधण्याची किमया आयर्लंड, रशिया, जर्मनी, जिथें सांपडेल तिथून आपण मिळवूं. त्याखेरीज रिकाम्या हातांनीं मी माघारा यायचा नाहीं. "

तोंच मध्येंच खुदीरामनें विचारलें, " किती वाजले ? "

प्रफुल्ल मनगटावरील घड्याळ बॅटरीच्या उजेडांत पाहून म्हणाला, " अरे, गाडी यायची वेळ झाली कीं ! "

आपसांत उगीच कुणाला, कोण, कुठें, काय, केव्हां असें विचारायचें नाहीं, असा क्रांतिकारकांचा सार्वत्रिक संकेत. कोणीं कोणाला कांहीं अधिक विचारलें नाहीं. तेवढ्यांत त्याच वाटेनें स्टेशनकडे कोणी माणसें चालल्याची चाहूल त्यांना लागली. त्यासरसा त्यांनीं एकमेकांच 'वंदेमातरम्'पूर्वक निरोप घेतला.

हेमचंद्र आपल्या वाटेनें गेला. ते दोघे स्टेशनवर चालले.

## ६ : बाँबगोळे उडूं लागले !

बारिसालच्या परिषदेला एक वर्ष लोटलें. दरम्यान त्या सालचें

काँग्रेसचें बाविसावें अधिवेशन दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्याला मतभेद कसेबसे दडपून साजरें झालें. आणि आतां सन १९०७ चें तेविसावें अधिवेशन गेल्या तीन दिवसांपासून सुरतेला गाजत होतें. मतभेदाची मजल मिटण्याच्या पलीकडे गेली होती.

तीन दिवस विषयनियामक समितींत शाब्दिक डोकेंफोड चालली होती, ती संपली नव्हती. तशा प्रक्षुब्ध वातावरणांतच आज दुपारीं तिकडे काँग्रेसच्या मंडपांत खुलें अधिवेशन सुरू होत होतें.

तेव्हांच इकडे बंगाली प्रतिनिधींच्या निवासस्थानीं काँग्रेसच्या आणि देशाच्या एकंदर भवितव्याची गंभीर चर्चा प्रांतोप्रांतींच्या तरुण क्रांतिकारकांत सुरू होती. त्या चंडोलांना काँग्रेस पिंजऱ्यासारखी वाटूं लागली होती. त्या पिंजऱ्यांत पंख मोडून कोंडून बसायला क्रांतिकारकांची बिलकुल तयारी नव्हती.

बारिसालहून आपल्या क्रांतिकारक सहकारी तरुणांचा निरोप घेऊन शस्त्रास्त्रसंपादनासाठीं देवदानवांच्या युद्धांतील देवांच्या कचासारखा विलायतेंत गेलेला हेमचंद्रदास तीनचार महिन्यांपूर्वींच भारतांत माघारा आला होता.

तोंवर तरी बाँबगोळे आणि पिस्तुलें अवतरलीं नव्हतीं. अवतरण्याचीं लक्षणें मात्र थोडींथोडीं दिसूं लागलीं होतीं. विलायतेंतील वृत्तपत्रांतून तशी ओरडही सुरू होती कीं विलायतेंतील हिंदी विद्यार्थ्यांचे असले कांहीं तरी चाळे सुरू आहेत.

हेमचंद्रदास त्या क्रांतिकारक तरुणांशीं सल्लामसलती करून बाँबगोळ्यांच्या किमयेसह भरल्या मुठीनें भारतांत आला. चोरांच्या पावलांनीं ती किमया पुण्यांत लोकमान्य टिळकांपावेतों जाऊन पोहोंचली.

बंगालमध्यें तसे महाराष्ट्रांत बाँबगोळ्यांचे छुपे कारखाने निघण्याचा मार्ग मोकळा झाला. आणि थोड्याच दिवसांत सन १९०७ च्या आक्टोबर महिन्यांत भारतांत तयार झालेला पहिला बाँब उडाला. नेम साधला!

नाहीं. यश आलें नाहीं. 'पहिलें दान देवाला' म्हणण्याची पाळी आली. पण बाँब फेकला तर गेला!

बंगालच्या गव्हर्नरची गाडी उडवून देण्याचा तो प्रयत्न होता. तो फसला. तसाच थोड्या दिवसांनीं दुसरा सुधारलेला प्रयत्न झाला. तोही फसला.

पण हे आरंभींचे दोन प्रयत्न फसले, म्हणून बंगालचे क्रांतिकारक हताश होऊन स्वस्थ बसले नाहींत. आणखी थोडे दिवस गेले. आणि त्यांनीं पुन्हा अधिक सुधारलेला प्रयत्न करून पाहिला. या वेळीं संक्रांत पूर्व बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरवर आली होती. ती ३ डिसेंबरची गोष्ट.

तोही प्रयत्न नीट साधला नाहीं. बाँबच्या हादऱ्यानें रुळावरून आगगाडी खालीं पडली; बाँब पडला त्या जागीं पांच फूट रुंद आणि तितकाच खोल खड्डाही पडला. परंतु ले. गव्हर्नरच्या आयुष्याची दोरी खबरदार. तो बचावला.

बाँबगोळा भारतांतील क्रांतिकारकांना नवीन होता. पण पिस्तुलें कांहीं नवीन नव्हतीं. डाक्क्याचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट ॲलन पिस्तुलाची गोळी लागून मरतां मरतां वांचला. प्राणावर आलें होतें; पण पाठीवरील जखमेवर निभावलें. याचें कारण नेम धरणारा क्रांतिकारक सराईत निशाणबाज नव्हता.

अशा दहशतवादी सशस्त्र हल्ल्यांतील स्फोटांच्या धुरानें देशांतील राजकीय वातावरण कुंद झालें होतें. अशा वातावरणांत १९०७ मध्यें काँग्रेसचें अधिवेशन सुरतेला सुरू होतें.

लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल यांचा क्रांतिकारक राष्ट्रीय बाणा मेथा–गोखले–सुरेंद्रबाबू अशा नेमस्त प्रकृतीच्या अधिकारारूढ काँग्रेसपुढाऱ्यांना जिथें पचनीं पाडतां येत नव्हता, तिथें ते या राष्ट्रीय पुढाऱ्यांनाही आवरतां आवरतां पुरे पुरे करून सोडणाऱ्या क्रांतिकारक तरुण भारताला थोडेच आवरूं शकणार होते!

[library stamp]


त्या तरुण क्रांतिकारकांच्या मित्रमेळाव्यांत जो उठला तो काँग्रेसच्या गुळमुळीत क्रियाहीन मवाळ धोरणाचे वाभाडे काढून बोलत होता. त्यांतल्या त्यांत नरेंद्र गोस्वामीचे बोल म्हणजे तर धगधगते निखारे. तो जणूं काँग्रेसचें पोट फाडून तिचा कोथळाच बाहेर काढूं पाहायचा.

"जा! बसा तुम्ही पुन:पुन्हा तेंच तेंच रवंथ करीत. मी असला बोलका शंख व्हायला तयार नाहीं. आतां अरविंदबाबू मंडपांतून माघारे आले कीं त्यांना आपण स्पष्ट सांगूं,—काँग्रेसचा बागुलबोवा आतां दाखवूं नका आम्हांला. आम्ही आतां त्या नवसाला न पावणाऱ्या भंगलेल्या देवाला आणखी किती दिवस भजत बसायचें?" नरेंद्र आवेशानें दांत-ओंठ खात बोलत होता.

"प्रत्यक्ष कार्य करण्याची वेळ आतां लौकरच येईल, तेव्हां योग्य वापर करण्यासाठीं तुझा थोडा तरी आवेश शिल्लक राहूं दे ना नरेंद्र! नाहीं तर सारे म्हणायचे कीं, उथळ पाण्याला खळखळ फार."

प्रफुल्लचंद्र चाकी अर्थपूर्ण नजरेनें खुदीरामकडे पाहत म्हणाला. खुदीरामलाही तें पटलें.

५००७२ अं २५०

"ठीक आहे तर. पाणी उथळ आहे कीं खोल आहे तें सांगत कशाला बसूं मी? दाखवूनच देईन तुम्हांला." असें रागारागानें तणतणत, नरेंद्र मदानांत दूर बाजूला जाऊन थोडा वेळ एकटाच विचार करीत बसला. तेथून तो मंडपाकडे केव्हां गेला इकडे कोणाचेंही लक्ष नव्हतें.

मंडळींत काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर खारटतुरट चर्चा चालू होती. तोंच हातघाईची लढाई लढून आल्यासारखा नरेंद्र तावातावानें झपझप पावलें टाकीत सर्वांपुढें येऊन सांगूं लागला, "अरे, काँग्रेस मोडली. पुढाऱ्या-पुढाऱ्यांत भांडाभांडी झाली, मारामारी झाली, जोडेफेकी झाली, आणि अखेर काँग्रेस मोडली. आतां आपणांला आपल्या पंथानें जायला एक-परीनें मार्ग मोकळा झाला."

"शेवटीं या थराला गोष्टी आल्या अं?" जो तो विस्मयचकित मुद्रेनें एकमेकांकडे पाहत विचारूं लागला.

"आल्या खऱ्या." नरेंद्र उत्तरला.

"लोकमान्य कुठें आहेत? ते सुरक्षित आहेत ना?" लगेच खुदीरामनें विचारलें.

"लोकमान्य सुरक्षित आहेत. त्यांना अध्यक्षांच्या सूचनेवर बोलूं दिलें नाहीं, मेथा–गोखले–सुरेंद्रबाबू आणि मंडळींचे बगलबच्चे त्यांच्या अंगावर धांवून गेले, म्हणून तर प्रकरण क्षणांत एवढें हातघाईवर आलें. बाचाबाची होऊन काठी, खुर्ची, जें ज्याच्या हाताला सांपडलें तें त्यानें फेकून मारलें. एकानें तर जोडा फेकून मारला."

तेवढ्यांत एक महाराष्ट्रीय तरुण,–अंगावरचे कपडे चुरगळून अव्यवस्थित झाले आहेत, थोडासा मारही बसला आहे असा,–परंतु विजयी मुद्रेनें उचंबळल्या मनोवृत्तीनें मंडपांतून पुढें येऊन छातीवर हात मारून अभिमानानें सांगूं लागला, "मीं–मीं जोडा फेंकून मारला."

"तो मेथा आणि सुरेंद्रबाबू यांच्याशीं हस्तांदोलन करून टेबलावर पडला." नरेंद्र भुंवया चढवून पाहत म्हणाला. सुरेंद्रबाबू बंगाली तरुणांचा उत्साहभंग करणारे म्हणून त्याचा त्यांच्यावर फार राग होता.

"चला, जाऊन पाहून तर येऊं!" असें म्हणत बहुतेक सारेजण मंडपाकडे जायला निघाले.

"आतां काय पाहणार जाऊन तिथें! पोलिसांनीं सारी गर्दी मोडून मंडप रिकामा करून ताब्यांत घेतला आहे." नरेंद्र म्हणाला.

"तरी पण जाऊन पाहूं तरी!" असें म्हणून बरेचजण तिकडे निघालेच.

जाऊन पाहतात तों मंडप अगदीं रिकामा झाला होता. तिथें पोलिसांचा पहारा होता. बाहेरच्या मैदानांत बरीच मंडळी गटागटांनीं तावातावानें तीच चर्चा करीत होती.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## ७ : बळी पडले.....पण कोण ?

"प्रिय निर्मल !

फार दिवसांत तूं भेटला नाहींस. सुरतेला कॉंग्रेसच्या वेळीं आपण सारे एकत्र भेटलों, तीच आपली अखेरची भेट. तीच आपली अखेरची भेट ठरावी असा योगायोग तर नाहीं ना? तूं कोणतें तरी भयंकर दिव्य करण्याच्या तयारींत गुंतला असशील. कीं माझ्यासारखाच--कांहीं आदेश मिळत नाहीं, कांहीं करतां येत नाहीं, आणि मनांतली तळमळ तर अगदीं असह्य होते आहे, अशी तुझ्याही जिवाची कुतरओढ चालली आहे?...."

खुदीरामनें त्या दिवशीं आपल्या सोबत्याला तें पत्र लिहायला घेतलें खरें. पण तो लिहितां लिहितां वाक्यावाक्यागणिक थांबत होता. आणि विचार करून लिहीत होता.

पत्र लिहितां लिहितां तो पुन्हा थांबला. आणि लेखणीचें टोंक हनुवटीला टेकून विचार करूं लागला. सरकारच्या वाढत्या दडपशाहीनें, आणि तिचीं तरुण रक्ताला उकळी आणणारीं रोमांचकारीं वर्णनें अरविंद बाबूंच्या 'युगांतर' पत्रांत वाचून आजकाल त्याचें डोकें अगदीं भणाणून गेलें होतें.

"कोठवर सहन करावा या किंग्जफर्ड सैतानाचा जुलूम आम्हीं? आमच्या सहकाऱ्यांना बेगुमानपणें भयंकर शिक्षा ठोठावणारा हा कलकत्त्याचा चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट—हा इंग्रज सरकारचा जुलमी हात मुळासकट छाटून टाकला पाहिजे."

असें स्वतःशीं उद्गारत तो जणूं किंग्जफर्डवर तरवारीचा वार केल्यासारखी हातांतली लेखणी झटकतो, तोंच त्याला पाठीमागून हांक ऐकूं आली, "खुदीराम!"

"कोण? प्रफुल्ल?" ती हांक ऐकून खुदीराम तसाच आतुरतेनें मागें वळून पाहत खुर्चीवरून उठला. आणि आपल्या जिवलग मित्राला

सामोरा जाऊन कडकडून मिठी मारीत म्हणाला, "तुला शंभर वर्षे आयुष्य आहे."

"चल—बाहेर चल. आजवर आपणाला कधींही ऐकायला न मिळालेली आनंदाची गोष्ट तुला सांगायला आलों आहें मी. जन्मभूमी-साठीं बलिदान करणारे हुतात्मे शोभण्याइतकें आपलें दोघांचेंही भाग्य उदयाला आलें आहे."

"खरें? खरें सांगतोस हें?" खुदीरामनें प्रफुल्लचा हात आपल्या हातीं घट्ट धरून हृदयाशीं कुरवाळीत बाहेर जातां जातां विचारलें.

"अगदीं खरें." प्रफुल्ल उत्तरला. आणि सांगूं लागला.

"एकूण बंगालचा शत्रु नंबर एक म्हणून क्रांतिकारकांना आपला पहिला बळी देण्याचा मान किंग्जफर्डला मिळणार तर!" खुदीराम तें ऐकून म्हणाला. या कार्यासाठीं आपल्या 'युगांतर' समितीनें आपणां दोघांची निवड करावी, हा त्याला आपला थोर गौरवसा वाटला.

लगेच ते दोघे किंग्जफर्डला केव्हां जाऊन कसा ठार करावा ह्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याच्या उद्योगाला लागले देखील. तारीख २३ एप्रिल रोजीं ते दोघेही हौरा स्टेशनवर गाडींत बसून मुजफरपूरला जायला निघाले.

"नीट लक्षांत ठेव. प्रफुल्लचंद्र चाकी तुझा कोणी नव्हे. तो कोण तो तुला माहीत देखील नाहीं. तुझ्याबरोबर किंग्जफर्डचा खून करायला निघाला आहे हा दिनेशचंद्र रॉय. किंग्जफर्डला ठार केल्यावर जरूर तर आपण दोघांनींही मरून जायचें. कांहीं केल्या पोलिसांच्या स्वाधीन व्हायचें नाहीं." प्रफुल्ल पुन्हा म्हणाला.

"कबूल. पुढची सारी तयारी आहे ना पण?" खुदीरामनें विचारलें.

"सारी तयारी आहे." असें म्हणून प्रफुल्लनें—नव्हे, दिनेशचंद्र रॉयनें आपल्या जवळची लहानशी कपड्यांची कातडी बॅग त्याला नुसत्या नजरेनें उल्लेखून दाखविली.

...र ... सार्व.



त्या बॅगेंत त्यानें खुदीरामसाठीं एक पत्र्याच्या डब्यांत ठेवलेला प्रखर बॉंब आणि काडतुसें भरलेलें पिस्तुल घेतलें होतें. स्वतःसाठींही तसेंच एक पिस्तुल घेतलें होतें. त्याखेरीज आणखी तीस काडतुसेंही बरोबर होतीं.

*   *   *

"अरे खुदीराम! दिवस मावळायला निघाला. आतां आपलें उजाडणार आज. तयारी आहे ना तुझी?"

"माझी तयारी किती दिवसांपासूनची आहे. कांहीं मनाजोगें न करतां मेलेलें जिणें जगत बसणें मला आवडत नाहीं."

ते दोघे मुजफरपुरांत ज्या धर्मशाळेंत आज सहा दिवस मुक्काम करून होते, तिथें आसपास कोणी पाहत अथवा ऐकत नाहीं अशी अवलोकनपूर्वक खात्री करून घेत प्रफुल्लनें–नव्हे–दिनेशचंद्र रॉयनें बॅगेंतील तो जस्ती डबा काढला; त्यांतला चार इंच परिघाचा वाटोळा टिनबॉंब बाहेर काढून एकवार व्यवस्थित आहेसा नीट हाताळून पाहिला. आणि तो खुदीरामच्या स्वाधीन करीत म्हटलें, "तर मग ही घे तुझी वस्तु. तसेंच हें घे–हें पिस्तुल गरज पडली तर तुला. आणि हें मला." असें म्हणून त्यानें एक भरलेलें पिस्तुल त्याच्या स्वाधीन केलें; आणि दुसरें स्वतःपाशीं ठेवलें.

दिवस मावळला. रात्र पडूं लागली. त्या काळोखाचा फायदा घेऊन ते दोघेही किंग्जफर्डच्या बंगल्यापाशीं रस्त्यावर असलेल्या मोठ्या वडाच्या झाडाखालीं आडोशाला जाऊन उभे राहिले.

"आतां तो क्लबांतून आपल्या गाडींतून येईल. खाणाखुणा नीट पाहून ठेवल्या आहेस ना?" रॉयनें मित्राला विचारलें, "चौचाकी गाडी आहे. गाडीच्या घोड्याचा रंग तांबूस आहे. आतां याच रस्त्यावरून यूरोपियन क्लबांतून तो आपल्या गाडींतून येईल...."

अशी इकडे गुणगुण चालली आहे, तेवढ्यांत क्लबाकडून चौचाकी निघालेली दिसली. क्लबाच्या प्रवेशद्वारावरील दिव्याच्या प्रकाशांत चौचाकीच्या घोड्याचा तांबुस रंगही ओळखीचा दिसला. ते दोघे आपलीं आयुधें सरसावून काळोखांत पुढें सरले. नीट पवित्रा मांडून बंगल्यासमोर रस्त्याच्या अलीकडील बाजूला उभे राहिले. खुदीरामनें पायांतील जोडे अडचण नको म्हणून बाजूला फेकले.

चौचाकी आटोक्यांत आली असें पाहतांच त्यानें ती थांबण्याची वाट न पाहतां आपणाजवळचा बॉंब दोन्ही हातांनीं नेम धरून फेकला.

तो बॉंब चौचाकीवर आदळला मात्र. आणि स्फोट होऊन कान-ठळ्या बसविणारा भयंकर आवाज सभोंवारच्या वातावरणांत घुमला.

पुढें काय होतें तें पाहत पकडून घ्यायला ते दोघे तिथें कशाला थांबतील! ते काळोखाच्या बुरख्याआडून समष्टिपूर रेल्वे जंक्शनकडे पळत चालले. खुदीराम तर अनवाणीच पळत होता.

रेल्वे जंक्शन म्हटलें कीं चवाठा तो. अनेक दिशांना अनेक गाडी-रस्ते गेलेले. बेमालूम बेपत्ता होण्याला असें ठिकाण फार सोईचें. म्हणून त्या दोघांनींही रातोरात काळोखांतून तें बत्तीस मैल अंतर दौडत जाण्याचें योजिलें होतें.

पळतां पळतां त्यांना मागें उडालेला हाहाकार गोंगाटल्यासारखा ऐकूं येत होता. बॉंबनें बळी घेण्याचें आपलें कार्य केलें, या समाधानानें पोलिसांना—सर्वांनाच झुंकाडी देऊन पळून जाण्याला नवा हुरूप त्यांना आला होता.

ते दोघे अर्धी हांकभर अंतर देखील पळून गेले नसतील. तोंच पहिल्या चौचाकीमागोमाग किंग्जफर्डची चौचाकी गाडी आली. त्यांना तें माहीत नव्हतें. किंग्जफर्ड येऊन पाहतो तों केनेडी मायलेकी रक्तबंबाळ स्थितींत आयुष्याचे शेवटचे क्षण मोजीत मोडक्या चौचाकींत तडफडतांना त्याला आढळल्या!

किंग्जफर्डनें एकंदर प्रकार ओळखला. 'बॉंबफेक्या मारेकऱ्यांचा फेरा आला, तो त्या दोन अबलांचा बळी घेण्यासाठीं आला नसून आपलाच बळी घेण्यासाठीं आला होता; केवळ आपल्या आयुष्याची दोरी खबरदार, म्हणून आपल्या जिवावरचें हें संकट प्रभूच्या कृपेनें टळलें.'

आपल्या व आपणांसारख्या इतर गोऱ्या अधिकाऱ्यांच्या खुनाचे भयानक विचार गुंफून क्रांतिकारक कशीं कटकारस्थानें रचीत होते, याच्या बातम्या तो गुप्त पोलिसखात्याकडून वारंवार ऐकतच होता. पण त्यांना दृश्यफल इतक्या लौकर येईल अशी कल्पना त्याला नव्हती.

**स्वाध्याय**

१ फाळणीचा पहिला दिवस बंगालनें कसा साजरा केला ?
२ चळवळीचें रान पेटविण्यांत तरुण बंगाल खुदीराम बोस आणि प्रफुल्लचंद्र या दोघां तरुणांच्या रूपानें कोणत्या प्रकारें सामील होता ?
३ दहशतवादी संघटना कशी चिरेबंदी बनूं लागली ?
४ किंग्जफर्डवर तरुण बंगालचा एवढा डोळा कां होता ?
५ 'वंदेमातरम्' ला फाळणीच्या चळवळींत एवढें महत्त्व चढण्याचें काय कारण ?
६ बारिसालला सुरेंद्रबाबू तरुण बंगालच्या मनांतून कां व कसे उतरले?
७ फुल्लरच्या खुनाचा बेत त्या दोघां तरुणांनीं कां बदलला ?
८ सुरतेचें कॉंग्रेस–अधिवेशन कां मोडलें ?
९ निर्मलचंद्राला खुदीराम कोणतें पत्र कां लिहीत होता ?
१० 'युगांतर' समितीनें किंग्जफर्डच्या शासनाचा बेत कसा रचिला ?
११ किंग्जफर्ड कसा बचावला ?

## प्रकरण चौथें

# क्रांतिवीरांचीं पाताळयंत्रें

### १ : खुदीराम पकडला गेला

ओसरत्या पहांटेच्या कोंबड्याच्या आरवण्यानें जागा होऊन सभों-वार आकाशाकडे नजर टाकीत दिनेशचंद्र आपल्या मित्राला हातानें हलवून जाग आणूं लागला.

मुजफरपुरपासून वैनीपावेतों चा चौतीस मैलांचा टापू त्या दोघांनीं रात्रीं एका दमांत ओलांडला. वैनीला आले, तों पहांट देखील झाली नव्हती. इतक्या लौकर समष्टिपुरला जाऊन काय करायचें ? हौरा स्टेशनाकडे जाणारी गाडी सूर्योदयानंतर येणार. म्हणून ते तिथेंच आंब-राईच्या सावलीला भुईवरच खुशाल दोघेही गाढ झोंपी गेले.

" अजून तरी आपण खुशाल आहों. आतां काय होतें पाहावें." खुदीराम उठून बसतां बसतां मित्राला म्हणाला.

" काय होणार आणखी ? आपण पकडले गेलों, तर फांसावर लटकणार. मोकळे राहिलों, तर असेच शेवटपावेतों लढत राहणार. आतां विलायतेंतून पिस्तुलांची आवक इकडे कुणा ना कुणामार्फत सतत सुरू राह्यला अडचण पडणार नाहीं. आणि बॉंबगोळे तर काय घरचेच आहेत. ती किमया आपल्या मंडळीला आतां चांगलीच साधली आहे. आतां प्रश्न आपला अथवा आपल्या बंगालचा नाहीं. "

" तर प्रश्न कुणाचा आहे ? "

" महाराष्ट्रांतले तरुण क्रांतिकारक सुरतेंत छातीला हात लावून बोलत होते त्याप्रमाणें बंगालच्या हांकेला ओ देतील का ? जसा इकडे आरंभीं आम्हीं उठाव केला, तसाच महाराष्ट्रांत देखील तो एकसाथ जर होऊं

लागेल, तर देशभर खांडववन हां हां म्हणतां पेटेल. मग गोऱ्यांना भारतांत राहणें देखील मुष्किलीचें होईल." प्रफुल्लचंद्र म्हणाला.

" खरें, पण प्रफुल्ल ?– चुकलों, दिनेश ! परवां गोसाव्यापाशीं तूं आपल्या बेतापैकीं कांहीं बोल्लास का ? "

" कां ? " नरेंद्र गोस्वामीला खुदीरामनें एकदम 'गोसावी' बनवून सोडलेलें ऐकून ओंठांतल्या ओंठांत स्वतःशीं हंसत दिनेशचंद्र म्हणाला.

" तो फार फुटक्या तोंडाचा आणि ठिसूळ मनाचा माणूस आहे. कुठें काय बोलेल याचा नेम नाहीं. "

" भेकड आहे जरा. भेकड माणसांना आपण मोठे शूर वीर कर्तबगार आहों असें उगीचच दाखवायची संवय असते. "

" खरें म्हणजे अशा मनदुबळ्या लोकांना समितींत थाराच देतां कामा नये. चार पावलें दूर ठेवलें पाहिजे त्यांना. "

" मी कांहीं बोललों नाहीं. पण माझी कल्पना आहे कीं नरेंद्र गोस्वामीला आपल्या समितीच्या हालचाली माहीत असाव्या. आपण हीं दोन रिव्हॉल्व्हरें कॉर्नवॉलिस रस्त्यावर अमूल्यरत्न दासकडून विकत घेतलीं, ही बातमी त्याला कशी कळली नकळे. "

बोलतां बोलतां दोघांचेही शौचमुखमार्जनादि प्रातर्विधि चालू होते. जवळच एक विहीर होती. विहिरीवर पोहराही होता. दोघांनींही विहिरीवर जाऊन तोंड धुतलें. एवढ्या वेळांत दिशा चांगल्याच फांकल्या होत्या. उजाडूं लागलें होतें.

" अगोदर जाऊन दुकानांतून कांहींतरी खायला आण बाबा ! भूक फार लागली आहे मला. थोडें कांहीं खाऊं आणि आपल्या वाटेला लागूं." दिनेश आपल्या मित्राला म्हणाला.

खुदीराम तसाच निघाला. त्याला तेव्हां काय कल्पना कीं तिथें त्या दुकानाजवळच्या पोलिसचौकींत आपल्या वासावर आलेला वाघोबा

पोलिस अधिकारी नंदलाल बानर्जी आपणांला खायला टपून बसला आहे म्हणून !

तो गुप्त पोलिस अधिकारी नंदलाल याला खुदीराम माहीत होता. त्यानें त्याला पाहतांक्षणीं ओळखलें व हत्यारबंद लवाजम्यानिशीं चटकन् पुढें जाऊन त्याला घेरून सांगितलें, "खुदीराम! तुला मी अटक केली आहे."

" अच्छा. चला तर. " खुदीराम शांतपणानें, हंसतमुखानें उद्गारला. आणि पोलिसांच्या गराड्यांत चौकीवर चालला. त्यानें ओळखलें, कीं ह्या जगाला आपण आतां जन्माचे अंतरलों.

"तुला कां अटक केली आहे हें माहीत आहेच." नंदलाल बानर्जी थोड्याच वेळांत मुजफरपूरकडे जाणारी गाडी आरोपींसह गांठण्याच्या तयारींत असतांना म्हणाला.

" मला नाहीं माहीत. तुम्हीं कां पकडलें मला ? " खुदीरामनें हंसत हंसत मुद्दाम विचारलें.

तेवढ्यांत त्याला पोलिस चौकीवर चिकटवलेला कलेक्टर वुडमन याच्या सहीचा सरकारी जाहीरनामा वाचायला मिळाला.

> ' तारीख ३० एप्रिल सन १९०८ रोजीं रात्रौ मुजफरपुर येथून श्रीमती केनेडी आणि कुमारी केनेडी यांचा वध करणारा खुदीराम बोस आणि त्याचा साथीदार याला पकडून देणाराला ५००० रुपये रोख बक्षीस मिळतील.'

तें वाचतांक्षणीं मात्र त्यानें दुःखाचा दीर्घ उसासा सोडला.

तें दुःख फांसावर चढण्याच्या भीतीचें नव्हतें. खरा गुन्हेगार, आपण हेरलेला खरा बळी शिरसलामत बचावला, आणि दोन निरपराधी अबलांच्या वधाचें पाप हकनाहक आपल्या माथीं बसलें, याबद्दलचें तें दुःख होतें. पण आतां त्याला काय इलाज होता ?

आतां एकच—फक्त एकच हुरहुर—तीही अंगावर पाल पडावी आणि पळून जावी तशी त्याच्या मनांत डांचत होती, " प्रफुल्लची काय

गत झाली असेल? तो मी खायला केव्हां घेऊन येतों याची वाट पाहत बसला असेल का? कीं मी पकडलों गेल्याची बातमी त्याला कळली असेल?....पोलिसांना त्याचा सुगावा लागला असेल का? त्यांनीं त्याला घेरलें असेल? कीं तो अगोदरच गुंगारा देऊन पसार झाला असेल?.... "

थोड्या वेळानें तो हातापायांत लोखंडी बेड्या अडकविलेला कैदी खुदीराम पोलिस चौकीवरून बंद गाडींतून स्टेशनवर जाऊन पोहोंचला. तोंच गाडी आली. तसा पोलिसांच्या कडेकोट पाहऱ्यांत तो गाडींत चढला. आणि पुढील स्टेशनवर तशाच पोलिस पहाऱ्यांत झांकून आणण्यांत आलेलें एक प्रेतही त्याच गाडींत चढविण्यांत आलें. गाडी चालू झाली.

खुदीरामच्या छातींत तें पाहून धस्स झालें. वैऱ्याच्याही मनांत येऊं नये ती अमंगळ शंका एकदम त्याच्या मनांत आली, " कुणाचें हें प्रेत? माझ्या मित्राचें का?"

हुश्श करून पोलिस गाडींत बसले. आणि गाडी सुटली.

हायसे पोलिस त्या प्रेतावर पहारा करतांना आपसांत बोलत होते. त्यावरून खुदीरामची ती अमंगळ शंकाच खरी ठरली. त्यानें ओळखलें. तोच तो.

" कांहीं हरकत नाहीं. बळी गेला तरी बहाद्दरासारखा पोलिसांशीं लढून एका तरी पोलिसाला अर्धमेला करून लोळवून स्वतः स्वतःवर गोळी झाडून बळी गेला. मोकळा राहिला असता, तर तो किंग्जफर्डचा आज ना उद्यां नक्की बळी घ्यायला चुकला नसता. "

गाडी चालू झाली. ती मुजफरपूरला जाऊन पोहोंचेपावेतों गाडींत त्या बहाद्दराच्या डोक्यांत तेच विचार एकसारखे घोळत होते. गाडी धांवत होती, तिच्याहूनही वेगानें ते विचार भरधाव दौडत अनेक रहस्यांशीं मुकाबला करीत चालले होते.

" .... किंग्जफर्ड ठार झाला नाहीं, तरी क्रांतियुद्धाला यशस्वी मुहूर्त करून दिल्याच्या श्रेयाचे धनी तरी आम्ही आहों ना ? ह्या युद्धांत धारातीर्थी बळी पडण्याचा अग्रमान आमचा आहे .... आम्ही बळी पडलों, तरी आमचे सहकारी आहेत. आमच्या आत्मयज्ञानें सारा बंगाल पेटेल, महाराष्ट्र पेटेल, सारा देश पेटेल. आम्ही बळी पडलों तरी आमच्या रक्ताच्या थेंबाथेंबागणिक हुतात्मे क्रांतिकारक देशाच्या कोना-कोंपऱ्यांतून खळबळून उठतील. जिकडेतिकडे आग लावून देतील. सत्ता-वनी क्रांतीच्या सवाई आंदोलन साऱ्या देशभर होईल. भारतांतील जुलमी इंग्रजी राजवट क्रांतीच्या धगधगत्या आगींत जळून खाक होईल. हिण तेवढें जळून जाईल. आणि माझा स्वतंत्र भारत शंभर नंबरी रसरशीत सुवर्णाच्या राशीसारखा त्या क्रांतियज्ञाच्या वेदींतून नवा अवतार घेईल. .... "

माणसाच्या शरिराच्या धांवेपेक्षां माणसाच्या मनाची धांव किती वेगवान आणि पल्लेदार असते ! तें स्वतंत्र भारताचें दिवास्वप्न मनोमन पाहतांना त्यागनिष्ठ पवित्र मनाच्या खुदीरामला मध्यें कसला–कसलाही अडथळा दिसत नव्हता.

त्याचे सहकारी माणिकतोळा बागेंतल्यासारखे बॉंबचे छुपे लहान लहान कारखाने ठिकठिकाणीं चालवीत होते. कृष्णकुमार मित्र, पुलिन विहारी दास, शामसुंदर चक्रवर्ती, अश्विनीकुमार दत्त, मनोरंजन गुह, सचींद्रप्रसाद बोस, सतीशचंद्र चक्रवर्ती, भूपेशचंद्र दत्त, सत्येंद्रनाथ बोस, सारे–सारे मायदेशाच्या मंगलासाठीं मरणाच्या तयारीनें सशस्त्र क्रांतीचे स्नातक बनलेले त्याचे समवयस्क सहकारी मित्र बॉंबगोळे तयार करीत होते. पिस्तुलें आणि काडतुसें मिळवीत होते. शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या ह्या क्रांतिकारक सेनेकडून ठायींठायींच्या पोलिस ठाण्यांवर हल्ले होत होते. रायफली वगैरे शस्त्रास्त्रें सांपडतील तीं चोरून मारून लुटलीं जात होतीं.

इकडे खुदीराम पकडला गेला, त्या दिवसापासून मृत्यूचें भय तर मावळत्या दिवसाच्या सांवल्यांसारखें अक्राळविक्राळ रूप धारण करून जिथें गोरा दिसेल तिथें त्याचा बळी घ्यायला पाठलाग करूं लागलें होतें.

तो दिवस गेला. आणि बेड्यांनीं जखडलेला खुदीराम असा हत्यारी पोलिसांच्या सक्त पहाऱ्यांत मूजफरपुरला आणून बंदिशाळेंत कोंडला गेला.

आणि उजाडलें नाहीं तोंच त्याच बंदिशालेच्या भिंतीवर क्रांतिकारकांची धोक्याची ताकीद फडकली.

'याद राखा! आमच्या खुदिरामच्या केंसाला तरी धक्का लावाल,
तर त्याच्या केंसांनीं मोजून गोऱ्यांना कंठस्नान घातलें जाईल.'

सर्वत्र फडकणारी ती ताकीद, आणि हें नवें पत्र !.... जरा देखील अवधि जाऊं न देतां अनेक गोरे पोलिस अधिकारी सहा गोरे-सोजीर, इन्स्पेक्टर हॅमिल्टन, गांगुली, एवढा पोलिस अधिकाऱ्यांचा ताफा पुरेशा गुप्त पोलिस दलासह त्या अत्याचाराचा मागोवा घेत कलकत्त्याला जायला निघतो, तों एक सायकलस्वार तरुण गरुडासारखा झेंपावत चौकीवर आला. आणि एक लखोटा देऊन वाऱ्यासारखा माघारा निघून देखील गेला.

तें पत्र पडलें तेंही नेमकें नंदलाल बानर्जीच्या हातीं. बानर्जी तें विस्मयपूर्वक उघडून वाचतो तों काय! आंत त्यालाच जाळणारे निखारे!

'नंदलाल ! देशद्रोह्या! तूं कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ झाला आहेस. खुदीरामला पकडून तूं आमच्या क्रांतिसेनेचा भयंकर अपराध केला आहेस. याबद्दल तुला देहान्ताची शिक्षा देत आहों. योग्य वेळीं या शिक्षेची अंमलबजावणी होईल. आपल्या देशबांधवांना याप्रमाणें गोत्यांत आणण्याच्या पापांत असे जे जे हिंदी अधिकारी सहभागी होतील त्यांनींही या न्याया-पासून धडा घ्यावा.'

पोलिस कलकत्याला जाऊन पाहतात तों तिथेंही तेंच ! जसे जाहीरनामे मुजफरपुरांत फडकत होते, तसेंच कलकत्ताभरही ! क्रांतिकारकांच्या वहिमी मकाणांवर गुप्त पोलिसांचे पहारे पहांटपासून बसले होते. त्या बंदोबस्ताला हें जणुं क्रांतिकारकांचें आव्हान होतें.

कलकत्यांत तावडतोब झडत्या आणि धरपकडी यांचें सत्र सुरू झालें. एकाच वेळीं अनेक मकाणांवर छापे पडले.

"हें असें कसें झालें सत्येन?" माणिकतोळा बागेंतील क्रांतिकारकांच्या त्या 'राजधानी' मधील निवासस्थान तर पहांटेपासूनच सशस्त्र पोलिसांनीं कुणालाही नकळत दूरदूरचीं नाकीं रोखून वेढलें होतें. आणि अचानक सांपळ्यांत कोंडले जाणाऱ्या सिंहाच्या छाव्यासारखे ते तिघे तरुण आंतील गुप्त कागदपत्रांची रास विल्हेवाटीसाठीं उलथी पालथी करतां करतां आपसांत विचार करीत होते. ते हेमचंद्र दास, सत्येंद्रनाथ बसू आणि कन्हैयालाल दत्त.

हेमचंद्रानें आपला अशुभ संशय बोलून दाखविला, "रात्रभर शहरांत बोभाटा होऊं न देतां धरपकड चालली आहे. आपणांपैकीं कोण कोण जाळ्यांत गुरफटत असतील कोण जाणे ! आपण शक्य तितक्या तांतडीनें काढता पाय घेऊन भूमिगत झालें पाहिजे, नाहीं ?"

"होय. पण आपला नरेंद्र गोस्वामी पकडला गेला हें खरें का ?" कन्हैयालालनें विचारलें.

"थांबा. जरा पाहून येतों." असें म्हणत हेमचंद्र चोरदरवाजानें बाहेर पडला.

"तें खरें असलें तर मात्र फारच वाईट. ती मग आकाशची कुऱ्हाडच आमच्या मानेवर कोसळली म्हणायची!–" कन्हैयालाल दरवाजा लोटून घेतां घेतां म्हणाला.

कन्हैयालालचें बोलणें अर्धेंच राहिलें. तो एकदम बाहेरचा कानोसा घेऊं लागला. तसाच उठला. आणि आपल्या मित्राचा हात

हातीं घेऊन त्याला ओढीत चालूं लागला. चालतां चालतां तो बाहेरील हालचालींची चाहूल घेत क्षणभर थबकून म्हणाला, "अरे हा पोलिसांचा छापा तर पडला नसेल आपल्या या गुहेवर? आतां यांतून निसटायचें तर अशा उघड्या ओळखीनें--"

दोघेही बाहेरील वाढल्या हालचालींचा कानोसा घेत वेषांतर करून बाहेर पडण्यासाठीं छुप्या दरवाजाकडे वळतात, तों नेमका तोच दरवाजा उघडून हत्यारबंद पोलिस आणि त्यांच्या पाठोपाठ गोरे सोजीर रायफली रोंखून आंत घुसले.

"आपण तर आतां गुरफटलोंच. पण हेमेंद्र तरी निसटला हें बरें झालें. तो बाकीच्यांना खबर तरी देईल." कन्हैयालाल आपल्या मित्राला एकीकडे म्हणाला.

पण पोलिसांची बागेवर धाड जी पडली, ती अटक झालेल्या नरेंद्राच्याच सांगण्यावरून या तिघांना घेरण्यासाठींच पडली होती, आणि हेमेंद्र बाहेर जातांक्षणीं नाक्याच्या अलीकडेच पकडला गेला होता, हें त्या दोघांना काय माहीत!

उजाडलें. आणि रात्रभर साऱ्या कलकत्त्यांत तांडवनृत्य करणाऱ्या दडपशाहीचे पडसाद सकाळच्या दैनिकांतून घुमतांना हेमचंद्र दास, कन्हैयालाल दत्त, सत्येंद्रनाथ बसू आणि त्यांचे इतर सहकारी बंदिवान युवक यांना ऐकायला मिळाले.

## कलकत्त्यांत झडत्या आणि धरपकडी यांचें सत्र

[आमच्या खास नगरवार्ताहराकडून]

'कलकत्ता, ता. १ मे (पहांटे). परवां तारीख ३० एप्रिल रोजीं मुजफरपूर येथें घडलेल्या बॉंबच्या अत्याचारांच्या संबंधांत गेली रात्रभर कलकत्ता नगरांत सर्वत्र झडत्या आणि धरपकडी सुरू होत्या. सुखिया रस्त्यावरील माणिकतोळा बागेवर छापा पडला. तेथें श्री. कन्हैयालाल

दत्त आणि श्री. सत्येंद्र वसू या दोघा विद्यार्थी तरुणांना अटक करण्यांत आली. श्री. हेमचंद्र दास हा तरुण बागेंतून पसार होतांना अचानक पोलिसांच्या हातीं सांपडला. त्याखेरीज श्री. अविनाशचंद्र भट्टाचार्य, श्री. इंदुभूषण रॉय, श्री. उपेंद्रनाथ बानर्जी, श्री. नरेंद्रनाथ गोस्वामी, अशा पंचवीस तरुणांना पोलिसांनीं निरनिराळ्या मकाणांवर छापे घालून अटक केली आहे असें समजतें. माणिकतोळा बागेखेरीज हॅरिसन रोड, स्कॉटस् लेन, बाघबझार, 'नवशक्ति' कार्यालय, अशा अनेक ठिकाणीं पोलिसांनीं छापे घालून झडत्या घेतल्या. झडत्यांत बॉंब तयार करण्याचा एक मोठा सुसज्ज कारखाना, व तसेंच आणखी दोन लहान कारखाने सांपडले. पुष्कळ कोरड्या बॅटऱ्या, पिक्रिक ॲसिडचा बराच मोठा सांठा, एक डायनामो, बंदुकीची दारू, बॉंबगोळ्यांसाठीं वापरण्याचीं लोखंडी कवचें, बरेच तयार बॉंब व उडालेल्या बॉंबगोळ्यांचे तुकडेही सांपडले. हे तुकडे प्रयोगादाखल उडवून पाहिलेल्या बॉंबगोळ्यांचे असावे असा पोलिसांचा तर्क आहे; याखेरीज बऱ्याच मार्टिनी हेन्री रायफली, लोखंडी ट्रंका, अनेक पुस्तकें आणि पुष्कळसा पत्रव्यवहार पोलिसांनीं झडत्यांत जप्त करून ताब्यांत घेतला.

'या आरोपी तरुणांपैकीं श्री. नरेंद्र गोस्वामी हा सरकारचा माफीचा साक्षीदार झाला असून त्यानें दिलेल्या माहितीरूवन पोलिसांनीं नेमक्या अनेक ठिकाणीं झडत्या घेतल्या आणि धरपकड केली असें कळतें.'

'आज पहांटेला पोलिसांनीं 'युगान्तर' आणि 'नवशक्ति' या पत्रांचे संपादक श्री. बाबू अरविंद घोष यांना अटक केली. आतां-पावेतों तिसांहून अधिक लोकांना पकडण्यांत आलें असून धरपकडी आणि झडत्या यांचें सत्र जोरांत सुरूच आहे.

"एकूण आपणां सर्वांचा असा केसानें गळा कापणारा हा नरेंद्र!" कन्हैयालाल जोरानें ओठावर ओठ दाबून रक्त येईतों आपल्याच दांतांनीं चावीत सत्येंद्राकडे पाहून उसासला.

## २ : तीं पत्रें कोणाचीं ?

मुजफरपूरच्या मॅजिस्ट्रेट कोर्टांतील सारे प्राथमिक शिष्टाचार आटोपेल. आतां खुदीरामचा खटला जज्ज कॉर्नडफ याच्यापुढें सुरू होता. वास्तविक मुजफरपूरचा जिल्हा-जज्ज किंग्जफर्ड. पण त्याच्याच जिवावर उठलेल्या खुदिराम बोसवर केनेडी मायलेकींच्या वधाबद्दल सरकारनें भरलेला तो खटला. म्हणून या खटल्यापुरता कॉर्नडफ हा न्यायाधीश नेमला गेला होता.

प्रत्यक्ष बॉंब जरी किंग्जफर्डवर पडूं शकला नाहीं, चोर सुटला आणि संन्यासी बळी जावा तशी गत झाली, तरी त्या अत्याचाराच्या भीषण वार्तेचा हादराही चोराच्या काळजाचें पाणी करून सोडायला समर्थ ठरला. आपण भ्यालों असें किंग्जफर्डनें बाहेर जरी दाखविलें नाहीं, तरी तो कोर्टाच्या तपासणीच्या कामासाठीं म्हणून दुसऱ्या दिवशीं जो मोतिहारीला गेला, तो लौकर माघारा येतोच कशाला !

आज खटल्याचा बहुधा अखेरचा दिवस होता. खालच्या कोर्टांत तर खुदीरामच्या बाजूनें कोणी चांगला वकील उभा नव्हताच. करून सवरून वर खटला चालवावा, खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करीत बसावें, हें त्याला स्वतःला मान्य नव्हतें.

तरी देखील वरच्या कोर्टांत त्याला सर्वांची अतिशय गळ पडली. वडिलांच्या ठायीं पूज्य असलेल्या कालिदासबाबूंसारखा नामांकित कायदे-पंडित ' मी तुझा खटला चालवणार. या वकीलपत्रावर मुकाटपणें सही कर ' असें त्याला म्हणून खटला चालवायला उभा राहिला. त्यांना नाहीं म्हणून झिडकारण्याचें उद्दाम धैर्य खुदीरामच्या अंगीं नव्हतें.

त्यानें मुकाटपणें वकीलपत्रावर सही केली. आणि खटला चालला. खालच्या कोर्टांत आरोपीनें दिलेला कबुलीजबाब कालिदासबाबूंनीं कायदे-शीर चातुर्याच्या बळावर पुन्हा शक्य तितका हवा तसा घासून पुसून

सोईचा करून घेतला. त्यांचा सारा रोंख सरकारी पुरावा नाशाबीत करून आपल्या मानसपुत्राची मान फांसांतून सोडविण्याचा होता.

शैलेंद्रचंद्र ह्या ख्रिश्चन मॅजिस्ट्रेटची उलट तपासणी सुरू होती. खुदीरामला खुनी ठरविण्यासाठीं पुराव्यांत त्याचे जोडे दाखल केले होते. ते त्याचे नव्हते; वैनीला पोलीसझटापटींत ठार झालेला दिनेशचंद्र रॉय याचे अथवा आणखी कोणाचे ते असतील, असें कालिदासबाबू साक्षीदाराला उलट तपासणींत अडवून त्याच्या मुखानें शाबीत करूं पाहत होते.

"ते जोडे आरोपीचेच होते असें तुम्ही कशावरून म्हणतां?"

"ते खून झाला तेथें जवळच सांपडले. आणि ते आरोपीच्या पायांत घालून पाहून ते त्याचेच आहेत अशी मीं समक्ष खात्री करून घेतली."

"ते जोडे स्वदेशी होते कीं विदेशी होते?"

कार्नडफनें साक्षीदाराला त्या प्रश्नांचें मतलबी सूचक स्पष्टीकरण करून सांगितलें, "ते जोडे विदेशी असल्यास स्वदेशीचा कट्टा पुरस्कर्ता असलेला आरोपी याचे ते नव्हते असें बचावाच्या वकिलांना सिद्ध करायचें आहे."

तेवढ्यांत आरोपी स्वतःच निर्मल मुद्रेनें उत्तरला, "ते जोडे माझेच आहेत."

त्यासरसा कालिदासबाबूंनीं कपाळाला हात लावला.

असा हायकोर्टापावेतों खटला चालून अखेर निकालाची तारीख १३ जून उजाडली. त्या दिवशीं सकाळपासूनच कोर्टासभोंवार पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. त्यावरूनच आज खटल्याचा निकाल काय होणार याची सर्वांना कल्पना होती.

त्या खवळलेल्या गर्दींत न्यायाधीशांनीं खटल्याचा निर्णय जाहीर केला. खालच्या कोर्टाचा निर्णय कायम..... फांशी!

खुदीराम बोसवरील खटल्याचा शेवट ही कलकत्त्यांतील बॉंब खटल्याच्या शोकपर्यवसायी नाटकाची केवळ नान्दी होती. खरी शोककथा इथून पुढें चालू होत होती.

कन्हैयालाल दत्त, सत्येंद्रनाथ बसू, हेमचंद्र दास वगैरे तीस तरुण सरकारनें पकडले होते. बादशहांचें सरकार उलथून पाडण्यासाठीं खुनासारख्या कटांत आणि बॉंबगोळे तयार करण्याच्या कारस्थानांत सहभागी असल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर कटाचा खटला पूर्वींच सुरू झाला होता. त्या खटल्याचा निकाल कदाचित् आज जाहीर होईल, या कल्पनेनें त्या दिवशीं न्यायालयांत निकाल ऐकण्यासाठीं नागरिकांची बेसुमार गर्दी उसळली होती.

खुदीरामविरुद्ध काम चालविणारा सरकारी वकील ॲडले नॉर्टन हाच या खटल्यांतील सरकारी वकील होता. न्यायाधीशही तोच, कॉर्नडफ.

नॉर्टन आपलें सामारोपाचें भाषण करण्यासाठीं कोर्टांत उभा राहतो, तोंच कोर्टाच्या आवाराबाहेर एका सायकलस्वार तरुणानें एक लखोटा कोर्टावरील पहारेकऱ्याच्या हातीं आणून दिला. आणि सांगितलें, "नॉर्टनसाहेबाला हें पत्र नेऊन दे."

पहारेकऱ्यानें तो लखोटा नॉर्टनच्या हातीं आणून दिला. लगेच त्यानें कोर्टाच्या परवानगीनें आपलें सुरू झालेलें भाषण थांबवून तो लखोटा उघडून वाचला.

"महाराज! मी आतां आरोपींच्या भयंकर कटाच्या गंभीरपणाबद्दल बोलत होतों. त्याचाच हा ताजा पुरावा आपण ऐकावा." असें म्हणून नॉर्टन ती लहानशी चिठ्ठी पुन्हा कोर्टाला वाचून दाखवूं लागला.

'नॉर्टन, याद राख! आमचा खुदीराम बोस जर फांशी गेला, आणि आमच्या मित्रांना आज शिक्षा ठोठावल्या गेल्या, तर त्याचा बदला म्हणून अनेक गोऱ्या अधिकाऱ्यांचा बळी घेतला जाईल. त्यांत तूंही बॉंबगोळ्याला बळी पडशील....'

## ३ : फितुराला देहान्त शासन

कॉर्नेडफलाही तें धमकीचें पत्र ऐकून मनांत धक्का बसल्यासारखा झाला. त्या पत्रांतील धमकी वांझोटी नाहीं याची त्यालाही जाणीव होती. स्वतः त्यालाही खुदीरामवरचा खटला चालू असतांना कांचन-पारा पोस्टांतून तारीख ११ जूनला असेंच एक पत्र आलें होतें. त्याचा आशय असा.

'कॉर्नेडफ! तूं त्या भित्र्या भागूबाई किंग्जफर्डच्या ऐवजीं न्यायाधीश म्हणून खुदीरामचा न्याय करायला बसला आहेस. पण तूं, तुझे जातभाई गोरे पोलिस अधिकारी, आणि आपल्या जन्मभूमीशीं बेइमान झालेला, खुदीरामला पकडणारा तुमचा साथीदार नंदलाल बानर्जी यांना ठार करण्यासाठीं मी कलकत्त्याहून बॉंब घेऊन निघालों आहें. याची तुम्हीं सर्वांनीं नीट दखल घ्यावी....'

मुजफरपुरच्या बॉंबच्या अवतारानंतर पांचव्याच दिवशीं 'लंडन टाइम्स'नें 'आम्ही भ्यालों नाहीं हो!' असें सांगण्यासाठीं आरोळी ठोकली: 'असे बॉंबगोळे फेकून अत्याचार केल्यानें सरकार भलत्याच सवलती आणि भलतेच अधिकार भारताला बहाल करील असें कोणीं समजू नये. असल्या अराजकाच्या म्होरक्यांनीं कितीही कट-कारस्थानें केलीं, तरी सरकारनें भितां कामा नये. भारतावर राज्य करून भारताचा विकास करण्याचें महत्कार्य असेंच नेटानें पुढें चालविलें पाहिजे.'

खुदीरामला पकडून पंधरवडा लोटला नाहीं, तोंच कलकत्त्यांत बो स्ट्रीटवर दुसरा बॉंब उडाला. चार माणसें घायाळ झालीं. असे जून ते डिसेंबरपावेतों लागोपाठ चार बॉंबहल्ले झाले. आणि तेही कोणत्या परिस्थितींत? तर बॉंबच्या अत्याचारांना समूळ आळा घालण्यासाठीं भारत सरकारनें दोन कर्दनकाळ कायदे जारी केल्यावर.

पण सरकारनें बॉंबगोळे आणि क्रांतिकारक यांचें निर्मूलन नरेंद्र

गोस्वामीसारख्यांकडून छळून मिळविलेल्या माहितीनुसार केलें, तरी कलकत्त्यांत बो स्ट्रीटवर बाँबगोळा सरकारच्या उरावर पडलाच !

जहाल क्रांतिकारक बाण्याचीं वृत्तपत्रें म्हणजे तर पेटतीं कोलितेंच. 'युगांतर', 'नवशक्ति', 'वंदेमातरम्' हीं कलकत्त्याचीं पत्रें, पुण्याच्या लोकमान्यांचा 'केसरी,' प्रो. शिवरामपंत परांजप्यांचा 'काळ', भास्कर विष्णु फडक्यांचा 'विहारी', वगैरे ठिकठिकाणच्या प्रमुख पत्रांतून राजद्रोहाचें भरघोंस पीक वाढत्या प्रमाणावर येतच होतें. सरकारविरुद्ध देशांतील लोकांचीं माथीं भडकतच होतीं.

लोकमान्यांच्या 'केसरी'मधील बाँबगोळ्याची आणि अत्याचारांची मीमांसा म्हणजे तर कायद्याची कचाटी चुकवून सशस्त्र क्रांतीची शिकवण देण्यासाठीं चालविलेलीं अभ्यासमंडळेंच. त्यांत बाँबगोळे तयार करण्याच्या युक्त्या देखील धूर्त माणसानें पडताळून घ्याव्या आणि त्यांचा उपयोग करून बाँबगोळे तयार करण्याच्या उद्योगाला लागावें.

अशा जिद्दीला पेटल्यासारख्या ईर्षेनें हीं वृत्तपत्रें सरकारचें दडपशाहीचें आव्हान वाढत्या भडक प्रचारानें स्वीकारूं लागलीं.

सरकारनें वृत्तपत्रांवर राजद्रोहाचे खटले भरण्याचा धडाका चालविला. 'युगांतर', 'संध्या' वगैरे पत्रांवर खटले झाले. संपादकांना जबर शिक्षा होऊं लागल्या. भराभर संपादक तुरुंगांत डांबले जाऊं लागले. पण एक तुरुंगांत गेला कीं त्याच्या जागीं दुसरा दत्त म्हणून उभा. तो पकडावा तों त्या जागीं तिसरा....चौथा.

सरकारनें वृत्तपत्रें बंद पाडलीं तर जुन्याच्या जागीं नवीं निघायचीं. पुण्याच्या 'केसरी'वर राजद्रोहाचा खटला झाला तोही मुजफरपुरच्या बाँबमधूनच अवतरलेला.

इकडे खुदीरामला फांशीची शिक्षा जिल्हा कोर्टांत ठोठावली गेली. त्याचें अपील हायकोर्टांत चालून खालचा निकाल कायम झाला. तो फांशी जाण्याच्या अगोदर दहा दिवस टिळकांना सहा वर्षांची

शिक्षा! आणि तीही अंदमानांतील काळ्यापाण्याचें भावंड शोभण्यासारखी. त्यांना भारतांतील लोकांच्या नजरेपासून दूर-दूर तिकडे ब्रम्हदेशांत मंडालेच्या तुरुंगांत नेऊन डांबण्यांत आलें.

तरीही चळवळ उग्र स्वरूपांत चालूच होती. सरकारनें आग विझवण्यासाठीं दडपशाहीचें पाणी त्या आगीवर ओतावें, तों त्या पाण्याचें तेल होऊन आग अशी अधिक भडकूं लागावी.

नॉर्टननें त्या दिवशीं भर कोर्टांत तें धमकीचें पत्र आलेलें वांचून दाखविलें, ती धमकी अगदींच पोकळ नाहीं, हें सभोंवार पेटलेल्या रानावरून स्वतः नॉर्टन चांगलें ओळखून होता. तसाच न्यायाधीश कॉर्नडफही ओळखून होता. त्यांच्या भित्र्या अंतःकरणाला त्या धमकीचा धक्का मरणघावासारखा झोंबणें अगदीं स्वाभाविक होतें.

मधल्या सुट्टींत कोर्ट उठलें. सरकारी वकिलाचें भाषण कांहीं संपलें नव्हतें. तरी तारीख पुढें पडली. तेवढ्यांत कोर्टांतील गर्दींतून कुठून कशी नकळे पण सर्वांची नजर चुकवून एका ओळीची एक चुरगळलेली चिठी कन्हैयालालच्या हातीं आली. तें त्या कोणा दोघां तरुणांचें साहस होतें. पोलिसांना दाद लागूं न देतां त्यानें ती मांडीआड धरून उलगडून वाचली.

'पुस्तकें काळजीपूर्वक वाचावीं.'

"ठीक आहे." ती चिठी सत्येंद्रनाथाला गुपचुप दाखवून त्या चिठीची गोळी करून तोंडांत टाकीत तो स्वतःशीं म्हणाला.

तेवढ्यांत सरकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीनें आरोपींना बाहेरून पुस्तकें वाचायला आणवतां येत तशीं कागदांत गुंडाळून बांधलेलीं दोन मोंठीं पुस्तकें एका पोलिसानें आणून दिलीं. दोघांच्या नांवांचीं दोन.

"हीं तुमच्यकडेच ठेवा. तुरुंगांत गेल्यावर आम्हांला द्या." तीं पुडकीं तशींच त्या पोलिसापाशीं देत खुदीराम म्हणाला.

आणि कां नकळे, पण दोघेही प्रसन्न वृत्तीनें नरेंद्राकडे स्मितहास्यपूर्वक पाहूं लागले.

"आम्हांला आमच्या मित्राशीं थोडा वेळ बोलायची मोकळीक आहे का?" कन्हैयालालनें जवळ उभ्या असलेल्या पोलिस अधिकाऱ्याला खेळीमेळीनें विचारलें.

त्याची साक्ष आतां होऊन गेली होती. आतां भय नव्हतें. त्यांना परवानगी मिळायला अडचण पडली नाहीं.

आज इतके दिवस धड नजरेनें पाहायला देखील तयार नसलेले आपले सहकारी आज एकाएकीं इतके आपुलकीनें वागूं लागलेले पाहून नरेंद्राला बरें वाटलें. एरव्हीं तो जरी आतां माफीचा साक्षीदार म्हणून तुरुंगवासांतून सुटल्यांत जमा होता, तरी सर्वांबरोबर कलकत्त्याच्या धर-पकडीच्या सत्रांत अटक झाल्यापासून आज सव्वादोन महिने तुरुंगांत सर्व सहकाऱ्यांनीं त्याच्यावर कडकडीत बहिष्कार घातला होता. त्याच्या मेल्याजित्याचीही विचारपूस करायला ते तयार नव्हते. त्यामुळें त्याला जीवन अगदीं असह्य वाटत होतें.

कोर्टांतील गर्दी ओसरली. पोलिसांच्या पहाऱ्यांत सारे आरोपी अलिपूर तुरुंगाकडे चालले. कन्हैयालाल आणि सत्येंद्र जसे कांहीं नरेंद्राच्या गळ्यांत गळा घालून बोलत चालले होते.

तुरुंगांत जातांना त्या पोलिसानें जेलरच्या परवानगीनें कन्हैया-लालचीं पुस्तकें त्यांच्यापाशीं दिलीं. त्याच रात्रीं तुरुंगांतील त्या राज-बंदी आरोपींच्या कोठड्या नेहमींप्रमाणें बंद होण्यापूर्वीं कन्हैयालाल आणि सत्येंद्र यांच्या रिव्हॉल्व्हरांच्या गोळ्यांना नरेंद्र गोस्वामी अकस्मात बळी पडावयाचा होता! आणि तरीही ते दोघे जसे कांहीं त्याचे मित्र नरेंद्राच्या गळ्यांत गळे घालून बोलत चालले होते!

तुरुंगापाशीं ते जाऊन पोहोंचले. फाटक उघडलें. ते आंत गेले. पोलिस अधिकाऱ्यानें नेहमींसारखीं तीं दोन जाडीं पुस्तकें जेलरला कळवून त्या दोघांच्या स्वाधीन केलीं.

त्याच रात्रीं त्यांतून बंदोबस्तानें लपवून पाठविलेलीं पिस्तुलें अफ-

जुलखानाला ठार करणाऱ्या शिवाजीच्या हातांतील वाघनखासारखीं दबा धरून बसलीं आणि नरेंद्र गोस्वामीच्या कोठडीकडे त्याच्या समाचाराला गेलीं.

पिस्तुलांचे स्फोट एकदम दणाणले. ते ऐकतांक्षणीं आजूबाजूच्या कोठड्यांतील क्रांतिकारक आरोपी धांवून बाहेर आले. पहारेकरी पोलिसही धांवून आले.

पाहतात तों कन्हैयालाल आणि सत्येंद्र तीं पिस्तुलें तिथें खालीं टाकून देऊन बेडरपणें पोलिसांसमोर छाती वर काढून उभे.

आंत कोठडींत नरेंद्र रक्ताच्या थारोळ्यांत मरून पडला होता.

पोलिस त्या दोघांना अटक करायला पुढें सरसावले. त्यांना जराही विरोध झाला नाहीं. पोलिसांना तीं मुद्देमाल पिस्तुलेंही सांपडलीं.

आणि त्या पिस्तुलांना लपवून तुरुंगांत आणणारीं तीं दोन पुस्तकेंही दोघांच्या कोठड्यांत सांपडलीं.

"आम्हीं याला ठार केला. देशद्रोही, दगलबाज, फितूर, नराधम हा. इंग्रजांचा कायदा असल्या गुन्हेगारांचा पाठीराखा. तो याला निर्दोष सोडणार होता. म्हणून देवाघरच्या कायद्यानुसार आम्हीं याला हें देहान्त शासन दिलें." कन्हैयालाल पोलिसांपाशीं निर्भयपणें उद्गारला.

## ५ : गव्हर्नरवर पिस्तुल झाडलें

आतां पुढची पाळी बंगालचा लेफ्टनंट गव्हर्नर सर अँड्रयू फ्रेझर याची होती.

फ्रेझर कलकत्त्यांत आपल्या राजभवनाच्या उद्यानांत सूर्यास्ताच्या वेळीं चहा पीत पीत आपल्या बड्या अधिकाऱ्यांशीं शिळोप्याच्या 'युद्धस्य कथा रम्या' बोलत बसला होता.

"सरकारनें मोर्ले–मिंटो सुधारणा भारताला बहाल केल्या, त्या नादांत आपण बेसावध राहिलों नाहीं हें चांगलें झालें. वेळींच निष्ठुरपणें दह-

शतवादी चळवळ्यांचीं पाळेंमुळें खणून काढलीं, म्हणून आज बंगाल इतका शांत दिसतो आहे." तो सांगत होता.

तेव्हांच काळ त्याच्या उद्यानांत फेऱ्या घालतां घालतां तें ऐकून स्वतःशीं म्हणत होता, "धीर धर. बंगाल तुझ्या सुधारणा पायाखालीं तुडवीत तुला दडपशाहीबद्दल जाब विचारायला येतो आहे."

वर वर पाहिलें तर फ्रेझरचे ते उद्गार केवळ वायफळ नव्हते. खुदीराम बोस फांशी गेला; त्यानंतर अवघ्या वीस दिवसांनीं फितुराला देहान्त शासन देणारे कन्हैयालाल दत्त व सत्येंद्रनाथ मित्र हे दोघे तारीख ३१ जानेवारी १९०९ ला फांशी गेले. त्यांच्या बरोबरचे सहकारी कोणी अलिपूरच्या तुरुंगांत तर कोणी आणखी कुठच्या तुरुंगांत छळवादी जीवन कंठीत डांबून पडले होते. कांहींजण जिवंत गाडल्यासारखे जन्मठेप काळ्या पाण्याची घोर शिक्षा भोगायला अंदमानच्या तुरुंगांत नेऊन कोंडण्यांत आले होते.

झडत्या, धरपकडी, शिक्षा हें सत्र अधूनमधून सुरूच होतें.

"पण युवर एक्सलन्सी! इतका बंगाल खरोखरच शांत आहे असें आपल्या गुप्त पोलिस खात्याच्या तरी अनुभवाला येत नाहीं. आमचा अनुभव निराळा आणि काळजी उत्पन्न करणारा आहे." गोरा सी. आय्. डी. पोलिस कमिशनर गव्हर्नरच्या भाषणाचें सूत्र धरून म्हणाला, "सरकारनें देऊं केलेल्या सुधारणांनीं काँग्रेसमधील मॉडरेट (नेमस्त) पुढाऱ्यांचें थोडेंफार समाधान झालें असेल. तरी एक्स्ट्रिमिस्ट (जहाल) लोकांच्या असंतोषी वृत्तीवर त्यांचा कांहीं परिणाम झालेला दिसत नाहीं. आणि ही टेरॉरिस्टांची (दहशतवादी) टोळी, ही तर त्या जहालांची आघाडीची सेना."

"ती तर कोळ्यानें घराच्या आढ्यावर जाळें ताणीत जावें तशी देशांत प्रांतोप्रांतीं डोकें वर काढूं लागलेली दिसते. महाराष्ट्राला तर ह्या टेरॉरिझमनें चांगलेंच घेरलेलें दिसतें." दुसरा गोरा अधिकारी म्हणाला.

"होय. चिरोलसाहेब असें म्हणतो खरें." फ्रेजर किंचित् हळव्या नूरानें उद्गारला, "पण त्याची आपल्या बंगालला तर कांहीं बाधा नाहीं ना? तिकडे नाशिक, सोलापूर या दोन जिल्ह्यांत टेरॉरिस्टांच्या गुप्त संस्थांचा फारच बुजबुजाट चिरोल म्हणतो तसा झाला असेल. तें तिकडे मुंबई सरकार पाहून घेईल."

'लंडन टाइम्स'चा भारतांतील बातमीदार सर व्हॅलंटाइन चिरोल याच्या ताज्या 'टाइम्स' मधील बातमीपत्रानें वरील संदेह निर्माण केला होता.

"बंगालमध्यें ही आग मुळांत लावणाराही एक भूमिगत महाराष्ट्रीयच आहे, पांडूरंग महादेव बापट. माणिकतोळा बॉंब केसमध्यें माफीचा साक्षीदार नरेंद्र गोस्वामी यानें नाहीं सांगितलें?" पोलिस कमिशनर म्हणाला.

"होय. त्यानें सांगितलें. आणि म्हणूनच त्याचा तुरुंगांतल्या तुरुंगांत खून पडला." फ्रेझर चिंतावलेल्या भुंवया जरा चढवीत म्हणाला.

बागेंत पाठीमागें गुप्त पोलिसखात्याचा इन्स्पेक्टर नंदलाल बानर्जी संरक्षक कामगिरी बजावीत उभा होता. त्याच्याकडे मागें वळून पाहिल्यासारखें करून तो पुढें म्हणाला, "सरकारी अधिकाऱ्यांना धमकीचीं पत्रें अजूनही वारंवार येतच आहेत. बानर्जींना आजच पुन्हा तसें पत्र आलें आहे."

"काय म्हणून?" फ्रेझरनें किंचित् चिंतातुर चर्या करून विचारलें.

"त्यांनीं त्रैनीला जाऊन खुदीराम बोसला अटक केली म्हणून."

"तें मला तुम्हीं सांगितलें नाहीं." फ्रेझर बानर्जीकडे पाहून म्हणाला.

बानर्जीनें लगेच तें पत्र आपल्या खिशांतून काढून पोलिस कमिशनरच्या हातीं दिलें. त्यानें तें गव्हर्नरपुढें ठेवलें. गव्हर्नरनें तें वाचलें.

'देशद्रोही दगलबाज नंदलाल! नरेंद्र गोस्वामी नरकांत जाण्यासाठीं तुझ्या सोबतीची वाट पाहत खोळंबला आहे. तुझें मरण जवळ आलें आहे. गव्हर्नरच्या बंगल्यावरचा संरक्षणाधिकारी झालास, म्हणजे कांहीं आकाश फाडून गेला नाहींस. तूं आणि तुझा गव्हर्नर मरायला तयार राहा....'

तोंच पाठीमागून थोड्या अंतरावरून पिस्तुलाचे दोन आवाज झाले. दोन गोळ्या सूंऽऽ सूंऽऽ करीत आल्या. त्या धुरानें बागेंत तेवढ्या टापूंत एक दोन मिनिटें कुणालाच कांहीं दिसेना. परंतु योगायोगानें गोळी मात्र गव्हर्नरला अथवा कुणालाच लागली नाहीं. दोन्ही गोळ्या दोन झाडांना लागल्या.

पिस्तुलाचा आवाज होतांक्षणीं नोकरचाकर आणि शिपाई सारे धांवले. रक्षणाधिकारी नंदलाल बानर्जी. त्यानें शिपायांना प्रसंगावधान राखून एकदम हुकूम दिला, "सारीं प्रवेशद्वारें रोंखून धरा."

तेवढ्यांत बागेंतील झुडपांच्या सावलीचा पळता आसरा घेऊन कोणीतरी पळतांना बानर्जीनें पाहिला. आणि एकदम कमरपट्ट्यांतील रिव्हॉल्व्हर काढून नेम धरून गोळी घातली.

"अरेरे! चुकून गोळी आपल्याच माणसाला लागली." असें हळ-हळत दोन राजसेवक त्या जखमी होऊन कोसळलेल्या सुलेमानपाशीं गेले.

तेवढ्यांत बानर्जीही जवळ गेला. त्यालाही प्रथम हकनाहक एक राजसेवक चुकीनें बळी पडला म्हणून हळहळ वाटली. पण जवळ जाऊन पाहतो, तों त्या जखमी तरुणाच्या डोळ्यांखालीं पावलीच्या आकाराचा बुजलेल्या जखमेचा वण त्याला दिसून आला.

"तूं? रॉय चौधरी! तूं?" तो आश्चर्यानें तोंडांत बोट घालून म्हणाला. त्यानें त्या खुणेवरून ओळखलें.

रॉय चौधरी हें नांव ऐकतांक्षणीं साऱ्या राजसेवकांना हादराच बसला. सुलेमान या नांवानें तो एका मुसलमान अधिकाऱ्याच्या

शिफारसीनें थोड्या दिवसांपूर्वी त्या राजभवनांत हुजऱ्या म्हणून नोकरीला राहिला होता. तो कामांत फार चलाख, वक्तशीर, आणि मनमिळाऊ म्हणून एवढ्या थोड्या मुदतींतही सर्वांचा आवडता झाला होता. आणि त्या मुसलमान अधिकाऱ्यानें तरी हा माणसाळलेला हत्ती, अनेक तरुणांना शाळा—कॉलेजपासून ओळखणारा, म्हणून चळवळ्या क्रांतिकारक तरुणांना हुडकून घेरण्यासाठीं हातीं धरला होता.

पण आज तो गुन्हेगार मुद्देमालासह सांपडला. त्याची कायद्यानुसार रीतसर वासलात आतां लागणार हें देव बोलला होता.

दोन दिवस कांहीं गेले नाहींत. तोंच स्वतः नंदलाल बानर्जी असाच एका क्रांतिकारकाच्या गोळीला बळी पडला. तोही अगदीं राजरोस स्वतःच्या राहत्या घरांत.

तो हत्यारी तरुण कोण याचा अखेरपावेतों पत्ता लागला नाहीं. पण गुप्त पोलिसांना कटाचे आणखी धागेदोरे शोधतांना असा सुगावा मात्र लागला कीं, त्या दिवशीं कोर्टांत कन्हैयालाल आणि सत्येंद्रनाथ यांना ' पुस्तकें ' वाचायला आणून देणारे तरुण ते हेच !

त्यांतला एक रॉय चौधरी. पण दुसरा कोण ?

**स्वाध्याय :**

१ मुजफरपूरच्या बंदिशालेच्या भिंतीवर क्रांतिकारकांची धोक्याची ताकीद कशी फडकली ?
२ माणिकतोळा बागेच्या झडतींत काय मिळालें ?
३ खुदीरामच्या खटल्याच्या अखेरच्या दिवशीं काय घडलें ?
४ नॉर्टनला आलेलें पत्र कोणीं लिहिलें असावें ?
५ मुजफरपूरच्या बॉबमधून ' केसरी 'वरील खटला कसा उद्भवला ?
६ नरेंद्र गोस्वामीचा खून कोणीं, कसा, कां केला ?
७ बंगालच्या गव्हर्नरवर पिस्तुल कोणीं झाडलें ? कां ?
८ नंदलाल बानर्जीला ठार करण्याच्या धमकीचें पत्र कां आलें ?
९ ' सुलेमान 'चें रहस्य कोणतें ?

प्रकरण पांचवें

# विलायतेवर स्वारी

## १. : ‘ सुवरका बच्चा ’

तो दुसरा कोण ?....नंदलाल बानर्जी या पोलिस अधिकाऱ्याचा खून करणारा ?

तो प्रश्न अखेरपावेतों सरकारला सोडवतां आला नाहीं. वळचणीला लपून राहिलेला दुखावलेला साप जर सांपडला नाहीं, तर तो दावा धरून केव्हां, कसा, कुठें जाऊन डसून प्राण घेईल याचा काय नेम?

या भीतीनें भारत सरकारच अस्वस्थ होतें असें नव्हे, तर विलायतेंतील गोरे इंग्रज राज्यकर्ते देखील अस्वस्थ झाले होते.

सरकारी अधिकाऱ्यांचे असे धडधडीत खून होतात, आणि सरकारला ते खुनी शोधून काढून त्यांचा नायनाट करतां येत नाहीं, याचा अर्थ काय ?

ती बातमी विलायतेंतील वृत्तपत्रांतूनही प्रसिद्ध झाली. त्याच्या दुसऱ्या दिवशीं एक बडा गोरा अधिकारी सर व्हिन्सेंट या बड्या धेंडाशीं तावातावानें बोलत रस्त्यांतच उभा होता.

विषय निघाला तो भारतांतील फाळणीच्या उग्र चळवळीची आग पेटत थेट विलायतेंतील हिंदी विद्यार्थ्यांपावेतों येऊन भिडली आहे, यावरून. तें खापर दोघांनींही लाला लजपतराय यांच्या माथ्यावर फोडलें.

त्यांच्या तक्रारीला अर्थ होता. लाला लजपतराय यांसारखे महान् हिंदी पुढारी देशांत चळवळ करून तरुणांचीं मनें भडकवितात, म्हणून सरकारनें त्यांना हद्दपार केलें. म्हणून ते विलायतेंत येऊन राहिले. त्यांचें काय ! ते जिथें जातील तिथें आग पेटवायला थोडेच भितात ! विलायतेंत

आले; चळवळ सुरू. त्यांनीं चळवळ म्हणून सुरू केली नाहीं; फक्त कॅक्स्टन हॉलमध्यें बंगालच्या फाळणीचा वाढदिवस हिंदी विद्यार्थ्यांनीं साजरा केला, त्या प्रसंगीं एक भाषण केलें.

पण खांडववनासारखी भयंकर आग पेटवायाला अग्नीची एक बारीकशी ठिणगीही पुरते.

आधीच ते विद्यार्थी भारतांत सशस्त्र क्रांति करून इंग्रजी राजवट कशी समूळ उलथून पाडतां येईल यासाठीं अधीर झालेले. आपापल्या परीनें सारे तयारीला लागलेले. त्यांना बंगालची फाळणी हें केवळ निमित्त झालें. एवढाच त्यांचा फाळणीशीं संबंध. पण लालाजींसारख्या थोर पुढाऱ्यानें फाळणीचा वाढदिवस हा भारताच्या राष्ट्रीय भावनांचा वाढदिवस असें कळवळून सांगितल्यावर काय! भडका!

सर व्हिन्सेंट हा भारतमंत्री मोर्ले याचा कैवारी. पूर्वीं एकदां पार्लमेंटांत लालाजींच्या हद्दपारीबद्दल पुष्कळ साधकबाधक चर्चा झाली, आणि सभासदांनीं भारतांत एवढी भयंकर चळवळ पेटूं दिल्याबद्दल भारतमंत्र्यांचे बोलून बोलून नुसतें वाभाडे काढले. त्यांना प्रश्न विचारून सतावून सोडणाऱ्या सभासदांचा निषेध करतांना तावातावानें उठून 'त्या लालाजीला गोळी घालून ठार कां करीत नाहीं तुम्ही एकदांचा?' असें विचारणारा गृहस्थ हा! त्याच्याशीं ली वार्नर बोलत होता.

तेव्हां विलायतेंत उच्च शिक्षण घेणारे हिंदी विद्यार्थी चारपांचशें तरी होते. त्या सर्वांना एका ठिकाणीं (न कोंडतां पण कोंडल्यासारखें) ठेवण्यांत यावें, आणि त्यांच्यावर इंग्रज पालक अधिकाऱ्याची सक्त देखरेख असावी, असा सल्ला देणारा हा भारतमंत्र्याचा सल्लागार!

आधींच हिंदी विद्यार्थी ली वार्नरवर चिडले होते. ह्या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं विद्यार्थ्यांचा निषेधप्रदर्शक अर्ज भारतमंत्र्याला सादर करण्यासाठीं घेऊन विद्यार्थ्यांचा धीटांतला धीट प्रतिनिधि कुंजविहारी भट्टाचार्य त्या साहेबालाच भेटायला निघाला होता.

त्या दोघांचें संभाषण आटोपून दोघे दोन वाटांना लागेपावेतों कुंजविहारी बाजूला थांबला. हवा तो साहेब एकटा सांपडतांच त्याच्या पुढें जाऊन म्हणाला, "आमच्यावर होणाऱ्या जुलुमाची दाद लावून घेण्यासाठीं मला भारतमंत्र्यांकडे तुमच्यामार्फत हा अर्ज पाठवायचा आहे."

हिंदी विद्यार्थी-आणि त्यांतही बंगाली बाबू दिसला, कीं या साहेबाच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन झोंबे. तशांत भट्टाचार्य ही कशी अवखळ वल्ली आहे हें तर त्याला पूर्वींच माहीत झालें होतें.

भट्टाचार्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां, त्याला धुत्कारून लावल्यासारखा ली वॉर्नर पुढें चालूं लागला.

पण भट्टाचार्य कसला वस्ताद ! तो त्याला इतक्या सुधेपणानें बरा जाऊं देईल ! त्यानें तर त्याचा पिच्छाच पुरवला. भररस्त्यावर त्याला अडविलें. आणि शब्दावरून शब्द वाढून बाचाबाची सुरू झाली.

साहेबाचें पित्त खवळलें. त्यानें भट्टाचार्यांचा हात बेदरकारपणें झिडकारीत पुढें जातां जातां त्याला शिवी देऊन म्हटलें, "चल हट-जाव निगर !"

मग भट्टाचार्य तो ! त्यानें संतापून ली वॉर्नरचा हात डाव्या हातानें घट्ट पकडला. आणि उजव्या हातानें त्याच्या अशी सणसणीत 'श्रीमुखांत' दिली कीं भर दिवसा साहेबाच्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले. त्या धक्क्यासरसा तो भुईवर कोलमडून पडला.

मग रस्त्यांत पोलिसांची ही गर्दी ! त्यांनीं भट्टाचार्याला पकडलें. त्याचें नांव, गांव, ठावठिकाणा लिहून घेतला. आणि मुकाटपणें जाऊं दिलें.

या भानगडींत स्वतः ली वॉर्नरनेंच मग नमतें घेतलें. तेरीबी चूप, मेरीबी चूप ! तो मनांत म्हणाला, फिर्याद करावी तर त्यांत आपलीच शोभा होणार. हात दाखवून अवलक्षण. तें नकोच.

पण या पड खाण्यानें हिंदी विद्यार्थी आपलें पाणी जोखतील, एवढी अक्कल कांहीं ली वॉर्नरला तेव्हां सुचली नाहीं. तेव्हां कुंजविहारी

भट्टाचार्यांचें एक प्रकरण मिटलें. पण तें दुसऱ्या एका भट्टाचार्यांच्या बेदरकार धिटाईनें ली वॉर्नरच्याच पाठीवर पुन्हा लाठीच्या रट्ट्यांनीं उमटलें.

वासुदेव भट्टाचार्य कांहीं केवळ साधा विद्यार्थी नव्हता. ‘ संध्या ’ व ‘ युगांतर ’ ह्या क्रांतिपत्रांच्या संपादकमंडळांत काम केलेला बहाद्दर तो. कुंजविहारी भट्टाचार्य आणि ली वॉर्नर यांच्यांतील बाचाबाचीची हकिकत वृत्तपत्रांत वाचून त्याचें माथें भडकलें.

“ बस्स ! ली वॉर्नरनें या बेमुर्वतखोर चढेलपणाबद्दल भट्टाचार्यांची माफी मागितली पाहिजे. ” त्याच्या मनानें घेतलें.

तसें सणसणीत पत्र लिहून तें त्याला द्यायला स्वारी स्वतः निघाली. त्याच्या नेहमींच्या लकबेप्रमाणें हातांत लाठीवजा उंचीपुरी काठी होतीच. आणि योगायोग असा कीं, या अहि–नकुलांची गांठ रस्त्यांतच पडली.

वासुदेवनें भररस्त्यांत तें पत्र ली वॉर्नरला दिलें. आणि वर त्याला सांगितलें, “ याचा जाब पाहिजे. माझें नांव वासुदेव भट्टाचार्य. ”

एवढें बोलून तो रस्ता अडवल्यासारखा उभाच राहिला.

एवढीशी दोन बोटांची चिठ्ठी वाचायला वेळ तो कितीसा लागणार ? ली वॉर्नरनें ती उभ्याउभ्याच वाचली. आणि संतापानें ती चुरगळून फेकून देत जातां जातां हातांतील छत्रीच्या टोंकानें वासुदेवला ढोंसल्यासारखें करीत शिवी हांसडली, “ सुवरका बच्चा. ”

त्याबरोबर वासुदेवनें हातांतील लाठी गरगर फिरवून साहेबाच्या पाठीवर चांगला खरपूस रट्टा हाणीत त्याचा अहेर त्याला परत केला, “ सुवरका बच्चा. ”

## २ : मदनलाल धिंग्राला फांशी !

ही ‘ सुवरका बच्चा ’ची गोष्ट इथेंच वास्तविक संपली होती. ली वॉर्नर अब्रूच्या भयानें सरकारदरबार करणार नव्हता. पण मोर्ले साहेबाच्या कानीं या गोष्टीचा बोभाटा गेला. त्यानें पाहिलें, कीं म्हातारी

मेली त्याचें दुःख नाहीं. पण काळ जोरावतो ना! त्यानें सरकारी कारवाईनें वासुदेव भट्टाचार्यवर फिर्याद करण्याची व्यवस्था केली.

आरोपीला गुन्हा नाकबूल नव्हताच. तो छाती वर काढून कोर्टांत उभा होता. कोर्टानें त्याला शिक्षा दिली.

'आरोपीनें सहा महिनेपावेतों चांगलें वर्तन ठेवण्याबद्दल प्रत्येकीं दहा पौंडांचे असे दोन जामीन द्यावे, किंवा एक महिना तुरुंगवास भोगावा.'

आरोपीनें आनंदानें तुरुंगवास पत्करला. जामीन त्याच्यासाठीं दोन सोडून दहा पुढें आले. पण त्यानें त्या आपल्या साऱ्या विद्यार्थी मित्रांना एकीकडे मिस्किलपणें सांगितलें, "अरे नको. गोऱ्या 'सुवरका बच्चा'ला त्याच्या गोऱ्या देशांत येऊन ठोक देण्याइतका भारतांतला काळा आदमी कसा बेडर झाला आहे हें येथील गोऱ्या लोकांना तुरुंगांत प्रत्यक्ष पाहूं दे कीं!...."

बोलतां बोलतां त्यानें जवळच उभा असलेल्या पंचवीस वर्षांच्या पाणीदार, बेछुट तरुणाला हांक मारून विचारलें, "काय शेर-इ-पंजाब! मीं आघाडी मारली कीं नाहीं?"

त्यावर 'शेर-इ-पंजाब' मदनलाल धिंग्रा, भट्टाचार्याचा मित्र कांहींसा स्वाभिमान डिंवचल्यासारखा बेदरकारपणें मान उडवीत उत्तरला, 'पण या शेरची उडी तुझ्यामागून पडली तरी ती हनुमानाच्या उड्डाणासारखी कशी पल्लेदार असेल ती पाहशीलच तूं."

बाकीचे तरुण हिंदी विद्यार्थी त्या दोघांचे समानधर्मे खटला ऐकायला कोर्टांत आले होते. त्यांतले जे त्या दोघांचे अगदीं जवळचे मित्र होते, त्यांना त्या दोघांची प्रतिज्ञेच्या मोलाची पैज माहीत होती. त्यांना तेवढें तें गूढ संभाषण कळलें.

भारतांतील बंगालच्या फाळणीच्या आपत्तीशीं झगडतां झगडतां भारतांतच काय पण भारताबाहेरही देशप्रेमी हिंदी विद्यार्थी तरुणांनाही

आलेला संताप दिवसेंदिवस अगदीं असह्य होत होता. भारतांत सुसंघटित सशस्त्र क्रांति योग्य वेळीं मोका साधून करायची, आणि इंग्रजी राजवट समूळ उलथून पाडायची, या धोरणानें भारतांत आणि तिकडे दूरदेशांतही क्रांतीची पूर्व तयारी चालली होती खरी. तरी देखील अठराशें सत्तावनच्या क्रांतियुद्धांत असह्य मनस्तापाच्या भरांत ठराविक योग्य वेळेच्या अगोदरच दिव्याच्या पेटत्या ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें स्वतःला बलिदानाला अधीर झालेल्या हुतात्मा मंगलपांड्यासारखे धैर्यमेरु त्या तरुण क्रांतिकारकांत होतेच.

"तें कांहीं नाहीं. ह्या इंग्रज राज्यकर्त्यांना जर ताबडतोब चांगली दहशत बसायला हवी असेल, तर ते एकटेदुकटे सांपडतील तसे गांठून त्यांना ठार केलें पाहिजे." .... या अघोर मंत्रानें भारले गेलेल्या विलायतेंतील प्रतिज्ञाबद्ध हिंदी तरुणांपैकीं वासुदेव भट्टाचार्य आणि मदनलाल धिंग्रा हे दोघे मायदेशासाठीं आवेशानें रसरसणारे तरुण होते.

वासुदेव भट्टाचार्य आणि मदनलाल धिंग्रा यांच्या त्या त्रोटक प्रश्नोत्तरांतील संकेतार्थ असा होता. "बस्स! गोरा दिसला कीं उडवा. मग तो कोणीही असो. भला–बुरा कसाही असो. ता आमचा शत्रु."

तें ऐकून त्या दोघांच्या माहीतगार सहाध्यायांना वाटलें, कीं हा आमचा शेर–इ–पंजाब आतां कोणत्या तरी बड्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या नरडीचा घोट घेणार खास.

"बस्स! मी लॉर्ड कर्झनलाच ठार करणार. तो नाहीं सांपडला तर फुल्लर. तोही नाहीं सांपडला तर कोणी तरी. पण जो कोणी बडा गोरा सांपडेल, त्याचा बळी घेणार."

असें विचारचक्र वासुदेव भट्टाचार्यांशीं संभाषण झाल्या दिवसापासून वेडर मदनलालच्या डोक्यांत वाढत्या वेगानें फिरूं लागलें होतें. भारतांतील इंग्रजी राजवट वाढत्या जुलुमांनीं तळापासून ढवळली जाऊन भारतीय जीवन इतकें गढूळ झालें होतें कीं त्यांत आवेशानें बेभान

होऊन जिवावर उदार झालेल्या अशा ज्वलज्जहाल क्रांतिकारकांना तळही दिसेना, कीं प्रतिबिंबही दिसेना. इंग्रजाविषयींचा त्वेष अशा पराकोटीला जाऊन पोहोंचला होता.

भट्टाचार्य तुरुंगांतून महिनाभरानें सुटून आला. तसाच आणखी एक महिना गेला. असे एकामागून एक सहा महिने लोटले. तरी मदनलालला मनाजोगी शिकार कांहीं साधेना. तो हरयुक्तीनें रिव्हॉल्व्हर मिळवून नेम मारायला शिकला. पण नेम कुणावर धरायचा ?

एकदां लॉर्ड कर्झनला उडवायचा योग आला होता. पण मदनलालला जामानिमा करून तिकडे जायला उशीर झाल्यामुळें तो योग हुकला.

फुल्लरला उडवायचा बेतही नीट जुळेना. अखेर तितकाच वाईट जुलमी सर कर्झन वायली होऱ्यांत सांपडला.

" बस्स ! विलायतेंतील हिंदी विद्यार्थ्यांच्या वाटेंतला हा कांटा ठेंचून नाहींसा करायचा. "

मदनलालचा ठाम निश्चय झाला.

ती तारीख १ जुलै १९०९ उजाडली. त्या दिवशीं कर्झन वायली 'नॅशनल इंडियन असोसिएशन' या संस्थेच्या वासंतिक वार्षिक मेजवानीला आला होता. त्याचें जीवघेणें 'स्वागत' करायला मदनलाल अगदीं वेळेवर मोका साधून हजर होता.

रात्रौ ११ वाजायच्या सुमाराला मेजवानीचा सोहळा ओसरूं लागला. पाहुणे मंडळी हळूहळू मार्गस्थ होऊं लागली. कर्झन वायलीही बड्यांच्या शिष्टाचारानुसार निरोप घेत घेत बाहेर निघाला.

त्याचा मृत्यु मदनलालच्या अंगांत संचारून आपल्या भक्ष्याची मार्गप्रतीक्षा करीत जिन्याच्या तोंडाशींच उभा होता. मदनलालनें तेवढ्यासाठीं तर अलीकडे कर्झन वायलीशीं ओळख करून घेतली होती. दोघेही प्रसन्न वृत्तीनें चार शब्द बोलत जिन्याच्या तोंडाशीं उभे राहिले.

ती नेमकी वेळ साधून मदनलालनें डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत खिशांतून भरलेलें रिव्हॉल्हर बाहेर काढलें. आणि नेम धरून गोळ्या झाडल्या. एक गोळी कर्झन वायलीच्या उजव्या डोळ्याच्या फोडून चिंधड्या करून आरपार गेली. दुसरीनें डोळ्याच्या जरा खालून तशीच मुसंडी मारली.

कर्झन वायली शेवटचे मरणनिःश्वास सोडीत खालीं कोसळला.

हे एकदम आवज कसले झाले तें पाहण्यासाठीं डॉ. कावस लाल–काका हा भला पार्शी गृहस्थ दचकून पुढें आला. तो डॉक्टर चांगला नामांकित, संपन्न आणि राजकारणांत कधींही न पडणारा. पडलाच तर आपल्या देशबांधवांना सढळ हातान आर्थिक मदत देण्यासाठीं पडणारा.

पण मदनलाल आतां अगदीं बेभान झाला होता. त्याला खून चढला होता.

" काय ? हा लालकाका कर्झन वायलीच्या समाचाराला आला काय ? बस्स ! त्याला घाल गोळी. कर ठार. "

त्यानें लालकाकावर गोळी झाडून त्याचाही बळी घेतला. लगेच रिव्हॉल्हरमधील शेवटची गोळी स्वतःवर झाडून बलिदानाची पूर्तता करण्याचा प्रयत्न केला. फांशी देण्यासाठीं आपण पोलिसांच्या हातीं जिवंत सांपडायचें नाहीं असा त्याचा मानस होता. पण तो साधला नाहीं. तेथें उभा असलेला मदनमोहनसिंग हा एक हिंदी विद्यार्थी आणि प्रोबिन हा एक गोरा अधिकारी हे पुढें धांवून गेले. त्यांनीं त्याला घेरलें.

तरीही जिवावर उदार झालेल्या बेडर मदनलालनें त्या दोघांशीं देखील चांगलीच झुंज दिली. ही झुंज त्यांना मारण्यासाठीं नव्हती. स्वतः मरण्याकरितां त्यांच्या हातून सुटका करून घेण्यासाठीं तो त्यांच्याशीं झुंजला. त्या झगड्यांत प्रोबिनच्या तर बरगड्याच मोडल्या. सारें अंग रक्तबंबाळ झालें. तरी पण अखेर मदनलालला त्या दोघांनीं घट्ट पकडून ठेवलेंच.

तेवढ्यांत बाकीची मंडळीही त्या दोघांच्या मदतीला पुढें सरसावली. सर्वांनीं मिळून मदनलालच्या हातांतील रिव्हॉल्व्हर काढून घेतलें. तेव्हां सर्वांना एकदांचें हायसें वाटलें.

एवढा अनर्थपात थोडक्या क्षणांत झाला. त्याच्या हातून दोन मुडदे पडले. एक मरतां मरतां केवळ बरगड्यांचा चुरा होऊन वांचला. त्या रात्रीच्या मेजवानीचा आनंदीआनंद कुठच्या कुठें पार नाहींसा झाला. विषण्ण अस्वस्थतेनें सर्वांच्या चर्या काळवंडल्या. हें सारें आपणांमुळें झालें हें मदनलाल पाहत होता. हत्यारबंद गोरे पोलिस रिव्हॉल्व्हरांचे नेम धरून आपणाला पकडण्यासाठीं गराडा घालतांना त्याला स्पष्ट नजरेपुढें दिसत होते. तरी देखील त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं.

गोऱ्या पोलिसांनीं त्याला घेरलें. तेव्हां कुठें त्याच्या ध्यानीं आलें कीं आपला चष्मा धक्काबुक्कींत दूर भिरकावला गेला आहे.

मदनमोहनसिंग त्याला पोलिसांच्या लगाभीं लावून बाजूला सरतो, तोंच मदनलाल शांतपणें पोलिसांच्या स्वाधीन होतांना पलीकडे पडलेला चष्मा दाखवून त्याला म्हणाला, "माझा तेवढा चष्मा घेऊंद्या ना मला!"

* * *

इंग्रजी साम्राज्याच्या अगदीं काळजावर मरणघाव व्हावा तसा खुद्द इंग्रजी राजधानी लंडनमध्यें राजरोस झालेला तो एका बड्या इंग्रजाचा खून. त्या खुनाच्या धडक्यानें सारा इंग्रज हादरला नसता तर नवल. विलायतेंत जिकडे तिकडे वृत्तपत्रांतून हाहाकार उडाला. निषेधसभा भरूं लागल्या. हिंदी विद्यार्थ्यांवरची सरकारी नजर अधिक सक्त झाली. इतकी कीं अघाडीच्या तरुण हिंदी क्रांतिकारकांना तर क्रांतीचें जाळें तेथून पुढें विणण्यासाठीं परदेशीं जाऊन भूमिगत व्हावें लागलें.

इंग्लंडचा मुख्य प्रधान ॲस्क्विथही आवर्जून सांगूं लागला, "या खुनामागें भारतांतील इंग्रजी राजवट उलथून पाडण्याचा फार मोठा कट रचला गेलेला आहे."

कट तर होताच. त्या कटाच्या सावल्यांनाच इंग्रज इतका भीत होता. कटाचे सारे धागेदोरे सरकारला कुठें माहीत होते!

मदनलालवर खटला झाला. साक्षीपुराव्याचे सारे शिष्टाचार पार पडले. त्याचें त्याला आणि सहकाऱ्यांनाही कांहींच नवल वाटलें नाहीं. तें सारें ओधानें प्राप्तच होतें.

साक्षीपुराव्याचे सारे शिष्टाचार पार पडले. आणि मदनलालला फांशीची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यानें अगदीं शांतपणें ती ऐकून घेतली.

आणि तितक्याच शांतपणानें त्यानें तारीख १७ ऑगस्ट रोजीं सकाळीं पेंटनव्हिले तुरुंगांतील फांशीघरांत फांशी जाण्यासाठीं प्रवेश केला. त्याच्या मानेसभोंवार फांस टाकायला तुरुंगाच्या मारेकऱ्याची गरजच पडली नाहीं. त्यानें आपल्या हातानें आपली मान फांसांत अडकवून घेऊन आपलें बलिदान सार्थ केलें.

सरकारलाही दिवसेंदिवस वाढती चिंता वाटूं लागली होती, कीं या जगड्व्याळ वाढल्या रक्तपाती अरिष्टाला आतां तोंड द्यावें तरी कसें?

तरीही सरकारला अजून नीट दादही नव्हती, कीं मदनलालचे सहकारी क्रांतिकारक तरुण भारताला तिकडे गुप्तपणें शस्त्रांचा पुरवठा अगोदरपासूनच करीत आहेत. आणि आणखी गोऱ्या अधिकाऱ्यांवर ' कर्झन वायली ' होण्याची पाळी येऊं घातली आहे!

त्यांतली पहिली पाळी नासिकचा कलेक्टर जॅक्सन याची होती.

**स्वाध्याय :**

१ कुंजविहारी भट्टाचार्य व ली वॉर्नर यांच्यांत चकमक कशी उडाली?
२ 'सुवरका बच्चा' ली वार्नरला कसा भोंवला?
३ वासुदेव भट्टाचार्य आणि मदनाल धिंग्रा यांच्यांत कोणाता संकेत होता?
४ कर्झन वायलीचा खून कोणीं व कां केला?

प्रकरण साहावें

# अखेर भारतानें लढा जिंकला

## ९ : जॅक्सनचा खून; कान्हेरे फांशी!

"काय वाटेल तें करून तीं वीस पिस्तुलें प्रथम हस्तगत करा. नाहींतर जॅक्सनसारखे 'कर्झन वायली' होण्याचें आणखी किती गोऱ्या अधिकाऱ्यांच्या कपाळीं येईल याचा नेम सांगतां यायचा नाहीं"

मुंबईचा पोलिस इन्स्पेक्टर जनरल गायडर याचा शिकारी पोलिस हस्तकांना हुकूम सुटला.

नाशिकचा कलेक्टर जॅक्सन तारीख २१ डिसेंबर १९०९ रोजीं रात्रीं अनंत कान्हेरे याच्या हस्तें ज्या पिस्तुलांतील गोळीला बळी पडला, तीच गोळी गायडरच्याही काळजांत आरपार घुसली होती. तीं सारीं पिस्तुलें सांपडेपावेतों ती बाहेर निघणार नव्हती.

बारा वर्षांपूर्वीं पुण्यांतील रॅंडच्या खुनाचा तपास लावून पुढें आलेला तरबेज पोलिस अधिकारी तो. दामोदर चाफेकराला आणि त्याच्या सहकाऱ्यांना फांसावर चढवणारा. लोकमान्य टिळकांची तुरुंगांत पाठवणी करणारा. 'पंत मेले; राव चढले' अशा देशभक्तांच्या शिकारी करून पोलिस इन्स्पेक्टर जनरलच्या इलाखाबंद बड्या अधिकारावर चढून बसलेला. त्याला ईर्षा होती कीं आपण याही गुन्ह्याचीं तशींच पाळेंमुळें खणून काढूं.

तीं वीस पिस्तुलें पॅरिसहून पूर्वींच भारतांत रवाना झालीं होतीं. १९०७ सालाच्या आरंभीं. त्याचा सुगावा विलायतेंत लागला. तिकडून लगेच भारत सरकारला कळविण्यांत आलें. जारीनें तपास सुरू झाला. परंतु नाशिकला कलेक्टर जॅक्सन याचा २१ डिसेंबर १९०९ रोजीं खून होईपावेतों सरकारला त्यांची दादही लागली नाहीं.

आणि नंतर तरी ती दाद कशी लागली? तर धरपकड आणि झडत्या यांचें भयंकर सत्र सुरू झालें, त्यांत कटवाल्यांपैकीं कच्च्या दिलाचे होते त्यांनीं छळाला शरण जाऊन भराभर कबुलीजबाब दिले, त्यांतून. पॅरिसहून जीं वीस पिस्तुलें जवळ जवळ वर्षापूर्वीं भारतांत रवाना झालीं होतीं, त्यांतीलच एका पिस्तुलानें जॅक्सनचा खून करण्यांत आला होता.

जॅक्सनचा खून हें बंगालच्या फाळणींतून भडकलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या ज्वाळा दिवसेंदिवस कशा सांपडेल तें जाळीत भडकत चालल्या आहेत याचें नवें ढळढळीत गमक होतें.

जॅक्सन हा गोरा अधिकारी असला तरी लोकप्रिय भला अधिकारी होता. अशा लोकप्रिय अधिकाऱ्यांचेही खून होऊं लागले, याचा अर्थच हा होता कीं 'सांपडला गोरा कीं कर ठार मग तो भला असो, कीं कसा असो. 'तो जुलमी राज्यकर्त्यांच्या गोऱ्या जातीचा आहे, हाच त्याचा अपराध त्याला देहान्त शासन देण्याला पुरेसा आहे.'

कुठें नाशिक आणि कुठें औरंगाबाद. इतक्या दुरून औरंगाबादेहून अनंत कान्हेरे हा हुतात्मा खुदीराम बोसच्या तडफेचा व तळमळीचा आणि तितक्याच कोंवळ्या वयाचा अभिमन्युवीर नाशिकला येतो, आणि नाटक पाहायला आवडीनें आलेल्या कलेक्टरचा भर नाटकगृहांत रिव्हॉल्व्हरनें गोळ्या झाडून खून करतो.

जॅक्सनसारखे सज्जन गोरे अधिकारी देखील निपटून काढण्याइतके खवळलेले हे क्रांतिकारक सर्रास गोऱ्यांचा आणि त्यांच्या बायकामुलांचाही केव्हां आणि कसा बळी घेतील याचा काय नेम?

जॅक्सनच्या खुनाच्या धक्क्यानें भारतांतील दरोबस्त इंग्रजांचें काळीज भीतीनें असें धडधडूं लागलें. सर्वांनाच वाटूं लागलें, कीं कुठची अवदसा आठवली त्या कर्झनला बंगालची फाळणी करण्याची नकळे. ती अशी साऱ्या इंग्रजांचें जीवन फाडून फाडून उध्वस्त करीत सुटली आहे. आतां याची अखेर होणार तरी काय?

इकडे पाहावें, तों सुरतेच्या काँग्रेसच्या अशुद्ध पर्वणींत लोकमान्य टिळकांच्या सावलीला ह्याच महाराष्ट्रीय क्रांतिकारकांनीं बंगालला आश्वासनें देऊन मुजफरपूरला सशस्त्र क्रांतीची नांदी गाण्याला उत्साह दिलेला.

बॉंबगोळ्यांची किमया देशोदेशीं विचारपूस करून नक्की हस्तगत करणारा आणि बॉंबगोळ्यांच्या कारखान्यांना कलकत्त्याच्या माणिकतोळा बागेंत मुहूर्त करून देणारा देखील महाराष्ट्रच.

तिकडे विलायतेंत पाहावें, तों बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, मद्रास असे चोहींकडून तरुण हिंदी क्रांतिकारक क्रांतीची निष्ठेनें आणि सक्रिय उपासना करणारे. पण विलायतेंत तरी त्यांचा ठावठिकाणा गायडरला नक्की थोडाच सांपडत होता! फ्रान्स म्हणूं नका, जर्मनी म्हणूं नका, रशिया म्हणूं नका, बेल्जम-स्वीडन-हॉलंड-स्वित्सर्लंड म्हणूं नका, अशी साऱ्या यूरोपभर कुठें कुठें त्यांचीं पाळें रुजलेलीं. त्यापेक्षांही दूर अमेरिकेंतही शिरून विस्तारलेलीं.

जॅक्सनच्या खुनाबद्दल अनंत कान्हेरे आणि दुसरे दोघे त्याचे समानधर्मी फांशीं गेले, म्हणून काय सारा कट मोडतो?

त्या खुनावरून वास काढीत काढीत गायडरनें फांसावर चढविलेल्या त्या तिघां हुतात्म्यांखेरीज सावरकरांसकट आणखी चौतीस देशभक्त कुठून कुठून हुडकून काढून त्या कटाच्या दावणीला बांधले. सावरकरांना तर विलायतेंतून पकडून नाशिकच्या कटाचे प्रमुख आरोपी म्हणून बंदोबस्तानें भारतांत आणलें.

परंतु असा टिटवीला चोंचीनें समुद्र उपसून उपसून कितीसा उपसतां येणार!

पकडलेल्या अनेक क्रांतिकारक तरुणांचा भयंकर छळ करण्यांत आला. आणि असे त्यांना तापल्या तव्यावर उभे करून त्यांच्या तोंडून कारस्थानांचे कबुली जबाब पिळून काढण्याचे आसुरी प्रयत्नही झाले. कांहीं नमले; पण बहुतेक ताठच राहिले. मोडले पण वांकले नाहींत. त्यांना भयंकर शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

आणि जे नमले, ते तरी दिव्याखालच्या अंधारासारखें जेवढें मर्यादित माहीत होतें तेवढें बोलले. त्यांच्या आकलनाच्या झेपेच्याही पलीकडे दूर–दूर पसरलेले क्रांतिकार्याचे धागेदोरे तेवढ्यानें थोडेच प्रकाशांत येणार होते ! सारा कट अशानें थोडाच उघडकीला येणार होता !

गायडरनें तीं वीस पिस्तुलें हुडकून काढण्याचे भगीरथ प्रयत्न केले. पण तीं सारींच काय परंतु निम्मींशिम्मीं देखील सरकारच्या हातीं लागलीं नाहींत.

अर्थात् तीं अजून तावडींत न सांपडलेल्या क्रांतिकारकांनीं कोणाना-कोणा गोऱ्यांच्या छातीवर रोखून धरलेलीं असणार.

" माझा तर खून करणार नाहींत ना हे कर्दनकाळ क्रांतिकारक ? " असा तेव्हां बंगालमध्यें काय, महाराष्ट्रांत काय, किंवा तिकडे विलायतेंत देखील हातांत बॉंबगोळा किंवा पिस्तुल घेऊन कोणी क्रांतिकारक आपणाला ठार करायला टपला असेल हा अनेक गोऱ्यांना धसका. त्यांना धड झोंपही येऊं नये.

" नकोत. भारतांतील बड्या पगाराच्या ऐषारामी नोकऱ्या नकोत, असली नोकरी म्हणजे सुळावरची पोळी ! कुणाला मानवणार ती ! " असे गोरे अधिकारी सरकारी नोकऱ्या करतांना मनांत खचूं लागले.

आणि विलायतच्या गोऱ्या व्यापारी–कारखानदारांचे प्राण तर विलायती मालावरील बहिष्कारानें नरडें दाबल्यासारखे अगदीं कंठीं घुटमळूं लागले होते.

असे भारतापासून विलायतेपावेतों सारे गोरे अगदीं बेचैन झाले होते. त्या सर्वांचें सरकारपाशीं मागणें एकच. " कांहींही करा. पण या भारताला–या त्रस्त समंधाला एकदांचा कसा तरी शांत करा. "

त्या समंधाला शांत करण्यासाठीं सरकारनें मोर्ले–मिंटो सुधारणांचा तुकडा भारताच्या तोंडावर टाकून पाहिला. पण भारत त्या तुकड्याकडे मनापासून ढुंकूनही पाहीना.

[stamp] ...वाचनालय, ...


सरकारच्या विश्वासाला पात्र असलेले, नेहमीं सरकारशीं गोडी-गुलाबीनें वागणारे, आणि सुधारणा द्या, सुधारणा द्या, असें सुचविणारे नामदार गोखल्यांसारखे नेमस्त काँग्रेस–पुढारी देखील आतां कसें करावें असें विचारूं लागले. आणि सरकारचीं बोटें सरकारच्या डोळ्यांत घालूं लागले. "वरातीमागून घोडें करायचें काय हें? तुम्हीं वेळींच सुधारणा दिल्या नाहींत. त्यामुळें त्यांची अर्धी किंमत आणि सगळी शोभा मातींत मिळाली. आम्हीं तुम्हांला आधींच सांगितलें नव्हतें? देशांतले तरुण खवळले आहेत, दडपशाहीचे नवे नवे अधिकाधिक जाचक कायदे करून हात दाखवून अवलक्षण करून घेऊं नका म्हणून? पण तें तुम्हां सरकारला रुचलें नाहीं. अशामुळेंच तरुण मंडळी आमच्या आवाक्यांत राहीनाशी झाली आहेत. त्यांना आतां आम्ही आवरूं शकलों नाहीं, तर तो दोष आमचा नव्हे."

याप्रमाणें मृदंगाला दोन्ही बाजूंनीं मार, तशी सरकारची सगळीकडून फजिती आणि कुतरओढ होऊं लागली. या सगळ्या अनर्थाला कारण बंगालची फाळणी. पण आतां त्याला उपाय?

## ६ : अखेर विजय भारताचा

भारतमंत्री मोर्ले तसा दूरदर्शी आणि धोरणी माणूस. सरकारची इभ्रत राखण्याची जबाबदारी त्याच्यावर खरी. पण म्हणून तो हें फाळणीचें प्रकरण अगदीं गळ्याशीं येऊन ठेपल्यावर दडपशहा कर्झनचीं दुष्कर्में कुठवर निस्तरीत बसणार?

कर्झननें सन १८५८च्या राणीच्या जाहीरनाम्याचा 'अशक्य सनद' असा धिक्कार करून त्या जाहीरनाम्यांतील आश्वासनांना हर-ताळ फांसणारी दंडेली सरकारांत सुरू केली होती. मोर्लेनें कर्झनची ती मल्लिनाथी जाहीरपणें धिःकारली.

तरीही कांहीं उपयोग होईना. भारतांतील चिघळलेली आणि अत्यंत धोक्याची झालेली परिस्थिति मुळींच निवळेना.

"मुकाटपणें अगोदर फाळणी रद्द करा पाहूं!" देशाच्या कोना-कोंपऱ्यांतून भारतांत आणि विलायतेंतही जोराची मागणी होऊं लागली.

फाळणी रद्द केल्याखेरीज खवळलेला भारत शांत होणार नाहीं हें मोर्लेदेखील जाणत होता. हातून घोडचूक होऊं नये ती झाली. पण आतां ती एकदम दुरुस्त कशी करायची?

भारतांतील नोकरशाही सरकारची इभ्रत पणाला लागली होती. सरकार राष्ट्रांतलि चळवळीला खुला होकार देऊं शकत नव्हतें. तसें एकदां केलें कीं सरकारचें पाणी लोकांनीं जोखलें. मग राज्य संपलें.

त्यावर सरकारनें एक शक्कल शोधून काढली. ज्यानें त्यानें आपणावरची जबाबदारी झटकून मोकळे व्हावें, आणि फाळणीला धनी कोणीच नाहीं असें ठरवावें.

बंगालच्या फाळणीची मूळ कल्पना लॉर्ड कर्झन याची. पण त्यानें बेलाशक जाहीर करून टाकलें, फाळणीशीं माझा कांहींही संबंध नाहीं.

कर्झनचें बरोबर. कारण फाळणी अमलांत आली होती हंगामी व्हाइसरॉय लॉर्ड ॲम्पथिल याच्या सहीनें.

लॉर्ड ॲम्पथिलनें लगेच जाहीर केलें, "फाळणीशीं माझा कांहींही संबंध नाहीं. सारा बनाव अगोदरच शिजून तयार होता. मी फक्त हुकुमावर सही करण्याचा धनी."

फाळणीचा बनाव झाला तेव्हां भारतमंत्री व्हायकाउंट मिडल्टन हा होता. नंतर मोर्ले भारतमंत्री होता आणि व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो होता. या तिघांनींही कर्झन आणि ॲम्पथिल यांच्यासारखेच कानांवर हात ठेवले.

पण कांहीं झालें तरी हा फाळणीचा भस्मासूर गाडणें तर अवश्य होतें. तो कसा आणि केव्हां गाडायचा एवढाच प्रश्न होता.

तो मोका सरकारनें सन १९११ च्या डिसेंबरांत तारीख १२ रोजीं साधला. त्या दिवशीं बादशहाच्या राज्यारोहणानिमित्त थाटानें दिल्लींत शाही दरबार साजरा होणार होता. ती वेळ घोषणा करायला नामी होती.

व्हाइसरॉयही बदलून नवा भला माणूस लॉर्ड हार्डिंग हा आला होता. भारतमंत्रीही क्र्यू हा नवाच होता. आणि बादशहाही नवाच!

त्या दिल्ली दरबारच्या आनंदीआनंदांत स्वतः बादशहानें दुधांत साखर घातली. बंगालची फाळणी रद्द केली. पण रद्द केली ती आबांत! राज्यकारभाराच्या सोईसाठीं सारा बंगाल एक करून तो गव्हर्नरचा इलाखा केला. बहार, छोटा नागपूर आणि ओरिसा हे लेफ्टनंट गव्हर्नरचे प्रांत केले. आसाम त्यांच्याहूनही लहान, तो चीफ कमिशनरचा प्रांत झाला.

आणि शेवटीं भारताला शाही आशीर्वाद मिळाला, "आम्हीं केलेल्या ह्या फेरफारामुळें भारताची भरभराट होवो. त्याला चांगले दिवस येवोत."

बंगालच्या फाळणींतून पेटलेला लढा सरकारनें फाळणी बऱ्या बोलानें मागें घेतली आणि 'झांकली मूठ सवा लाखीचा' राखली म्हणून एवढ्यावर तरी ओसरला. पण फक्त ओसरला; थांबला नाहीं. तो थांबणार नव्हताही. स्वातंत्र्यासाठीं सुरू झालेलें युद्ध स्वातंत्र्य मिळविल्याखेरीज कसें थांबणार? आणि तें थांबविणार कोण?

स्वातंत्र्यासाठीं भारतानें १८५७ चा पहिला लढा दिला. त्यांत भारत हरला. नंतर कॉंग्रेसला पाठीशीं घालून भारत हा दुसरा लढा लढला आणि विजयी झाला.

कॉंग्रेसच्या अधिकारी वाणीनें सांगायचें तर कॉंग्रेसच्या चळवळीला मिळालेल्या या यशानें देशभर आनंदीआनंदाचें प्रसन्न वातावरण निर्माण झालें. त्याचें गोड प्रत्यंतर त्या सन १९११ सालीं कलकत्त्याला भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत आढळून आलें. सुरेंद्रनाथ बानर्जींनीं या लढ्याला एकजिवानें पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

पण त्या आनंदीआनंदांतही जनता आपल्या स्वातंत्र्याच्या मुळावर मरणघाव घालणारे जुलमी कायदे सरकारनें केले होते ते विसरूं शकत नव्हती. सन १९०८ चा सिडिशस मीटिंग्ज ॲक्ट, सन १९१० चा क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट (फौजदारी कानूच्या दुरुस्तीचा कायदा),

हे जनतेच्या स्वातंत्र्याच्या मुळावरच घाव घालणारे कायदे रद्द करून घ्यायचे होते. यापेक्षांही भयंकर म्हणजे शंभर वर्षांपूर्वीपासून भारताच्या उरावर बसलेला सन १८१८ चा तिसरा रेग्युलेशन ॲक्ट आणि प्रांतोप्रांतीं जारी असलेले जुनाट जुलमी कायदे गाडायचे तसेच पडले होते. ह्या कायद्यांच्या जोरावर तर सरकार पाहिजे त्याला पाहिजे तेव्हां पाहिजे तिथें हद्दपार करूं शकत असे. लाला लजपतरायांसारख्या महान् देशभक्तांना सरकारनें जें भराभर उचलून त्यांच्या स्वतःच्या मायदेशाबाहेर हद्दपार केलें होतें, तें त्या जुलमी कायद्यांच्या जोरावर. ते कायदे रद्द करून घ्यायचे होते. देशांत पैदा होणाऱ्या सुती कापडावरील जकाती स्वदेशीची गळेचेपी करीत होत्या त्या रद्द करून घ्यायच्या होत्या. अशीं जनतेचें जीवित आणि मालमत्ता यांचें शोषण करणारीं अनेक सरकारीं अरिष्टें अजून दूर व्हायचीं होतीं.

"या सगळ्यापेक्षांही मोठें शल्य म्हणजे मधुमेहाच्या जीवखाऊ व्याधीनें पीडलेले आपले लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगांत एकटेच एकांतवासी कैदेंत होते. तसेच आणखी कितीतरी राजबंदी तुरुंगाच्या भिंतींआड जखडून पडले होते. दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या हिंदी बांधवांचे हाल तर कुत्रा खात नव्हता. त्यासाठीं राष्ट्रव्यापी आंदोलनाची आवश्यकता होती."

तात्पर्य, स्वातंत्र्याचा हा दुसरा लढा ओसरला, तरी त्या लढ्यांत रस्तोरस्तीं, ठायीं ठायीं कितीतरी राड पडलेली उपसायची होती.

आणि स्वातंत्र्य? ज्यासाठीं भारत हे दोन महान् लढे लढला, आणि ज्यासाठीं आणखी असे अनेक लढे भारताला लढावे लागणार होते, तें स्वातंत्र्य? तें प्राप्त होईतों भारताचें स्वातंत्र्ययुद्ध संपणार नव्हतें. त्याखेरीज भारताला अशा लढ्यांतील जय-पराजयाचें स्तोम माजवीत बसायला फुरसत नव्हती. लढाईंतील जयापजय अशा चिल्लर खुर्द्यांनें मोजावयाचा नसतो. तो साधनांच्या पवित्रतेवर व परिणामींच्या यशावर मोजावयाचा असतो.

बंगालची फाळणी रद्द झाली, ही एक परीनें आपल्या उदात्त राष्ट्रीय भावनांची महापूजा झाली.

या गौरवाचा मानकरी आपला तरुण भारत. सन १९०७ च्या सुरतेच्या कॉंग्रेसनंतर लढ्यांत आघाडीला राहून वैऱ्याला मारतां मारतां मरणघाव सोशीत हिरीरीनें तो लढला, आणि विजयी झाला. कॉंग्रेसच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या आघाडीवरही मूळपासून तोच लढत होता. सुरतेला आपसांत दुभंगून कमजोर झालेल्या त्या आघाडीवरून आपण परिणामकारक सामना देऊं शकत नाहीं असें त्याला आढळून आलें. त्याबरोबर त्यानें दहशतवादी सशस्त्र प्रतिकाराची दुसरी आघाडी उघडली; आणि प्राणपणानें लढा दिला.

या लढ्यांत पहिली आघाडी कॉंग्रेसनें उघडलेली निःशस्त्र-प्रतिकाराची. दुसरी आघाडी आपल्याच दहशतवादी क्रांतिकारकांची. दोन्ही आघाड्यांवर आपला जय झाला. दुसऱ्या आघाडीवरील रक्ताळलेला जय हा पहिल्या आघाडीवर फुललेल्या जयाचा मादक सुगंध होता. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ह्या आपल्या चतुःसूत्री चळवळीचा हा विजय. हा विजय त्या सुगंधी फुलांच्या फुलोऱ्यांतून वाढणाऱ्या फळांसारखा होता.

फुलें फुललीं होतीं. त्यांचा सुगंध दाही दिशां दरवळत होता. फुलांच्या पाकळ्या गळून पडत होत्या. सुगंधाची दरवळ ओसरत होती. फुलांतून अमृताचीं फळें वाढत होतीं. तीं आपल्याच मुखीं लागणार होतीं. म्हणूनच तीं आपणांला जपून-जोपासून पिकेपावेतों वाढवायचीं होतीं. यासाठीं आपणां जनतेला असेच आणखी अनेक क्रांतिकारक स्वातंत्र्य लढे द्यावे लागणार होते. ते लढे पुढें वांट्याला येणारे फुलून फळें पिकवीत गळून जाणाऱ्या फुलांच्या रक्ताळलेल्या सुगंधासारखे हत्यारी नव्हते. ते पूर्णपणें सत्य-अहिंसेवर आधारलेले सत्याग्रही लढे होते.

ते लढे आपण गांधी युगांत-कॉंग्रेसच्या पुढारीपणाखालीं आपल्या

भारतमायभूच्या स्वातंत्र्यासाठीं इथवर लढलों, तसेंच इथून पुढें भारत स्वतंत्र होईपावेतों लढलों, विजयी झालों. आणि आपली सत्याग्रही भारतमायभू याच देहीं याच डोळां स्वतंत्र झालेली पाहिली.

त्या 'युद्धस्य कथा रम्या' आतां आपण शांतपणानें वाचीत आहों; सांगत आहों. या आपल्या भारताच्या स्वातंत्र्ययुद्धाला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. कारण हें सत्याग्रही स्वातंत्र्ययुद्ध आपला भारत शस्त्र धारण न करतां, हिंसा न करतां, शत्रूलाही 'मर' असें अभद्र न म्हणण्याइतक्या माणुसकीला जागत शत्रूशीं लढला, आणि विजयी झाला. या विराट स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास आपण पुढें अभिमानानें वाचूंच.

या बंगालच्या लढ्यानंतर प्राणपणानें, हजारोंची क्रूर कत्तल करून घेऊनही आपणाला सत्य–अहिंसा पाळीत लढावा लागलेला यापुढील पहिला घनघोर सत्याग्रही स्वातंत्र्यलढा म्हणजे **जालियनवाला बाग.**

१ 'काय वाटेल तें करा पण तीं वीस पिस्तुलें हस्तगत करा' असें गायडर कळवळून कां म्हणत होता ?

२ जॅक्सनच्या खुनाच्या खटल्याची पुढें आणखी कशी परवड लागली ?

३ नामदार गोखले चिडून कां व काय बोलले ?

४ फाळणीचें पाप कोण, कसा, कां झटकून टाकूं लागला ?

५ फाळणी रद्द करण्यासाठीं सरकारनें कसा मोका साधला ?

६ फाळणीच्या लढ्यांतील दोन आघाड्या कोणत्या ? त्या दोन्ही आघाड्यांचा जय कसा झाला ?

७ आपल्या स्वतंत्र्ययुद्धाला जगाच्या इतिहासांत तोड कां नाहीं ?

## या इतिहासकथेंतील

# कोण .... काय .... कुठें

**दादाभाई नौरोजी :** हे काँग्रेसच्या आद्य संस्थापकांतील अग्रगण्य. बंगालच्या फाळणीपूर्वी दोन वेळां ते काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते. या ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्यानें ६००० मैलांवरून, विलायतेंतून इतक्या दूर येऊन कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या त्रयीच्या भरीला स्वराज्याची घोषणा जोडून चतुःसूत्री तयार केली.

**लोकमान्य टिळक :** ( बाळ गंगाधर टिळक ) महात्मा गांधींच्या पूर्वीचे भारताचे सर्वश्रेष्ठ नेते. काँग्रेसच्या चळवळींत प्रभावी जिवंतपणा यांनीं आपल्या जहाल लढाऊ बाण्यानें आणला. यांच्या काळांत काँग्रेस बहुजन समाजाची–राष्ट्राची एकमेव नेतृत्वशक्ति शोभेल इतकी प्रभावी झाली नव्हती ; तरी बुद्धिजीवि मध्यम वर्गांत जागृति करून त्याला मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं झगडण्याकरितां चेतना देऊन अखिल भारत टिळकांनीं जागृत केला. गांधीजींचा भारताच्या राजकारणांत प्रभावी उदय आणि लोकमान्यांची जीवनसमाप्ति ह्या गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून एकदम लागोपाठ घडून आल्या. (मृत्यु १ ऑगस्ट १९२०)

**लाला लजपतराय :** लोकमान्य टिळकांचे राजकीय सहप्रवासी. लाल-बाल–पाल ही आदरणीय त्रयी तेव्हां सवतोमुखीं घोळत होती, त्यांतील 'लाल'. सन १९२८ सालीं सायमन कमिशनवरील बहिष्काराच्या निदर्शनांत लालाजीं-वरही लाहोर येथें पोलिसांकडून भ्याड लाठीहल्ला झाला. वर्मी आघात होऊन त्यांतच पुढें थोड्याच दिवसांत त्यांचा अंत झाला. (सन १९२८)

**बिपिनचंद्र पाल :** हे बंगालच्या फाळणीविरुद्ध बंगालभर व देशांतही सर्वत्र उसळलेल्या उग्र चळवळीच्या पंचप्राणांतील एक प्राण होते. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा तेव्हां त्यांनीं देशभर जोरदार प्रचार केला. लाल--बाल--पाल या त्रयींतील लोकमान्यांच्या प्रभावळींतील 'पाल' ते हे.

**ए. ओ. ह्यूम :** भारतांतील एक बडे सनदी नोकर. भारत आणि इंग्रजी राजवट या दोघांचेंही भलें साधण्याच्या इराद्यानें यांनीं काँग्रेसची – भारतीय राष्ट्र-सभेची कल्पना काढली. आणि ती सन १८८३ मध्यें प्रत्यक्षांत आणली.

**गोपाळ गणेश आगरकर :** टिळकांचे समकालीन. आरंभींचे सहकारी. महाराष्ट्रांतील श्रेष्ठ समाजसुधारक. 'सुधारक' मराठी साप्ताहिकाचे संपादक.

**शिवराम महादेव परांजपे** (काळकर्ते) : सावरकरांना गुरुस्थानीं असणारे टिळकांचे समकालीन ज्वलजहाल पत्रकार. बॉंब–पिस्तुलांच्या प्रहारांप्रमाणें प्रखर लेखन–भाषण–प्रहार करून क्रांतिकार्याला साहाय्य करणारे. त्यासाठीं कष्ट व तुरुंगवास भोगणारे. त्यानंतरचे गांधी – कॅाँग्रेस – भक्त.

**गोपाळ कृष्ण गोखले :** हे लोकमान्य टिळकांबरोबर सन १८८९ सालीं कॅाँग्रेसमध्यें प्रथमच प्रविष्ट झाले. ते जरी नेमस्त वृत्तीचे पुढारी असले तरी 'सरकारजमा' नव्हते. त्यांनीं कॅाँग्रेसमधून, कॅाँग्रेसबाहेर कायदेमंडळांतून, व अन्यप्रकारें भारताची बहुमोल सेवा केली. सुरतेला कॅाँग्रेसमध्यें फाटाफूट झाल्यानंतर त्यांनीं गांधीजींच्या आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या चळवळीला फार मदत केली. सन १९०९ च्या दिल्लीच्या कॅाँग्रेस अधिवेशनांत सत्याग्रहाच्या पंथाबद्दल आनंद व्यक्त केला. आणि त्या पंथाच्या तत्त्वज्ञानाचें स्पष्टीकरण केलें. हे सन १९०५ च्या काशी कॅाँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष होते. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ही त्यांच्या श्रमांनीं आणि स्फूर्तीनें उभारली गेलेली व आज भारताला ललामभूत होऊन राहिलेली संस्था, हें त्यांचें महान् जिवंत स्मारक होय.

**सर फिरोजशहा मेथा :** हे कॅाँग्रेसशीं अगदीं आरंभापासून संबंध असलेल्यांपैकीं एक होत. पुढें ते कॅाँग्रेसमधील नेमस्त पक्षाचे एक धुरीण होते. सुरतेला लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाविरुद्ध उठावणी करणारांत हे एक प्रमुख नेमस्त होते. सन १८९० च्या कॅाँग्रेसचे ते अध्यक्ष होते.

**डी. ई. वाच्छा :** हेही कॅाँग्रेसच्या आद्य संस्थापकांपैकीं एक. यांनीं पाव शतक कॅाँग्रेसची अमोल सेवा केली. त्यांना तेव्हां कॅाँग्रेसचें जळतें कोलीत म्हणत असत. उत्तर कालांत ते नेमस्त म्हणून ओळखले जात. तेव्हां ब्रिटिश सरकारच्या विश्वासांतील एक गृहस्थ अशा गौरवानें सरकारी अधिकारी त्यांच्याकडे पाहत असत. कलकत्ता येथील १७ व्या कॅाँग्रेस अधिवेशनाचे (सन १९०९) हे अध्यक्ष होते.

**सुरेंद्रनाथ बानर्जी :** यांचा कॅाँग्रेसशीं वीस वर्षांहून जास्त संबंध होता. ते कॅाँग्रेसनिष्ठ असूनही राजनिष्ठ होते. इंग्रजी राज्यघटना, आंग्ल संस्कृति, इंग्रजांची न्यायबुद्धि, यावर त्यांची अलोट श्रद्धा होती. तरीही बंगलच्या फाळणींतून निर्माण

झालेल्या निषेधात्मक चळवळीचे ते आरंभीं एक वडीलधारे पुढारी होते. ते पुणें (१८९५) व अलाहाबाद (सन १९०२) या कॉंग्रेस अधिवेशनांचे अध्यक्ष होते.

**वासुदेव बळवंत फडके :** पहिले महाराष्ट्रीय क्रांतिकारक. (सन १८४५–१८८३). सन १८७९ मध्यें यांनीं रांगड्या लोकांचें सैन्य उभारून इंग्रजाविरुद्ध लढा द्यावयाला सुरुवात केली. पण त्यांना फार दिवस लढा देतां आला नाहीं. ते पकडले गेले. खटला झाला. जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. एडनच्या तुरुंगांत सन १८८३ सालीं त्यांची जीवनयात्रा संपली.

**वॉल्टर चार्लस् रॅंड:** पुण्यांतील पहिल्या (सन १८९७) प्लेगच्या बंदोबस्तासाठीं नेमलेला खास अधिकारी. याच्या जुलमी वर्तनामुळें याचा सन १८९८ सालीं खून झाला.

**दामोदर चाफेकर :** लो. टिळकांचे निष्ठावंत अनुयायी. यांनीं आपले बंधु व मित्र यांच्या साह्यानें रॅंडचा खून केला. फांशीची शिक्षा. सन १८९८.

**गणपतराव द्रविड :** चाफेकरांनीं खून केला असें सरकारांत बक्षिसाच्या लोभानें सांगणारा व त्याचा बित्तं ठावठिकाणा सरकारला सांगणारा चाफेकरांचा विश्वासघातकी मित्र. याचा पुढें लौकरच दामोदर चाफेकरचा भाऊ आणि रानडे या दोघां सहकाऱ्यांकडून खून झाला. ता. ८ फेब्रुआरी १८९९.

**गायडर :** चाफेकर वगैरे रॅंडच्या खुनींना पकडणारा धूर्त गोरा पोलिस अधिकारी.

**लॉर्ड कर्झन :** सन १९०५ सालीं बंगालची फाळणी करून देशभर असंतोषाचा भडका उडविणारा तरुण व्हाइसरॉय. अति हुषार. कर्तबगार. तसाच उन्मत्त व दडपशहा. याच्या राजवटीमुळें भारतीयांचे इंग्रजी अमलाच्या विषारीपणाविषयीं चांगले डोळे उघडले.

**सर बॅम्फील्ड फुल्लर :** फाळणींतील पूर्वबंगालचा लेफ्टनंट गव्हर्नर. कर्झनचा साथीदार. हिंदु–मुसलमानांत फूट पाडण्यासाठीं परोपरीनें झटणारा पक्का जुलूमशहा.

**अरविंद घोष :** आय. सी. एस. पास झालेले. पण अश्वारोहणांत अयशस्वी झाल्यानें भारत सरकारच्या सनदी नोकरींत प्रवेश मिळाला नाहीं. हे बडोदा राज्याचे

एक वरिष्ठ अधिकारी होते. हाडाचे उग्र क्रांतिकारक. बंगालमधील क्रांतिकारकांचे एक आद्य पुढारी. पकडले गेले. खटले झाले. शिक्षा झाली. नंतर सर्वसंग-परित्याग करून फ्रेंच मुलुखांत पांदिचरी एथें आश्रम बांधून वास्तव्य. महान् योगी. भारत स्वतंत्र झालेला पाहिल्यावर अलीकडे मरण पावले.

**खुदीराम बोस** : (सन १८८९–१९०८.) दास्यविमोचनासाठीं बाळपणा-पासून तळपणारा अद्वितीय क्रांतिकारक. बाबू अरविंद घोष यांच्या 'युगांतर' क्रांतिसमितीचा स्नातक. त्या समितीच्या आदेशानुसार जुल्मी गोरा न्यायाधीश किंग्जफर्ड याचा बॉंब फेकून वध करण्याच्या कटांतील प्रमुख. यानें फेकलेला बॉंब गैरसमजुतीनें केनडी उपनांवाच्या गोऱ्या मायलेकींच्या वधाला कारण झाला. ही भारतांतील पहिली यशस्वी राजकीय बॉंबफेक. ता. ११ ऑगस्ट १९०८ रोजीं फांशी.

**प्रफुल्लचंद्र चाकी** : खुदीरामसारखाच धडाडीचा, बॉंबफेकींतील त्याचा समवयस्क सहाध्यायी. भूमिगत होण्यासाठीं पळतांना मुकमाघाट स्टेशनवर आतां पोलीस आपणाला पकडणार, सुटका नाहीं, असें पाहतांच स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या. ता. १ मे १९०८.

**हेमचंद्र दास** : खुदीराम वगैरे क्रांतिकारकांचा समकालीन विश्वासू सहकारी. तेव्हांच्या क्रांतिकारस्थानांतील एक प्रमुख तरुण. पिस्तुलें, बॉंबकृति वगैरे प्राप्त करून घेण्यासाठीं परदेशीं जाऊन यशस्वी प्रयत्न करणारा धाडसी तरुण.

**रॉय चौधरी, : कुंजविहारी भट्टाचार्य : वासुदेव भट्टाचार्य** : विलायतेंत गोऱ्यांना प्रभावी दहशत घालणारी हिंदी क्रांतिकारकांच्या गटांतील तरुण मंडळी. ली वॉर्नर या गोऱ्याला चोप देणारी.

**मदनलाल धिंग्रा** : सावरकरांचा तरुण धाडसी सहकारी. यानें सर कर्झन वायली या इंडिया ऑफिसशीं संबंध असलेल्या बड्या गोऱ्या अधिकाऱ्याचा गोळ्या झाडून खून केला. (सन १९०७). फांशीची शिक्षा.

**अनंत कान्हेरे** : हा औरंगाबाद येथील तरुण क्रांतिकारक गटांतील तरुण क्रांतिकारक. यानें नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा खून केला. (ता. १ जुलै १९०९). फांशी ता. १७ ऑगस्ट १९०९.

**माणिकतोळा बाग :** बंगाली क्रांतिकारकांचें बाँब वगैरे तयार करण्याचें अत्यंत महत्त्वाचें गुप्त केंद्र. खुदीराम बोस बाँबफेकीनंतर पकडला गेल्यावर लगेच झडत्या व धरपकडी यांचें सत्र सुरू झालें, त्यांत या गुप्त केंद्रावरही छापा पडला. केंद्र उध्वस्त झालें.

**नरेंद्र गोस्वामी :** खुदीराम बोस वगैरे तरुण क्रांतिकारकांच्या गटांतील सहाध्यायी. माणिकतोळा बागेनंतर सरकारला फितूर. माफीचा साक्षीदार. त्याचा तुरुंगांतच क्रांतिकारकांवरील खटला चालू असतांना क्रांतिकारकांकडूनच खून झाला.

**कन्हैयालाल दत्त व सत्येंद्रनाथ बसू :** खुदीरामचे सहाध्यायी क्रांतिकारक तरुण. लगेच पकडले गेले. तुरुंगांत यांनींच फितूर नरेंद्र गोस्वामीचा गोळ्या झाडून खून केला. दोघांनाही फांशी.

**पांडुरंग महादेव बापट : (सेनापति बापट)** विलायतेंत शिक्षणासाठीं गेलेले. यांनींच हरप्रयत्नांनीं बाँब तयार करण्याची कृती जर्मनींत जाऊन हस्तगत केली, व भारतांत पाठविली. परदेशांत जाऊनही देशसेवेसाठीं अलोट कष्ट व त्याग करणारा महाराष्ट्रांतील व भारतांतील तत्कालीन प्रमुख व असाधारण त्यागी क्रांतिकारक. गांधी युगांतील सत्याग्रही.

**विनायक दामोदर सावरकर :** टिळक युगांतील भारताचे एक धडाडीचे विद्यार्थीदशेपासूनचे प्रमुख व हुषार दहशतवादी. जुन्या जमान्यांतील क्रांतिकारक. नेहमीं पडद्यामागें राहून रक्तमय क्रांतीसाठीं सूत्रचालन करण्याकरितां झटणारे. त्यासाठीं अंदमानांतील खडखर तुरुंगवास भोगणारे. आतां मोकळे.

---

# आदर्श वाङ्मय प्रकाशन संस्था

पुढील वर्षी सन १९५७ साली देशभर होणाऱ्या राष्ट्रीय शतसांवत्सरिक उत्सवाच्या शोभेंत फूल ना फुलाची पाकळी भर म्हणून आजपासून

**सत्तावनी स्वातंत्र्यसमराची वाङ्मयीन शतसांवत्सरी**
**साजरी करीत आहे. म्हणजेच**

आचार्य **भागवत** यांनीं प्रस्तावना लिहिलेला कादंबरीकार **हडप** यांचा

# स्वातंत्र्यभारत

## अर्थात्

## गेल्या अडीचशें वर्षांतील भारताच्या स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास

खंडशः सहा खंडांत मे १९५७ पावेतों प्रसिद्ध करीत आहे हा '**स्वातंत्र्य-भारत**' ग्रंथ म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा अगदीं आरंभापासून आज भारत स्वतंत्र झाला आहे येथवरचा अगदीं आजतागायतचा सर्वसाधारण साक्षर वाचकालाही सहज कळेल असा स्वातंत्र्य–बृहत्कथासागर होय.

**१ प्लासीची शोककथा. • २ सन १८५७.**
**३ बंगालची सत्यकथा. • ४ जालियनवाला बाग.**
**५ दांडीयात्रा. • ६ अखेरचा लढा 'नऊ ऑगस्ट'.**
**अशा सहा खंडांत 'स्वातंत्र्यभारत' प्रसिद्ध होत आहे.**

## बंगालची सत्यकथा

या तिसऱ्या इतिहासकथेपासून या भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहास-प्रकाशनाला प्रारंभ होत आहे.